किंमत १ रुपया

REG. No. B. 3434

दिवाळी अंक


# अर्थ

दिवाळी अंक

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख २७ आक्टोबर, १९४८ | अंक ४३

We wish our patrons a Happy Diwali and a Prosperous New Year.



By Day and Night...

☆ GULAB
☆ RAJDARBARI
☆ KASTURI AMBER
☆ No. 1010
☆ No. 1008
☆ No. 1006
☆ No. 1004

*Spreading the Fragrance all over*

LET Sun and Moon smile with you and may the lingering fragrance of friendly roses increase your happiness through our Agarbattis for night and day in your vicinity.

REGD TRADE MARK

'KATA' BRAND AGARBATTI

DAMODARDAS BHAGWANDAS LTD. ESTD. 1872

TELEGRAMS:-'AGARBATTI' • 761, RAVIWAR, POONA 2 • P.O. BOX 595, POONA

INDIA'S LEADING AGARBATTI MANUFACTURERS

DB/E1 TOM & BAY (R)

# श्रीलक्ष्मी टेक्स्टाइल मिल्स लिमिटेड

पो. भाटघर—भोर

**महाराष्ट्रांतील हातमागांना उत्तम सूत पुरविणारी सुताची गिरणी.**

★ अधिकृत भांडवल १५ लाख

★ विकलेलें व वसूल भांडवल १०॥ लाख

★ कंपनीची मालमत्ता १५ लाखांचे वर

**कंपनीचे वाढलेले कामाकरितां ठेवी घेणें आहेत.**

**व्याजाचे दर : १ वर्ष ५% २ वर्षें ५॥% ३ वर्षें ६% प्रमाणें.**

**व्याज दर सहामाहीस दिलें जातें.**

कंपनीचे ६। टक्के अग्रहक्काचे (प्रेफरन्स) थोडे शेअर्स विकाऊ आहेत.

ठेवीबद्दलची माहिती व शेअर्सबद्दलची मागणी करावी.

—मॅनेजिंग एजंटस्—

**दि भोर मर्कंटाइल एजन्सी लि०, भोर**

★ अथवा ★

**द. वा. फाटक**
पायोनियर डाइंग हाऊस लि.,
६२५ सदाशिव पेठ, पुणें २.

**मा. ग. देसाई**
एस. एन. राजर्षि आणि कं.
३८८।९४ शेख मेमन स्ट्रीट, मुंबई २.



# दि सांगली बँक, लि.

**Under The Patronage Of The Govt. of H. H. The Rajasaheb Of Sangli.**

*( Incorporated In Sangli State. Liability Of Members Limited. )*

**स्थापना : १९१६**

| | | |
|---|---|---|
| आधिकृत भांडवल | रुपये | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रुपये | ३,००,००० |
| रिझर्व्ह फंड | रुपये | ३,००,१०० |

**खेळतें भांडवल एक कोटीचे वर**

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

रावसाहेब ह. ब. कुलकर्णी (चेअरमन)

★ शेठ बा. चिं. विराज ★ शेठ बा. अ. आरवाडे ★ शेठ जी. बा. आरवाडे ★ शेठ शं. ग. गाडगीळ

मुख्य ऑफीसः—सांगली.

शाखाः—(१) मुंबई (२) शहापूर (३) रबकवी (४) शिरहट्टी (५) तेरदूळ (६) करडे (७) मंगळवेढें (८) कऱ्हाड (९) उगार (१०) विलिंग्डन कॉलेज (११) वानलेसवाडी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

P. S. Mokashi मॅनेजर

[ इण्डियन कंपनीज ॲक्ट १९१३ चे विभाग ९२ ( २ ) अन्वयें मूळ इंग्रजी प्रॉस्पेक्टसूची प्रत राजिस्ट्रार ऑफ कंपनीज, मुंबई, यांच्याकडे 'फाईल' केलेली आहे. ]

हें फक्त शेअर विक्रीचें प्रसिद्धक आहे; प्रॉस्पेक्टस नव्हे.

# नानूज ब्रास वर्क्स लिमिटेड

( १९१३ च्या इंडियन कंपनीज् ॲक्ट ७ अन्वयें स्थापन झालेली )

रजिस्टर्ड ऑफिसः— मापला महाल, २६९ ए, गिरगांव रस्ता, ठाकुरद्वार, मुंबई ४.

**अधिकृत भांडवल रु. २५,००,०००**

**प्रत्येकी रु. ५० चा एक, याप्रमाणें ५०,००० शेअर्समध्यें विभागलेलें.**

**विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,०००**

**प्रत्येकी रु. ५० चा एक याप्रमाणें १०,००० शेअर्समध्यें विभागलेलें, पुढील प्रमाणें द्यावयाचे**

**रु. १२-८-० प्रत्येक शेअरला, अर्जासोबत. रु. १२-८-० प्रत्येक शेअरला, अर्जमंजुरीनंतर.**

उरलेली रु. २५ बाकी ही प्रत्येक मागणीस रु. १२-८-० या प्रमाणें दोन मागणींत वसूल केली जाईल. दोन मागणीमधील कालमर्यादा २ महिन्यांहून कमी इतकी असणार नाहीं.

## चेअरमन

सर माधवराव जी. देशपांडे, के. बी. ई. ( चेअरमन ), बँकर आणि लँडलॉर्ड, नागपूर. संचालक, नागपूर इलेक्ट्रिक लाइट ॲण्ड पॉवर कंपनी लि. ( नागपूर. ), ईस्ट कॉटन असोसिएशन, ( मुंबई ), सराफ ऑइल मिल्स लि. ( मुंबई ), नागपूर ग्लास वर्क्स लि. ( नागपूर ), सी. पी. ॲण्ड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑप. बँक लि., ( नागपूर ), नागपूर को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक, ( नागपूर ), न्यू आयडियल जनरल स्टोअर्स लि. ( मुंबई ).

**मॅनेजिंग एजंट्सः**—मेसर्स कर्णिक ॲण्ड भावे लि., मापला महाल, ठाकुरद्वार, मुंबई. २.

**बँकर्स**— ( १ ) दि बँक ऑफ इंडिया लि., मुं[illegible] दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि., मुंबई ( ३ ) दि प्रेसिडेन्सी इण्डस्ट्रिअल बँक लि; मुंबई.

**ऑडिटर्स**—मेसर्स जी. एम्. ओक ॲण्ड कंपनी, रजिस्टर्ड अकौन्टन्टस् ॲण्ड ऑडिटर्स, १८० बुधवार पेठ पुणें शहर व रेडिमनी मॅन्शन्स, चर्चगेट स्ट्रीट, मुंबई.

**ब्रोकर्स**—श्री. अ. शं. साठे, बी. एस्सी. ( १ ) केअर ऑफ मे. अमृतलाल कालिदास ॲण्ड कंपनी, ९५ स्टॉक एक्सचेंज न्यू बिल्डिंग, कोट, मुंबई ( २ ) 'उल्हास,' १२६९।१, जंगली महाराज रोड, पुणें ४.

**सॉलिसिटर्स**—मेसर्स अम्बुभाई आणि दिवाणजी, लेन्टिन चेम्बर्स, दलाल स्ट्रीट, कोट, मुंबई.

**धंद्याला असलेला वाव**—नानूज ब्रास वर्क्स हा चालू स्थितींत असलेला कारखाना ही कंपनी विकत घेणार आहे. ही कंपनी काढण्याच्या उद्देशानेंच जानेवारी १९४८ मध्यें श्री. के. जी. कर्णिक यांनीं नानूज ब्रास वर्क्स हा चालू स्थितींत असलेला कारखाना विकत घेतला.

नानूज ब्रास वर्क्स या कारखान्यांत प्रामुख्यानें रुग्णालयासाठीं व शस्त्रक्रियेसाठीं लागणारीं उपकरणीं, हत्यारेंपात्यारें, तसेंच प्रयोग-शाळा, दवाखाने, संशोधन संस्था इत्यादींना लागणारी यंत्रसामुग्री, भांडींकुंडीं बनविण्यांत येतात. हा कारखाना सुमारें ५० वर्षां-पूर्वीं प. बा. नानू यांनीं काढला व त्याचे श्री. एन्. एस्. चुणेकर हे अलीकडचे मालक होते. सदर कारखान्यांत रुग्णालयासाठीं व शस्त्रक्रियेसाठीं लागणारें सर्व प्रकारचें सामानसुमान बनविण्यांत येतें.

नानूज ब्रास वर्क्स या कारखान्यांत सध्या पुढील महत्वाची सामुग्री बनविण्यांत येते: —

( १ ) कार्डिॲक बेड ( २ ) लेबर बेड ( ३ ) ऑपरेशन टेबल ( फोल्डिंग व पोर्टेबल टाइप ) ( ४ ) फ्रॅक्चर बेड ( ५ ) फाउलर बेड ( ६ ) बेडसाइड ड्रॉवर ( ७ ) हाय प्रेशर स्टरलायझर, हॉरिझॉन्टल व व्हर्टिकल वगैरे.

वर उल्लेखिलेल्या साधनसामुग्रीखेरीज कारखान्यांत इमारतींना व रेल्वेला लागणारी सामुग्री बनविण्याचा कंपनीचा विचार आहे. हें काम तावडतोब हातीं घ्यावयाचें असून इतर सामुग्री बनविण्याच्या योजनेचा तो जणूं प्रारंभच होय.

कंपनीचें सांप्रतचें मासिक उत्पादन रु. १०,००० ते १२,००० पर्यंत आहे.

कारखान्याच्या वाढीसाठीं म्हणून कारखाना शिवडी येथें नवीन जागेंत नेला आहे. कारखान्याच्या मालाला असलेली वाढती मागणी पुरविण्याच्या दृष्टीनें प्रत्येक महिन्यास रु. २०,००० किंमतीची सामुग्री उत्पादन करण्याचा विचार आहे. कारखाना पूर्णपणें सुरू झाला तर अपेक्षित नफा १५ ते २० टक्के इतका होईल.

## किमान भांडवल

कमीत कमी दोन लक्ष रुपये किंमतीच्या शेअर्ससाठीं अर्ज आल्यावर संचालक मंडळ शेअर्स मंजूर करतील. त्यांच्या मतें इतकी रक्कम उभारणें आवश्यक आहे.

## ब्रोकरेज व कमिशन

कंपनीला भागीदार मिळवून देण्याच्या कामाबद्दल विक्री झालेल्या भांडवलावर पांच टक्क्यांहून अधिक कमिशन देण्यांत येणार नाहीं.

( मिरज येथें १९२९ सालीं स्थापन झालेली: भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

–मिरज–

( स्थापना : १९२९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८५,००,००० |

चेअरमन

रावसा. वि. पां. बेडेकर

बी. एस्‌सी., बी. ई.

शाखा

★लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

के. डी. शिराळकर

मॅनेजर

## शेअर विक्री चालू आहे

मागोरा केमिकल कं. लि. पुणें २ या कंपनीची शेअरविक्री हल्लीं चालू आहे. कंपनीनें गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर तीन टक्के व प्रेफरन्स शेअर्सवर पांच टक्के डिव्हिडंड जाहीर केलेलें आहे. महाराष्ट्रांतील एका मोठ्या व वाढत्या केमिकल कंपनीचे शेअर्स आतांच घेणें ज्यास्त हितावह होईल.

अधिक माहितीसाठी लिहा:—

रा. य. रानडे, बी. ए.

मॅनेजिंग एजंट.

मागोरा केमिकल कं. लि. पुणें २

## सिंगर व मॉर्गन मोटारींचे अधिकृत विक्रेते

# जोशी-गॅरेज

वक्तशीरपणा ★ व्यवस्थित दुरुस्ती ★ किफायतशीर भाव

टेलिफोन नं. २७३१

★ रॅले ★ हम्बर ★ फिलिप्स ★ हरक्युलस

इत्यादि इंग्लिश मेकच्या भक्कम सायकलींसाठीं आम्हांस भेटा

★ मोटर सायकली ★ ऑईल्स व ग्रीझेस ★ मोटर बॅटरीज ★ सर्व प्रकारचे ट्यूब्ज व टायर्स किफायतशीर भावांत देऊं.

मोटारी, मोटार–सायकली, सायकली, रेडिओज वक्तशीर व व्यवस्थित दुरुस्त करून दिले जातात.

सर्व प्रकारच्या मोटारी व सायकली, यांचे सुटे भाग, ॲक्सेसरीज, टूल्स, इत्यादि मिळण्याचें एकमेव विश्वासस्थान.

★ प्रोप्रा. व्ही. एन्. जोशी बी. ए. ★

जोशी-गॅरेज


४०५ नारायण पेठ, कॉमनवेल्थ कॉलनी, मोदी गणपतीजवळ, पुणें नं. २.

## ह्या अंकांतील कांहीं लेखक व त्यांचे लेख


| | पृष्ठ |
|---|---|
| १ प्रगतीची वाढ ( संपादकीय ) | ३४८ |
| २ आर्थिक विचारसरणीस योग्य वळण ( वैकुंठराय ल. मेहता ) | ३४८ |
| ३ हिंदी संघ व प्रांतराज्यें ह्यांचेमधील उत्पन्नाच्या बाबींची योजना ( ध. रा. गाडगीळ ) | ३४९ |
| ४ राष्ट्रीयीकरणाचा तोडगा ( द. गो. कर्वे ) | ३५१ |
| ५ कामगारविषयक सरकारी धोरण ( शंतनुराव किर्लोस्कर ) | ३५२ |
| ६ महाराष्ट्रांत युद्धकालीं निघालेल्या सुताच्या गिरण्या ( आ. रा. भट ) | ३५४ |
| ७ मुंबई शहर व त्यावरून सुचलेले कांहीं विचार ( सी. बा. जोशी ) | ३५७ |
| ८ आपलीं गळिताचीं धान्यें ( गो. रा. केळकर ) | ३५९ |
| ९ धरणांच्या योजनांमागील पूर्वतयारी ( गो. के. मनोळीकर ) | ३६१ |
| १० उत्पादन आणि महागाई ( शंकर ज. जोशी ) | ३६५ |
| ११ जागतिक मंदीची भीति आतां कमी आहे. ( भा. म. काळे ) | ३६९ |
| १२ कंपनी कायद्याखालील डायरेक्टरांची भूमिका ( स. वा. दातार ) | ३७१ |
| १३ शेअर बाजाराचें सीमोल्लंघन ( व. वि. लोणकर ) | ३७६ |
| १४ सहकारी संस्था आणि कापड वाटप ( य. द. खोले ) | ३७७ |
| १५ हिंदच्या परदेशी व्यापारांत सुधारणा | ३७८ |
| १६ टाटा घराण्याचा साठ वर्षांचा इतिहास | ३७९ |
| १७ सोन्याची किंमत उतरेल काय ? | ३८१ |
| १८ रशियांतील सहकारी चळवळ | ३८३ |
| १९ हिंदुस्थान सरकारची कर्जउभारणी | ३८५ |
| २० लागवड वाढली, तरी उत्पादन घटलें | ३८५ |
| २१ कारखानदारांच्या उत्तेजनासाठी सवलती | ३८७ |
| २२ हिंदी जॉ. स्टॉक बँका | ३८७ |
| २३ हिंदी कोको–चॉकोलेटचा धंदा | ३८८ |
| २४ आफ्रिकेंतील भुइमुग लागवडीची योजना | ३८९ |
| २५ क्युसेक, एकर–फुट, किलोवॅट | ३९० |


### " अर्था " चा पुढील अंक

दिवाळीनिमित्त " अर्थाचा " चे दोन अंक दरसालप्रमाणें बंद राहून, त्यानंतरचा अंक १७ नोव्हेंबर, १९४८ रोजीं प्रसिद्ध होईल.

वर्ष १४ वें **अर्थ** अंक ४३ वा
बुधवार, ता. २७ आक्टोबर १९४८

# प्रगतीची वाट

### यशचिंतन

"अर्था"च्या १४ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक आमचे वाचकांस सादर करण्यास आनंद होत आहे. गेली दिवाळी ही स्वतंत्र हिंदुस्थानची पहिली दिवाळी होती, तरी त्यावेळीं लक्षावधि हिंदी नागरिकांचें जीवित धोक्यांत होतें आणि परिस्थिति बिकट व अनिश्चित होती. गेल्या वर्षी ही परिस्थिति पुष्कळच सुधारली, तरी हैद्राबादच्या प्रश्नानें उग्र स्वरूप धारण केलें आणि शांततेस मोठाच धोका निर्माण झाला. तथापि, मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनी जी उपाययोजना योजिली, ती तात्काळ यशस्वी झाली. हिंदी लष्कराबद्दल त्यामुळें जनतेस कौतुक वाटूं लागलें आहे. ह्या सर्व बाबतीमधील सरकारचें दूरदर्शित्व आणि संयम ह्यामुळें त्याची लोकप्रियता निःसंशय वाढली आणि त्याचें सामर्थ्यहि दृष्टोत्पत्तीस आलें. काश्मिरच्या बाबतींतहि आपली न्याय्य बाजू स्पष्ट झाली असून, हिंदुस्थानाचें जागतिक महत्त्व वाढलें आहे. आपले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू, हे ग्रेट ब्रिटन व युरोप येथें योग्य वेळींच गेले आहेत; त्यांच्या व्यक्तित्वाची व हिंदुस्थानाच्या आदर्श शांतताप्रियतेची छाप इतर राष्ट्रांच्या पुढाऱ्यांवर बसल्याविना रहाणार नाहीं.

स्वातंत्र्य रक्षणासाठी व आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठीं आतां निश्चयानें व उत्साहानें कामास लागण्याची वेळ आली आहे. उत्पादनवाढीच्या प्रयत्नांची आवश्यकता पुन: पुन: सांगण्याचें कारणच नाहीं. सरकारच्या नव्या आर्थिक धोरणाचें सर्वांनीं स्वागत केलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. तथापि, केवळ सरकारी योजनांनीं इष्ट फलप्राप्ती होणार नाहीं; सरकारी अधिकारी, भांडवलवाले, कामगार, कचेऱ्यांतलि नोकरवर्ग, शेतकरी ह्या सर्वांनीं आपल्या जबाबदारीचा वांटा आपण होऊन पत्करला पाहिजे. स्वातंत्र्य प्राप्तिनंतरच्या उत्सवांत एक वर्ष गेलें, तेवढें पुरें आहे. सामान्य नागरिकांना कार्यप्रवण करण्याची मोहिमच काढण्याची जरूरी आतां भासूं लागली आहे आणि हें काम जाणत्या लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें स्वतःच पत्करल्याविना पुढें पाऊल सत्वर पडणार नाहीं. मूलभाही सामुग्रीबाबत राष्ट्राचें परावलंबित्व नष्ट झाल्याविना आजचें दारिद्र्यांतील स्वातंत्र्यहि टिकणें कठीण जाईल, ही गोष्ट जनतेस पटवून देण्यांत आली पाहिजे.

"अर्था"च्या स्थापनेपासूनच त्यानें प्रगतिपर राष्ट्रीय धोरणाचा पुरस्कार केला असून, देशाच्या आर्थिक व औद्योगिक उद्धाराची दिशा दाखविण्याचें काम त्यानें आपल्या हितचिंतकांच्या सहाय्यानें चालू ठेवलें आहे. आपल्या देशापुढील प्रश्न पुरेसे बिकट आहेत; कित्येक व्यवसायी लोकांपुढील व्यक्तिगत प्रश्न तर अधिकच निकडीचे झाले आहेत. त्यांना ते सोडविता येण्यास धैर्य, एकजूट, परस्पर विश्वास, इत्यादि गुणांचा जनतेंत परिपोष होणें जरूर आहे. स्वार्थ व सामुदायिक हित ह्यांचें परस्परावलंबन जनतेला पटो व पुढील दिवाळी दीप अधिक तेजानें तळपोत, असें आम्हीं चिंतितों. "अर्था"चे सहाय्यक व हितचिंतक ह्यांचे मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें आमचें कर्तव्य आहे. त्या सर्वांस नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.



प्रो. वा. गो. काळे

## आर्थिक विचारसरणीस योग्य वळण

हिंदुस्थानापुढील आर्थिक प्रश्नांचें आजचें स्वरूप, प्रो. वा. गो. काळे ह्यांनीं "अर्थ" स्थापन केला, तेव्हांचे पेक्षा अगदीं वेगळें झालें आहे. तथापि, आर्थिक विचारसरणीस योग्य वळण लावण्याचे कामीं "अर्थ" पूर्वीं जी कामगिरी करीत होता तिची गरज अद्यापहि तितकीच कायम आहे. आर्थिक प्रश्न ज्या प्रमाणांत तीव्रतर झाले आहेत त्या प्रमाणांत अडचणीहि वाढल्या आहेत. परंतु आतां आपलें भवितव्य आपल्याच हातीं आहे आणि प्रो. काळे ह्यांनीं आपल्या उभ्या सार्वजनिक आयुष्यांत सतत ज्या परकीय वर्चस्वाविरुध्द प्रचार केला त्या वर्चस्वांतून आपल्या आर्थिक धोरणाची आतां मुक्तता झालेली आहे; आपलें धोरण आपणच आपल्या हितास प्राधान्य देऊन ठरविण्यास समर्थ झालों आहों.

चार वर्षांपूर्वीं, हिंदुस्थानांतील विचारवंत अर्थशास्त्रज्ञ एकत्र येऊन तेव्हांच्या अनिष्ट चलनवृद्धीविरुध्द त्यांनीं जोरानें मत प्रदर्शित केलें, इतकेंच नव्हें तर तिचेवर पद्धतशीर व विधायक उपायहि सुचविले. ह्यांपैकी कित्येक सूचनांचा पुढें सरकारकडून स्वीकार केला गेला. प्रो. काळे ह्यांच्या संग्राहक नेतृत्वामुळेंच मुख्यतः हें घडून आलें. त्यांचे सहकारी आणि वारस–शिष्य ह्यांनीं त्यांची परंपरा उत्कृष्ट तऱ्हेनें राखून, सध्याच्या चलनवाढीच्या विशिष्ट प्रवृत्तीबाबत एकमतानें शिफारसी केल्या आहेत आणि ह्या शिफारशींस सार्वत्रिक पाठिंबा मिळाला आहे.

आर्थिक संसाराच्या अल्पकालीन गरजांची आज आपल्या धोरणावर व कार्यक्रमावर छाप सहाजिकच पडते, त्याविषयीं हें झालें. प्रो. काळे ह्यांनीं सामान्य माणसाचे व राष्ट्राचे—राष्ट्राचा मुख्य घटक सामान्य मनुष्य हाच असतो—दैनंदिन प्रश्न हाताळण्यांत मनापासून लक्ष घातलें, तरी हिंदुस्थानाची भक्कम आर्थिक पायावर उभारणी करण्याचें अगत्य त्यांनीं दृष्टीआड केलें नाहीं. एका लेखकानें नुकतेंच म्हटल्याप्रमाणें, अर्थरचनेचीं उद्दिष्टें तीन असावीं:—"कार्यक्षमता, स्थिरता आणि न्याय्यता." ह्या उद्दिष्टांवर आधारलेली अर्थरचना हिंदुस्थानांत दृढमूल होण्यास "अर्थ" साप्ताहिक आणि प्रो. काळे ह्यांची विचारप्रणाली, ह्यांच्याशीं संबंधित असणारांनीं आपला हातभार लावणें हें त्यांचें कर्तव्यच ठरेल.

वैकुंठ ल. मेहता

# हिंद संघ व प्रांत–राज्यें ह्यांचेमधील उत्पन्नाच्या बाबींची योजना

लेखकः—प्रा. ध. रा. गाडगीळ

( हिंदुस्थानची राज्यघटना फेडरल तत्त्वावर बनविण्यांत येत आहे. म्हणजे, हिंदुस्थान हा प्रांत राज्यांचा संघ होणार आहे. मध्यवर्ती सरकार आणि त्याचे घटक ह्यांचेमधील अधिकाराच्या बाबी घटना वाटून देणार आहे. त्याचप्रमाणें, त्यांचेमधील उत्पन्नाच्या बाबींचीहि वाटणी होणें क्रमप्राप्तच आहे. दिवसें दिवस आर्थिक प्रश्नांचें महत्त्व अधिकाधिक वाढत आहे आणि त्यांचें नियमन मध्यवर्ती संघटनेकडे असणें श्रेयस्कर आहे. ह्या दृष्टीनें हिंदी यूनियन व त्याचे घटक ह्यांचेमधील आर्थिक संबंध स्पष्ट, मध्यवर्ती अधिकाराकडे कलणारे, परंतु त्याचबरोबर लवचीक असणें इष्ट आहे. प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांनीं हिंदी घटनेच्या मसुद्याची चर्चा ( कॉमेंट्स ऑन दि ड्राफ्ट कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया ) ह्या आपल्या बहुमोल ताज्या पुस्तकांतील एका प्रकरणांत हिंदी यूनियन व त्याचे घटक ह्यांचेमधील उत्पन्नाच्या बाबींच्या योजनेची छाननी केली आहे, ती येथें उद्धृत केली आहे. प्रस्तुत पुस्तक आजच प्रसिद्ध होत आहे. )

हिंद यूनियन व त्याचे घटक ह्यांचेमध्यें सरकारी उत्पन्नाच्या बाबी वाटून देण्यांत आल्या आहेत, त्या १९३५ च्या कायद्याप्रमाणेंच आहेत आणि त्या कायद्यानें सांगितल्याप्रमाणें तपशीलहि पण आहे. ह्या वाटणी पद्धतींत कांहीं बदल घटनासमितीच्या तज्ञ फिनॅन्स कमिटीनें सुचविले होते, परंतु सध्यांची आनीश्चित परिस्थिति लक्षांत घेऊन मूळ मसुद्याच कायम ठेवावा, असें मसुदा कमिटीचें मत पडलें. फेडरल व घटक सरकारांकडे सोपविलेलीं कामें आणि त्यांच्या उत्पन्नाचीं साधनें ह्यांची वाटणी तोलून करणें फेडरल राज्यघटनेंत नेहेमीच अवघड होऊन बसतें. फेडरेशनच्या स्थापनेचे वेळीं जरी न्याय्य वाटणी करतां आली तरी ती न्याय्यता कायम टिकेल अशी कांहींच खात्री नसते. कारण, कार्यक्षेत्र व उत्पन्नाचीं साधनें ह्या दोहोंतहि बदल होत जातो. म्हणून, कोणत्याहि फेडरल राज्यघटनेंतलि करपद्धतीमध्यें लवचीकपणा आणि कमीज्यास्त बदल करण्यास सवड ठेवणें अगत्याचें असतें.

उत्पन्नाच्या बाबींची सध्याची वाटणी मसुदा कमिटीनें कायम राखली असली, तरी इतर बाबीसंबंधीं तज्ञ फिनॅन्स कमिटीच्या महत्त्वाच्या शिफारसी तिनें मान्य केल्या आहेत.

### करांची वाटणी

कांहीं कर यूनियन सरकार तर कांहीं कर घटक सरकारें स्वतंत्रपणें लादून वसूल करतील. परंतु, कांहीं कर यूनियननें बसविले, तरी घटक ते वसूल करून त्यांचा विनियोग करतील. कांहीं कर यूनियन बसवील आणि वसूल करील, परंतु घटकांना ती रक्कम देऊन टाकण्यांत येईल. कांहीं कर यूनियन बसवील आणि वसूल करील, परंतु त्यांची रक्कम यूनियन व घटक ह्यांत विभागिली जाईल. शेवटच्या दोन प्रकारच्या करांवर जादा पट्टी बसविण्याचा यूनियनला अधिकार राहील, आणि ह्या पट्टीची रक्कम यूनियनच्याच मालकीची राहील. घटक सरकारांना ग्रँट देण्याच्या पद्धतीची तरतूद केलेली आहे. ह्या ग्रँटची रक्कम कमीज्यास्त करणें, तिचें घटका–घटकांतलि प्रमाण बदलणें, ग्रँट एकदांच देणें किंवा सालोसाल देणें, तिची रक्कम निश्चित ठरविणें किंवा कशावर तरी अवलंबून ठेवणें, तिचेसाठी अटी घालणें किंवा न घालणें, इत्यादि बाबतींत यूनियनच्या सरकारला मुभा असावी ह्या दृष्टीनें प्रस्तुत तरतुदींची शब्दयोजना केलेली आहे. यूनियन व हिंदी संस्थानें ह्यांतील संबंध प्रत्येक संस्थानाशीं असलेल्या कराराप्रमाणें रहाणार आहेत. ह्या करारान्वयें, त्यांपैकीं कोणत्याहि घटकाच्या कोणत्याहि कराची आकारणी, वसूली, इत्यादि गोष्टी यूनियनचें सरकार स्वतःकडे घेऊं शकेल. पहिल्या भागांतील घटकांना द्यावयाच्या ग्रँटसच्या व्यवस्थेबाबत मूलग्राही तपासणी करविण्यासाठीं दर पांच वर्षांनीं फिनॅनशिअल कमिशन नेमण्याचा अध्यक्षांना अधिकार घटनेच्या मसुद्यानें दिलेला आहे. तिसऱ्या भागांतील घटकांबरोबरील करारांचीहि अशीच तपासणी करवितां येईल. अशा रीतीनें, यूनियन व घटक ह्यांचेमध्यें आर्थिक संबंधांची व व्यवस्थांची विविधता राखण्याची आणि सबंद पद्धतीचीच ठराविक काळानें पहाणी करण्याची तरतूद घटनेच्या मसुद्यानें करून ठेवली आहे.

### घटनेंतील दुरुस्त्या व लवचीकपणा

फेडरल सरकार व घटक सरकारें ह्यांत प्रारंभीं उत्पन्नाच्या साधनांची वाटणी काय केली, ह्यावर करपद्धतीचें यश पूर्णपणें तर नव्हेच, परंतु मुख्यतः सुद्धां अवलंबून नसतें. ज्या करांच्या वाटणीमध्यें ग्रँट वगैरेंच्या पद्धतीनें पुढें सुधारणा आवश्यक होत नाहीं, अशी वाटणी प्रारंभींसुद्धां करणें अत्यंत अवघड असतें. ज्या सुधारणा पुढें आवश्यक वाटतील, त्या घटनेंत दुरुस्ती करण्याच्या कठीण व कालहारी पद्धतीनें घडवून आणणें साधारणतः जमतच नाहीं. तज्ञ फिनॅन्स कमिटीच्या शिफारसी मसुदा कमिटीनें मान्य केल्या नाहींत, ह्यास त्यामुळें विशेष अर्थ आहे असें म्हणतां येणार नाहीं. सध्याची उत्पन्नाच्या बाबींची वाटणी ही घटनेंतील कायमचीच वाटणी ठरल्या सारखी आहे, असें धरून चालण्यास हरकत नाहीं. पाच वर्षांच्या कालखंडानंतरहि उत्पन्नाच्या बाबींच्या वाटणींत विशेष फरक करावा लागेल, असें वाटत नाहीं. कारण, हा फरक घडवून आणण्यास घटनेंत दुरुस्ती करावी लागेल आणि ही दुरुस्ती घडवून आणणें केव्हांहि सोपें नसणारच. यूनियन आणि घटक ह्यांचेमध्यें जे कर विभागले जातात, त्यांच्या विभागणीच्या प्रमाणांत दुरुस्ती करण्यावर व ग्रँटच्या पद्धतींत लवचीकपणा ठेवण्यावरच मुख्य भिस्त ठेवावी लागेल. फेडरल पद्धतींत जेवढा लवचीकपणा शक्य आहे, तेवढा सर्व ह्या दोन मार्गांनीं आणतां येईल.

### शेतीच्या उत्पन्नावरील कर

घटनेच्या मसुद्यांतील करांच्या विभागणीमधील एका बाबीविषयीं, ती जरी घटनाविषयक नसली तरी, जरा विस्तारानें लिहिणें आवश्यक आहे. शेतीच्या उत्पन्नावरील कर व बिगर शेतीच्या उत्पन्नावरील कर ह्यांचेमधील जुना भेद घटनेच्या मसुद्यानें कायमच राखलेला आहे. उत्पन्नाचे हे दोन अगदी स्वतंत्र मार्ग कल्पून सध्याप्रमाणें त्यांतील पहिला मार्ग घटकांना देऊन टाकण्यांत आला आहे. प्रस्तुत कृत्रिम भेद ह्यापुढें तरी कायम राखण्याचें वास्तविक कांहींच प्रयोजन नाहीं. शेतीच्या उत्पन्नावर

जमीनमहसुलाचा बोजा निदान कांहीं प्रांतांत मोठा होता, त्यावेळीं ह्या तफावतीस कांहीं तरी अर्थ होता, असें म्हणतां येईल आणि करपद्धति आणि शेतीच्या उत्पन्नावरील कर जमीनमहसुलाशीं प्रमाणबद्ध करणें त्यावेळीं जरूर वाटत असे, असें त्याचें समर्थन करतां येईल. परंतु आतां जमीनमहसुलाची आकारणी बेताची आहे, आणि सबंद देशांत त्या बाबतींत कांहीं एकवाक्यता आणण्याची प्रवृत्तीहि पण आहे. त्यामुळें, शेतीच्या उत्पन्नावरील कर व बिगर शेतीच्या उत्पन्नावरील कर ह्यांतील तफावतीचें समर्थन ह्यापुढें करणें कठीण होत जाईल. ह्या उलट, ही तफावत कायम ठेवण्यानें होणारे दुष्परिणाम मात्र अधिकाधिक जाणवतील. कित्येकांची शेतजमीन दोन दोन प्रांतांतूनहि आहे. शेतीच्या उत्पन्नावरील कर यूनियनच्या नियंत्रणाखाली आणणें का आवश्यक आहे, हें ह्यावरून लक्षांत येईल. एकाच व्यक्तीची सर्व मालमत्ता व उत्पन्न हीं कर वसूल करणाऱ्या एकाच अधिकारक्षेत्रांत असतील आणि सध्या आहे त्या प्रमाणें शेतीच्या मालमत्तेस व उत्पन्नास कराची माफी नसेल, तर कर चुकविणें कमी सोपें होईल. तफावतीमुळें देश बऱ्याच मोठ्या कराच्या उत्पन्नास मुकतो, हाहि मुद्दा महत्त्वाचा आहे.

दोन्ही पद्धति एकाच नियंत्रणाखाली न रहातां स्वतंत्र राहिल्या, तर प्रत्येकावर दोन्हीकडे कर बसूं शकेल आणि त्यामुळें कराची आकारणी वेगवेगळया स्वतंत्र लहान उत्पन्नावर होऊन कमी दरानें कराची आकारणी होईल. सबंध उत्पन्न एकदमच करास पात्र झालें, तर कराचा दरहि मोठा होतो. मोठ्या प्रमाणावर किंवा भांडवलदार पद्धतीनें शेतींत वाढ जसजशी होईल, तसतशी ही तफावत अधिकाधिकच अप्रस्तुत दिसूं लागेल. म्हणून, शेतीविषयक उत्पन्नावरील करांचा कारभार, वसुली आणि आकारणी हीं नेहमींच्या मामुली इन्कमटॅक्स पद्धतींत आलीं पाहिजेत आणि शेतीचें व बिगर शेतीचें उत्पन्न ह्यांतील फरक तात्काळ नष्ट केले पाहिजेत. जोपर्यंत घटनेमध्येंच शेतीच्या उत्पन्नावरील कर हा नेहमींच्या इनकम टॅक्सचे कक्षेबाहेर ठेवण्यांत येत आहे आणि तो दुसऱ्या अधिकार क्षेत्रांत राहूं दिला जात आहे, तोंवर हा फरक नाहींसा करणें अशक्य होईल. शेतीच्या उत्पन्नावरील कर प्रथम यूनियनच्या करांचे यादींत घातला पाहिजे; इनकमटॅक्सच्या मामुली पद्धतींत तो मग सहाजीक समाविष्ट होईलच. ह्यामुळें, कांहीं घटकांचें करांचें उत्पन्न तात्काळ कमी होईल; परंतु इन्कमटॅक्सच्या वाटणीचें प्रमाण बदलून पूर्व परिस्थिति पुन: स्थापन करतां येईल.

### घटनेंत किरकोळ गोष्टी कशाला ?

घटनेच्या मसुद्यांतील फिनॅन्सवरील प्रकरणासंबंधीं आणखीहि एक मुद्दा विचारार्ह आहे. घटनेमध्यें तत्त्व व आवश्यक तेवढाच तपशील असणें जरूर असतें; अगदी किरकोळ गोष्टींचा त्यांत समावेश टाळण्यांत यावा. असें करणें केवळ सयुक्तिक आहे असेंच नव्हे, तर जो तपशील किंवा जी विशिष्ट बाब आज समाधानकारक वाटेल ती कालांतरानें तशी वाटणारहि नाहीं. असें घडलें म्हणजे घटनेंत दुरुस्ती केल्याविना कोणताच बदल घडवून आणतां येणार नाहीं. घटनेंतील दुरुस्त्यांची जरूरी शक्य तेवढी कमी केली पाहिजे. फिनॅन्सच्या प्रकरणांत मिठावरील कर, तागावरील कराबाबत विशिष्ट व्यवस्था किंवा आसामला द्यावयाच्या ग्रँटचा तपशील, हीं अनावश्यक आहेत. सर्वसाधारण तरतुदींत ह्या प्रत्येक बाबीचा समावेश होऊं शकतो आणि त्यांचा उल्लेख प्रत्यक्ष घटनेच्या मसुद्यांत करण्याचें कारण नाहीं.


# डेक्कन मर्चंटस्
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड
चर्नी रोड, मुंबई नं. ४. (टे. २५२४५.)
दादर ब्रँच—बी.बी. स्टेशनजवळ. (टे. ६१०४५.)

**आपणां सर्वांस ही दिवाळी आनंदाची जावो.**

आम्ही—
सभासदांस सोनें, चांदी व इतर मालाच्या तारणांवर कर्ज देतों, आणि सरकारी व इतर कर्जरोख्यांची देवघेव व बँकिंगचे दुसर सर्व व्यवहार सवलतीचे दरानें करतों.

**सतत ६ टक्के डिव्हिडंड वाटण्यांत आलें.**

ए. ए. वेलदे, बी. ए., बी. कॉम्. — सेक्रेटरी.
एस. एम्. पाटकर — मॅ. डायरेक्टर.

पहिल्याच वर्षापासून ६। टक्के करमाफ डिव्हिडंड वांटून जनतेला चोख काटकसरीची व्यवस्था दाखविणारी संपूर्ण तुमच्याच मालकीची
## श्री शिवाजी नॅशनल बँक लि. कोल्हापूर
(पाटगांवकर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी)
ब्रँच
मिरज (सीनियर)

भांडवलाची सुरक्षितता, पैशाचा योग्य मोबदला, कर्जावरील व ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर, वैशिष्ट्यपूर्ण मंथली फिक्स डिपॉझिटची नाविन्यपूर्ण योजना.
"स्वराज्य बॉन्ड"ची दामदुपटीची अभिनव कल्पना.
शिवाय
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
समक्ष भेटा अगर लिहा.
नारायणराव हणमंतराव साळोखे
कोल्हापूर, लक्ष्मीपुरी. मॅनेजिंग डायरेक्टर

# राष्ट्रीयीकरणाचा तोडगा

## विवेचक दृष्टीची आवश्यकता

लेखक:—प्रा. वृ. गो. कर्वे

अलीकडे जमीन, कारखाने, वहातूक, पेढ्या, दुकानें इत्यादि बहुतेक धंदे सरकारच्या मालकीचे करा अशी मागणी ऐकूं येते. मुख्यत्वेंकरून कामगारवर्गाच्या पुढाऱ्यांकडून अशी मागणी केली जाते, आणि साठेबाजी आणि काळा बाजार ह्यांनीं त्रस्त झालेल्या सामान्य नागरिकांची तिला सम्मति मिळते. कामगारांचे जे पुढारी व इतर नागरिक समाजवादी मताचे आहेत त्यांना सर्व मानवी जीवनाची व्यक्तिनिष्ठेंतून समाजानिष्ठेंत क्रांति घडवून आणावयाची असल्यानें, त्यांनीं राष्ट्रीयीकरणाच्या सर्व मागण्यांना पाठबळ द्यावें हें सहाजीक आहे. परंतु ज्यांची भूमिका निर्भेळ समाजवादाची नाहीं अशा समतावादी व इतर सुधारकांनीं राष्ट्रीयीकरणाच्या प्रत्येक सूचनेचा सांगोपांग विचार करूनच आपलें मत ठरविलें पाहिजे.

राष्ट्रीयीकरण, म्हणजे धंद्याची मालकी, नेतृत्त्व व जबाबदारी खाजगी व्यक्तींकडून काढून घेऊन सरकारवर लादणें, हा सर्व आर्थिक रोगांवर एक रामबाण उपाय अगर तोडगा आहे असें नाहीं. कांहीं विशिष्ट परिस्थितींत कांहीं धंद्यांबद्दल तो जबाबदार सुधारकांनीं सुचविला व पूर्ण विचाराअंतीं कांहीं प्रसंगीं सरकारनें तो अंमलांत आणला. इतर राष्ट्रांचा संपूर्ण अगर अंशतः केलेल्या राष्ट्रीयीकरणाचा अनुभव आपल्याला उपलब्ध आहे. त्यावरून आपल्या देशांत राष्ट्रीयीकरण कोणत्या धंद्यांचें व कसें आणि केव्हां करावें ह्याबद्दल पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे.

### इतर देशांतील अनुभव

उत्पादक धंदे अगर धंद्यांचीं साधनें सरकारच्या मालकीचीं करण्याची सूचना प्रथम इंग्लंडमध्यें शेतजमिनीच्या बाबतींत करण्यांत आली, त्याला शंभर वर्षे होऊन गेलीं. एका बाजूनें लोकसंख्या वाढत असतां देशांतील लागवडीची जमीन मात्र मर्यादित असल्यानें शेतीचा खंड वाढूं लागला. इंग्लंडमध्यें जमिनीची मालकी कसणाऱ्याकडे किंवा खंडावर जमीन घेऊन कामकऱ्यांकडून ती कसून घेणाऱ्या मध्यस्थ खंडकऱ्याकडे नसून, अल्पसंख्याक जमीनदारांकडे असे. त्यामुळें वाढत्या लोकसंख्येबरोबर धान्याचा भाव आणि खंड वाढूं लागला. भाव वाढले ते अर्थात मर्यादित पुरवठ्यामुळें वाढले व त्यांचा परिणाम खंड वाढण्याच्या रूपानें झाला. परंतु समाजहिताचें कोणतेंही काम स्वतः न करतां सामान्य जनतेच्या वाढत्या मागणीनें व महागाईनें जमीनदारवर्गास मिळणारा जमिनीच्या उत्पन्नांतील फार मोठा भाग हा अन्याय्य आहे, अशी समजूत दृढमूल झाली. हा अन्याय दूर करण्याचा उपाय म्हणून जमीनीची मालकी सरकारनें आपल्याकडे घ्यावी, असें सुचविण्यांत सामान्यतः उत्पादनाची मालकी आणि जबाबदारी खाजगी असावी असें म्हणणाऱ्या प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञानींही भाग घेतला.

परंतु त्या काळीं पंडितमान्य आणि सरकारपुरस्कृत धोरण आर्थिक व सामाजिक व्यक्तिस्वातंत्र्याचें असल्यानें ह्या सूचनेला जोराचा पाठिंबा मिळाला नाहीं. शिवाय, खुल्या व्यापाराच्या तत्त्वानुसार ब्रिटिश मालाचा परदेशी फायदेशीर खप होऊन कामकरी आणि व्यापारी ह्यांचें उत्पादन वाढूं लागलें. उलट, परदेशांतून आयात होणाऱ्या खाद्य पदार्थांचे भाव उतरूं लागले म्हणून ह्या प्रश्नाकडे क्रमाक्रमानें दुर्लक्ष झालें. मर्यादित व आवश्यक अशा एखाद्या उत्पादक साधनाची मालकी खाजगी व्यक्तींकडे जाऊन राष्ट्रीय संपत्तीचा फार मोठा भाग त्यांकडे जाऊं लागला तर सरकारनें त्यां साधनांवर आपली मालकी स्थापन करावी, हें तत्त्व अगदी अलीकडे ब्रिटिश सरकारनें कोळशाच्या खाणींच्या बाबतींत अंमलांत आणलें. परंतु ह्यापूर्वीच श्रीमंतांकडून वाढत्या दरानें कर घेऊन त्यांच्या उत्पन्नांतून गरीब वर्गाच्या सुखसोयीकरतां वाढता खर्च करण्याचें धोरण स्वीकारलें गेल्यानें खाणींची मालकी सरकारकडे घेण्यांत सामाजिक अन्याय दूर करण्याचें श्रेय ब्रिटिश सरकारला मिळण्यासारखें नव्हतें. दुसरें महायुद्ध सुरू होण्याचे पूर्वी जवळजवळ दहा वर्षे उद्योगधंदे आणि व्यापार ह्यांत जी अभूतपर्व मंदी आली ह्या.ि त्या काळांत उत्पादनाच्या खाजगी पद्धतीबद्दल पुष्कळ असंतोष कामगार वर्गांत पसरला होता. मजूरपक्षाचें सरकार युद्धानंतर अधिकारारूढ होतांच आगामी काळांत तरी पुन्हां जोराची मंदी येऊं नये ह्या हेतूनें ब्रिटिश सरकार आगगाड्या, खाणी, लोखंड-पोलाद, मध्यवर्ती पेढी, इत्यादिकांच्या मागें लागलें आहे. ह्या धंद्यांपैकीं जे धंदे आतांपर्यंत राष्ट्रीय मालकीचे झाले आहेत त्यांचा अनुभव त्यांच्या राष्ट्रीयीकरणाविषयीं अनुकूल अगर प्रतिकूल मत बनविण्यास अपुरा आहे. त्यांच्या चालू उत्पादनांत म्हणण्यासारखी भर पडलेली नाहीं आणि राष्ट्रीयीकरणामुळें मंदीचा प्रमुख दुष्परिणाम, म्हणजे जनतेच्या राहाणीची पीछेहाट, टळलेली आहे असें म्हणतां येत नाहीं.

### योग्य ठिकाणींच उपयोग केला पाहिजे

सर्व समाजघटनेचें स्वरूपच व्यक्तिविन्मुख व समाजनिष्ठ असावें, असें म्हणणाऱ्या समाजवाद्यांची गोष्ट निराळी. परंतु समतावाद्यांसहित इतर सर्व आर्थिक सुधारकांनीं धंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाकडे विवेचक दृष्टीनें पाहाणें जरूर आहे. समतेच्या दृष्टीनें राष्ट्राच्या निरनिराळ्या आर्थिक विभागांत संपत्तीची अंतिम विभागणी कशी असावी ह्याबद्दल कर आणि खर्च ह्यांच्या बाबतींत जरूर ते बदल करून इष्ट सुधारणा घडवून आणतां येते. मालकांखेरीज इतर वर्गाचे न्याय्य हक्क अनेक तऱ्हेचे कायदे करून संभाळतां येतात. सामाजिक न्याय अगर समता प्रस्थापित करण्याकरतां आतां सार्वत्रिक राष्ट्रीयीकरणाची जरूर राहिलेली नाहीं. राष्ट्रिय संरक्षणाच्या दृष्टीनें युद्धसाधनांसारख्या एखाद्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण करणें अगत्याचें होईल. तसेंच, आर्थिक धोरणांत एकसूत्रीपणा येऊन तें परिणामकारकरित्या सत्वर अंमलांत आणतां यावें म्हणून मध्यवर्ती पेढीचें राष्ट्रीयीकरण हेंही हितकारी ठरेल. इतर धंद्यांच्या बाबतींत, जर एखादा धंदा विशेष महत्त्वाचा असला आणि तो खाजगी व्यक्तींच्या मालकीचा असल्यास त्याची उत्पादक कार्यक्षमता असमाधानकारक राहील अशी खात्री वाटत असली तरच त्याचें राष्ट्रीयीकरण करावें. सरकार म्हणजे सुद्धां देशांतील लोकांपेक्षां अधिक कार्यक्षम असतें असें नाहीं. आतां आपल्या हातांत राष्ट्रहिताच्या दृष्टीनें हवें तें धोरण स्वीकारण्याची सत्ता आलेली आहे. म्हणूनच हें ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, राष्ट्रीयीकरण हा तोडगा नसून, अनेक उपायांपैकीं तो एक उपाय आहे. योग्य ठिकाणीं त्याचा उपयोग केल्यास राष्ट्रीय हित साधणें शक्य आहे, एरवीं नाहीं.

# कामगारविषयक सरकारी धोरण

## परिस्थिति अजून आवाक्याबाहेर गेलेली नाहीं

लेखक:—श्री. शंतनुराव किर्लोस्कर

सध्या कारखानदारांचे पुढें जे अनेक प्रश्न उभे आहेत, त्यांत कामगारविषयक प्रश्न सर्वांत ज्यास्त महत्त्वाचा आहे. त्या प्रश्नानें इतकें उग्र स्वरूप धारण केलेलें आहे, कीं कारखानदारांचें अस्तित्वच आतां अशक्य होण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सरकारनेंहि कामगारांच्या प्रश्नास अवास्तव महत्त्व दिल्या कारणानें, हा प्रश्न अधिकच बिकट होत चालला आहे आणि वेळींच त्याचा नीट विचार झाला नाहीं, तर सर्वच प्रकरण आवाक्याबाहेर गेल्या खेरीज रहाणार नाहीं. वास्तविक पाहातां, हिंदी लोकसंख्येपैकीं कामगार आहेत तरी किती आणि त्यांच्या भरमसाट मागण्यास सरकारनें महत्त्व द्यावें तरी किती? पुढारलेल्या राष्ट्रांतून औद्योगिक कामगारांची संख्या प्रचंड असते; तेथील समाजाचा तो अत्यंत मोठा घटक असतो. हिंदुस्थानांत उद्योगधंदे व कारखाने फारच थोडे आणि त्यांत गुतलेले कामगारहि कमी. सबंद हिंदुस्थानांत मिळून ३० लाखांपेक्षां ज्यास्त औद्योगिक कामगार नसतील. परंतु, त्यांच्या-प्रीत्यर्थ सरकारनें चालविलेल्या कायद्यांचें व योजनांचें प्रमाण पाहिलें, म्हणजे सरकार कामगारांच्या प्रश्नास गैरवाजवी महत्त्व देत आहे, असें म्हटल्याविना रहावत नाहीं. ह्या थोड्याशा कामगारांसाठी भरमसाट सवलती देऊन व त्यांना लाडके करून ठेवून, सरकार कारखानदारांच्या अडचणींत, देशाच्या दुःस्थितींत व लष्करी कमकुवतपणांत न कळत भर घालीत आहे, असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्तीचा फार मोठा दोष येईल असें वाटत नाहीं. कामगारांच्या रहाणीचा दर्जा सुधारला पाहिजे व त्यांना आर्थिक हलाखी भासतां कामा नये, हें निर्विवाद आहे. परंतु, कामगारांप्रमाणें शेतावरील मजूर आणि इतर व्यवसायांत गुंतलेले लोक ह्यांचाहि विचार व्हावयास नको काय? औद्योगिक कामगारांपेक्षां त्यांचीच संख्या मोठी नाहीं काय? संप टळावेत आणि कामगारांचें लक्ष उत्पादनवाढीकडे लागावें, हा सरकारचा हेतु अगदीं योग्य आहे. परंतु, तो साध्य होत आहे काय? परवाच, अहमदाबादच्या गिरणीकामगारांनीं विजयादशमीच्या आधीच्या रविवारीं काम करण्याचें नाकारून कापडाचें उत्पादन ३०–४० लक्ष वारांनीं घटवलें; ही गोष्ट बेकायदा नसली तरी देशहितास धरून आहे काय? कारखानदारांना पिळून मिळेल तेवढा फायदा उपटण्याच्या स्वार्था-पलीकडे जोंवर कामगार पुढारी पहात नाहींत, तोंवर त्यांना खुष करण्याचें सरकारी धोरण देशहितास पोषक होणें कठीण.

### औद्योगीकरणाचें लष्करी महत्त्व

हिंदुस्थानाची आजची औद्योगिक परिस्थिति केवळ नागरी पुरवठ्याच्या दृष्टीनेंच नव्हे, तर लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीनेंहि अत्यंत असमाधानकारक आहे आणि ती सुधारण्याचे कामीं दूरगामी व प्रभावी उपाययोजना आखली पाहिजे; तात्कालिक उपायांचा अवलंब करून केवळ मलमपट्टी लावण्याचें धोरण सोडून दिलें पाहिजे. जरूर तर शस्त्रक्रियाहि केली पाहिजे. गेल्या महिन्यांत हैद्राबादविरुद्ध पोलिसी योजना सरकारनें केली त्यावेळीं हिंदुस्थानाचें लष्करी सामुग्रीबाबत परावलंबित्व स्पष्टपणें दिसून येत होतें. इंग्रजांनीं हा देश सोडून देतांना जी सामुग्री मागें टाकली, तिचे आधारावरच आपल्या फौजा कूच करीत होत्या. स्वतंत्र हिंदुस्थानास आतां नव्या शस्त्रास्त्रांनीं मोठ्या प्रमाणावर बचावाची अगर आक्रमणाची तयारी ठेवावी लागली, तर लक्षावधि सैनिक सुसज्ज करावे लागतील. एक सैनिक युद्धांत लढत ठेवण्यास १०० कामगारांचें उत्पादन मागें चालू ठेवावें लागतें, ह्या हिशेबानें ४ कोटी कामगारांचें सहकार्य घेऊन व हजारों कारखाने चालवून आपण आपले उद्योगधंदे अद्यावत करावे, तेव्हां कोठें ४ लक्ष सैनिक लढूं शकतील. आजच्या कामगार संख्येच्या आधारावर आपणांस ३० हजार सैनिकहि युद्धांत गुंतवितां येणार नाहींत. औद्योगीकरण केवढ्या मोठ्या प्रमाणावर व्हावयास पाहिजे, ह्याची कल्पना वरील आकड्यांवरून येऊं शकेल. हें औद्योगिकरण कोणी घडवून आणावयाचें? त्यांत प्रचंड भांडवल कोणीं गुंतवावयाचें? चालू कारखान्यांचें राष्ट्रीयीकरण न करतां फक्त कांहीं नवे उपक्रम सरकारनें सुरू करावे, हें सरकारी धोरण योग्यच आहे; कारण सरकारजवळ राष्ट्रीयीकरणास लागणारें भांडवल आहे कुठें? आतां तर, जे उपक्रम तात्काळ फलदायी नाहींत, तें पुढें ढकलण्याचें धोरण सरकारनें तज्ज्ञांच्या साह्यानें आखलें आहे. म्हणजे, कारखाने वाढविण्याचें राष्ट्रीय महत्त्वाचें काम भांडवलदारांकडेच येऊन पडलें आहे. कामगारांच्या सध्याच्या मनोवृत्तींत फरक झाल्याविना, पैसे गुंतविणारास नवे उपक्रम हातीं घेण्यास प्रोत्साहन कसें वाटणार? जादा करांचा भार सोसूनहि कारखानदार आपल्या हिंदुस्थानासाठी कसोशीचे प्रयत्न करून औद्योगीकरणास हार्दिक पाठिंबा देतील; परंतु त्यांना सरकारनें एखाद्या अपराधी गुन्हेगाराप्रमाणें वागविण्याचें सोडून दिलें पाहिजे. कामगार म्हणेल तें बरोबर; कारखानदाराची बाजू नेहेमीच लंगडी, ही भूमिका सरकारनें बदलल्याविना आणि औद्योगिक प्रश्नांकडे स्वतंत्र बुद्धीनें व कोणतीहि आढी न ठेवतां पाहिल्या खेरीज कारखानदारांचें समाधान होणार नाहीं.

### देशाच्या स्वास्थ्याचा व भवितव्याचा प्रश्न


उत्पादनवाढीसाठी जादा कामाची, कमी सुट्ट्यांची आज आवश्यकता असतांना, नेमक्या उलट बाजूनें पाऊल पडत आहे. युद्धकाळाप्रमाणें आजची हिंदुस्थानाची आणीबाणीची परिस्थिति असल्याकारणानें, सर्व उपलब्ध शक्तीचा उपयोग ती सुधारण्याकडे होणें आवश्यक आहे. ही गोष्ट कामगारांपुरतीच मर्यादित नाहीं, तर सरकारी—खाजगी कचेऱ्या व इतर व्यवसायी ह्यांनीं सुद्धां आपल्या कामाच्या तासामध्यें वाढ करून कामाचा उठाव वाढविला पाहिजे. सुखवस्तु व रिकामटेकड्या—सरदारांपासून थेट भिकाऱ्यापर्यंत — लोकांचा आज देशावर निष्कारण भार पडत आहे, कारण त्यांच्या हातून उत्पादक असें कांहींच कार्य होत नाहीं. त्यांचाहि उत्पादन वाढीकडे उपयोग करून घेतला पाहिजे. ज्याच्या त्याच्या दर्जा-प्रमाणें काम देता आलें नाहीं, तरी बुद्धीच्या व शरीराच्या शक्ती-प्रमाणें तें खास देतां येईल व तें काम सक्तीनें करवून घ्यावें लागेल. प्रस्तुत लेखाच्या कक्षेंत ह्या बाबी येत नसल्यामुळें त्यांची चर्चा येथें विस्तारानें केलेली नाहीं. एवढें मात्र खरें, कीं आजच्या आर्थिक दुःस्थितीची बरीच मोठी जबाबदारी कामगारवर्गाच्या अडवणुकीच्या व देशहित विरोधी धोरणावर पडत आहे आणि त्यांत त्यांनीं आपण होऊन सुधारणा केली नाहीं, तर अखेर ती करावयास लावावी लागेल. अर्थात्, स्वयंस्फूर्तीनें त्यांनीं आपलें धोरण बदलण्यांतच त्यांचें व देशाचें अधिक हित आहे. त्यांची कार्यक्षमता तात्काल वाढवि-ण्यास सहायकारक व्हावें असा सरकारचा आजच्या धोरणाचा परिणाम होण्याजोगा नाहीं. काम न करणाऱ्या, कमी काम करणाऱ्या,

कामांत चुकारपणा करणाऱ्या कामगारांस कामावरून दूर करण्याचे मार्गांत अनेक कायदेशीर अडचणी आहेत आणि कित्येक कारखाने म्हणजे केवळ पांजरपोळ बनूं लागले आहेत ! सरकार कारखानदारांकडून ज्या अपेक्षा करतें, त्या पुऱ्या पाडण्यास कामगारांचें जें सहकार्य कारखानदारांस मिळावयास हवें, तें मात्र त्यांना मिळत नाहीं आणि सरकारच्या सहानुभूतीचा अर्थ कामगार निर्बलता असा लावतात व आपलें अडवणुकीचें घोडें पुढें दामटतात. आर्थिक अरिष्टावर सरकारनें जें धोरण नुकतेंच जाहीर केलें आहे, त्यांत कामगारांना जरा समज दिली असती तर बरें झालें असतें. अजूनहि परिस्थिति आटोक्याबाहेर गेलेली नाहीं, हें जाणून सरकारनें कामगारविषयक आपलें धोरण ज्यास्त व्यवहार्य व परिस्थितीस अनुरूप असें ठेवलें तरी पुष्कळसें नुकसान वेळींच टळेल. कारखाने चालू ठेवण्यास व वाढविण्यास पोषक असें वातावरण राहिलें नाहीं, तर पैसेवाल्यांच्या पैशाचा ओघ कमी श्रमाच्या आयात-निर्गतीच्या व्यापाराकडे ज्यास्तच वळेल व कारखानदारीसारख्या आवश्यक उद्योगांकडे दुर्लक्ष्य होईल. त्यामुळें देशाची आर्थिक व औद्योगिक परिस्थिति अधिकच बिकट होऊन मागाहून पस्तावण्याची पाळी येईल.

कामगारांचें अडवणुकीचें धोरण भांडवलदार वर्गापुरतेंच मर्यादित असतें, तर प्रश्न तितकासा अवघड वाटला नसता; कारण सरकारी व बिनसरकारी मालकीचे कारखाने, रेल्वे, गोद्या, इत्यादींत शांतता व कार्यक्षमता दिसून आली असती व भांडवलदारांचे पदरीं चुकीचें माप टाकतां आलें असतें. परंतु, सर्वच ठिकाणचे कामगार सगळ्याच ठिकाणीं काम कमी करून उत्पादनवाढीस अडथळा आणतात, त्याचा अर्थ काय? कामगारांची ही संवय पुढें येणाऱ्या कोणत्याहि सरकारास जाचक झाल्याविना रहाणार नाहीं. सरकारी मालकीच्या उद्योगांतहि शैथिल्य वाढलें आणि खासगी भांडवलदारहि नव्या उपक्रमांत भांडवल गुंतविण्यास बिचकूं लागले, तर उत्पादनवाढीस त्राता तरी कोण उरला ? आणि औद्योगिक उत्पादनाचे अभावीं देश मोठ्या संकटांत सापडला तर त्याला जबाबदार कोण ? कामगारांच्या प्रश्नाचें हें संभाव्य भीषण स्वरूप लक्षांत घेऊन, त्यावर आजच उपाययोजना केली पाहिजे. कारखानदारांच्या स्वार्थाचा हा प्रश्न नसून सबंद देशाच्या स्वास्थ्याचा व भवितव्याचा तो प्रश्न आहे आणि त्या दृष्टीनेंच तो धीटपणानें सोडविला पाहिजे.








-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
-खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
दमडेरे बोळाजवळ
पुणें २

# महाराष्ट्रांत युद्धकालीं निघालेल्या सुताच्या गिरण्या

लेखकः—श्री. आ. रा. भट, एम्. कॉम्.

गेल्या जागतिक महायुद्धांत सर्वच प्रकारच्या उपयुक्त वस्तूंना मागणी वाढली. परदेशांतून हिंदुस्थानांत माल येणें कठीण झालें. हिंदुस्थान हें युध्यमान राष्ट्र असलें तरी प्रत्यक्ष युद्ध हिंदुस्थानाच्या भूमीवर लढलें गेलें नाहीं. यामुळें युद्धकाल नवीन उद्योगधंदे काढण्यास व जुने वाढीस लावण्यास विशेष अनुकूल होता. त्याचा फायदा ज्याच्या ज्याच्या जवळ उत्पादन–योजकता होती, त्यानें त्यानें घेतला. युद्धकाल ही औद्योगिक वाढीला जशी संधी होती, त्याप्रमाणेंच त्या काळांत नवीन उद्योगधंदे सुरू करण्याच्या मार्गांत अडचणीहि होत्या. पहिली मोठी अडचण अद्ययावत् नवीन यंत्रसामुग्री मिळण्याची व दुसरी आवश्यक कच्चा माल मिळण्याची. परदेशांतून यंत्रसामुग्री येणें तर अशक्यप्रायच होतें. त्यामुळें ज्यांना नवीन उपक्रम करावयाचे होते, त्यांना जुनी यंत्रसामुग्री, ज्यांचे धंदे प्रतिकूल परिस्थितीमुळें बंद पडले होते वा ज्यांना कोणत्या ना कोणत्या कारणामुळें आपले धंदे चालवावयाचे नव्हते, अशांकडून घ्यावी लागली अगर येथलि तुटपुंज्या साधनसामुग्रीनें तयार करावी लागली. अशा जुन्या वा ओबडधोबड यंत्रसामुग्रीनें बनविला जाणारा माल उत्तम प्रतीचा होण्याची शक्यता नव्हती, परंतु युद्धकालांत कोणतीहि उपयोगाला येणारी वस्तु बऱ्या भावानें खपत होती! जो कच्चा माल हिंदुस्थानांत होत असे, तो वाढत्या भावानें कारखान्याला मिळण्याची अडचण नसे. परंतु कच्चा माल हरविध लागतो. तो सर्वच हिंदुस्थानांत होत होता असें नाहीं. त्यामुळें ज्याचा साठा मर्यादित होता, अशा कच्च्या मालाच्या वाटपावर नियंत्रण होतें. तो माल नवीन उद्योगधंदेवाल्यांना अनेक युक्त्या लढवून मिळवावा लागे.

## युद्धकालीन नवे उपक्रम

महाराष्ट्रांत एवंगुण विशिष्ट युद्धकालीन परिस्थितींत जे अनेक लहानमोठे औद्योगिक उपक्रम झाले त्यांत सुताच्या गिरण्या काढण्याचा एक होता, व तो मिरज ( धाकटी पाती ), भोर व मिरज (थोरली पाती ) या संस्थानांत झाला. भोरला विद्युत्शक्ति विपुल मिळण्याची शक्यता व मिरज—माधवनगरला कपाशीच्या उत्पादनाच्या क्षेत्रांचें सान्निध्य या गोष्टी गिरण्या काढण्याला धंद्या या दृष्टीनें अनुकूल होत्या. त्याचप्रमाणें या संस्थानांच्या अधिपतींनीं नवीन कारखान्यांना दिलेल्या सवलतींचें आकर्षणहि या तीन गिरण्यांच्या प्रवर्तकांना होतें. भोरची लक्ष्मी टेक्स्टाइल मिल राजर्षि कंपनीचे श्री. माधवराव देसाई प्रभृतींनीं पुढाकार घेऊन १९४४ मध्यें सुरू केली व १९४५ मध्यें राजा रघुनाथराव मिलचे श्री. दत्तोपंत फाटक, श्री. हरिहर रामकृष्ण करंदीकर प्रभृती चालकांचें श्री. देसाई यांना सहकार्य लाभलें. लक्ष्मी टेक्स्टाइल मिलमध्यें सुमारें ४,००० चात्या आहेत. बुधगांवनजीक माधवनगरला मुंबईच्या स्वास्तिक पातळांचे कारखानदार श्री. गं. ल. नातू व श्री. पु. का. दिवेकर यांनीं पुढाकार घेऊन माधवनगर टेक्स्टाइल मिल सुरू केली. तिच्यामध्यें सुमारें ६,००० चात्या आहेत. याच सुमारास इचलकरंजीचे श्री. मराठे यांनीं मिरज येथें २,७९६ चात्यांची गिरणी सुरू केली.

या सर्व सूत–चात्या बंद पडलेल्या गिरण्यांतील अगर चालू गिरण्यांजवळील जादा असलेल्या साठ्यांतील होत्या. दूरदूरच्या ठिकाणांहून त्या महाराष्ट्रांत आणून बसवितांना व त्याकरतां आवश्यक त्या इमारती बांधतांना युद्धकालीन महर्गता, वाहतुकीची अडचण व बांधकामाच्या साहित्याची टंचाई लक्षांत घेतां, किती अडचणींना तोंड द्यावें लागलें असेल, याची कल्पनाच केलेली बरी. युद्धपूर्वकालाशीं तुलना केल्यास या गिरण्यांना उभारणीचा खर्च तिपटीनें अधिक आला. इतका जादा भांडवली खर्च करूनहि त्यांनीं ह्या सर्व ठिकाणीं गिरण्या सुरू केल्या. याचें कारण त्यांची अशी अपेक्षा असावी कीं, युद्धकालांतच शक्य त्या कार्यक्षमतेनें काम करून आपण युद्ध संपेपर्यंत हा जादा खर्च भरून काढूं व युद्धोत्तर नवीन यंत्रसामुग्री आणून धंद्याची वाढ करूं.

## अडचणी

परंतु या गिरण्यांपुढें नवीनच अडचण उभी राहिली. ती म्हणजे १९४३ चा कापूस–सूत नियंत्रणाचा हुकूम ही होय. या हुकमाअन्वयें गिरण्यांच्या उत्पादनाची वाटणी करण्याचा व सूत-कापडाच्या किंमती नियंत्रित करण्याचा अधिकार सरकारनें आपल्याकडे घेतला. यामुळें मुळांत भांडवली खर्च जुन्या गिरण्यांच्या तिपटीनें झालेला असून व चात्यांची संख्या कमी असल्यानें उत्पादन विषयक देखरेख आदि बाबींवर खर्च सुताच्या दर पौंडामागें अधिक असूनहि या नवीन गिरण्यांच्या सुताला जुन्या गिरण्यांच्या सुताइतकाच भाव देण्यांत आला! यामुळें मागणी–पुरवठा नियमानुसार त्यावेळीं सुताचा तुटवडा असल्यामुळें खुल्या बाजारांत पुरेशी फायद्याची कूस रहाण्या इतका भाव मिळेल ही अपेक्षा फोल ठरली. तसेंच या गिरण्या १९४१ पूर्वीं अस्तित्वांत नव्हत्या या सबबीवर जुन्या गिरण्यांप्रमाणें नियंत्रित भावानें त्यांना लागणारा स्टोअर्स प्रमाणतः देण्याचें सरकारनें नाकारलें. त्यामुळें त्यांना त्या वस्तू पडेल त्या भावानें सहाजीकच विकत घ्याव्या लागल्या. या अनेक अडचणींना मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फें त्यावेळचे व्यापारमंत्रि पै. सर महंमद अझिझुल हक यांजकडे एप्रील, १९४५ मध्यें गेलेल्या शिष्टमंडळानें वाचा फोडली. त्यानंतर मार्च १९४१ नन्तर सुरू झालेल्या गिरण्यांची ‘ वॉर टाइम टेक्स्टाइल मिल्स ॲसोसिएशन ’ या नांवाची संघटना माधवनगर कॉटन मिल्स लि. चे मॅनेजिंग एजंट श्री. पु. का. दिवेकर यांच्या अध्यक्षतेखालीं निर्माण झाली. तिनें हिंदुस्थान सरकारच्या उद्योगधंदे व पुरवठा खात्याचे सेक्रेटरी सर एम्. एस. अकबर हैदरी ( सध्यांचे आसामचे गव्हर्नर ) यांना एक सविस्तर निवेदन सादर करून त्यांच्या नजरेस आपल्या मागण्या आणल्या.

## गिरण्यांच्या मागण्या

पहिली मागणी अशी होती कीं, जुन्या व मोठ्या गिरण्यांहून निराळें असें या कमी चात्यांच्या गिरण्यांचें वर्गीकरण करावे व जुन्या गिरण्यांच्या सुतापेक्षां त्यांना तीस टक्के भाव अधिक द्यावे. ही मागणी अगदीं न्याय्य होती. कारण, पॉवरलूम्सच्या कारखान्यांचें पॉवरलूम्सची कमी संख्या असलेले व मोठे असें वर्गीकरण सरकारनें केलें होतें व लहान कारखान्यांना अधिक भाव मिळण्याची सवड निर्माण केली होती. परंतु ही मागणी मान्य झाली नाहीं. दुसरी मागणी, सरकारनियंत्रित मिल स्टोअर्सच्या वाटपांत या गिरण्यांना सहभागी करावें अशी होती. ही मागणीहि सयुक्तिक होती; कारण जर सरकार या गिरण्यांत तयार झालेलें सूत आपल्या नियंत्रणांत

समाविष्ट करीत होतें, तर इतर गिरण्यांप्रमाणें त्यांनाहि नियंत्रित भावांत प्रमाणतः स्टोअर्स सरकारनें मिळण्याची व्यवस्था करावयास हवी होती. परंतु, त्यावेळीं आपलें धोरण बड्या गिरणीवाल्यांच्या टेक्स्टाइल कंट्रोल बोर्डाच्या सल्ल्यानें सरकार ठरवीत होतें व हे गिरणीवाले लहान गिरण्यांच्या गाऱ्हाण्यांची दखलगिरीहि घ्यावयास तयार नव्हते. जुन्या गिरण्यांनाच पुरेसा स्टोअर्स मिळत नसल्यानें या नव्या गिरण्यांचा विचार करतां येत नाहीं, हें ठराविक ठशाचें उत्तर या लहान गिरण्यांना मिळत असे. वस्तुतः या नव्या गिरण्या जुन्या गिरण्यांचेच भाग होते, असें म्हटलें तरी चालेल. कारण, त्या जुन्या गिरण्यांतील चात्या विकत घेऊनच निघाल्या होत्या. म्हणजे, खऱ्या अर्थानें त्या नव्या नव्हत्याच. परंतु त्यावेळच्या उद्योगधंदे–पुरवठा खात्यानें सारासार विचारबुद्धीला फाटा दिला होता.

देशी संस्थानांत असल्यानें त्यांना ब्रिटिश हिंदुस्थानांतील कारखान्यांना लागू असणारे सर्वच कायदे लागू नव्हते व संस्थानाधिपतींचीहि सहानुभूति होती. म्हणून इतक्या प्रतिकूल परिस्थितींतहि या गिरण्यांच्या चालकांना प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन आपला धंदा चालू ठेवतां आला. युद्धोत्तर कालांत सुताच्या धंद्याची पुनर्घटना करण्याकरतां म्हणून टेक्स्टाइल पॅनेलच्या शिफारशींनुसार मुंबई प्रान्तांतील सूत गिरण्यांच्या पुनर्घटनेकरता ( मुंबई प्रांत हा सूत–कापडाच्या उत्पादनांत अग्रेसर असल्यानें या प्रान्तांत नवीन गिरण्या काढूं नयेत, अशी पॅनेलची शिफारस होती. ) ज्या १ लक्ष, ४० हजार नव्या चात्या मंजूर झाल्या त्यांची वांटणी करतांना या युद्धकालीन कमी चात्यांच्या गिरण्यांच्या वाढीकरतां पुरेशा नव्या चात्या मंजूर करावयास हव्या होत्या. परंतु, सरकार बड्या गिरणीवाल्यांच्या इतकें आहारी गेलें होतें कीं, त्यांना या गिरण्यांची मूळ वाटणींत आठवणहि झाली नाहीं. जेव्हां या गिरण्यांनीं दार ठोठावलें तेव्हां माधवनगर कॉटन मिल्सला दोन हजार, मराठे टेक्स्टाइल मिल्सला पांच हजार दोनशें व लक्ष्मी टेक्स्टाइल मिल्सला चार हजार जादा चात्या घालण्याची परवानगी देण्यांत आली. परंतु तेवढ्यानें सदर गिरण्या फायदेशीर चालण्याकरता आवश्यक तेवढी चात्यांची संख्या पुरी होत नव्हती. तसेंच या सूत गिरण्यांना पॉवर लूम्सची जोड देण्याची परवानगी देण्यांत आली नव्हती. माधवनगर कॉटन मिल्स व मराठे टेक्स्टाइल मिल्स यांनीं त्यांना मंजूर झालेल्या चात्यांची मागणी विलायतेंतील कारखानदारांकडे नोंदवली असून माधवनगर कॉटन मिल्सच्या चात्या मुंबईंत उतरल्याहि आहेत. हिंदुस्थानांत चात्या नव्यानेंच करणाऱ्या ॲक्मे कंपनीकडून त्यांना मंजूर झालेल्या जादा चात्या घेण्याचा लक्ष्मी टेक्स्टाइल मिल्सचा विचार असून सदर कंपनीनें तयार केलेल्या चात्यांची परीक्षा ( ट्रायल ) चालू आहे. सदर चात्या कसोटीस न उतरल्या तर परदेशांतून आणवल्या जातील. या नव्या चात्या उभारण्याकरतां आवश्यक ती नवी इमारत बांधून पुरी होत आली आहे.

### नियंत्रणामुळें पुनः अडचणी

सुताचें वांटप व भाव यांवरील युद्धकालीन नियंत्रणाचा जाच हिंद सरकारानें चालू वर्षी सूत–कापडावरील नियंत्रण उठवल्यामुळें नाहींसा होऊन, या गिरण्यांना हायसें वाटलें. परंतु, विनियंत्रणाचा प्रयोग गळ्यांत आल्यानें गेल्या ऑगस्टच्या प्रारंभीं हिंद सरकारनें पुनः सूत–कापडावर नियंत्रण बसविण्याचें ठरविल्यानें युद्धकालीन नियंत्रणांच्या अंमलबजावणींत जसा या गिरण्यांना अन्याय झाला तसा होतो कीं काय अशी भीति त्यांच्या चालकांपुढें दत्त म्हणून उभी राहिली. त्यांची बाजू मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजनें हिंदचे उद्योगपुरवठा मंत्रि ना. डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी व त्यांच्या खात्याचे सेक्रेटरी श्री. एस्. ए. वेंकटरमण यांच्या पुढें मांडली आहे. ती थोडक्यांत अशी:

सूत–कापड धंद्याच्या युद्धोत्तर * नियोजन समितीनें ( पॅनेलनें ) या धंद्यांतील गिरणी पूर्णतः फायदेशीर होण्यास ती २५,००० चात्यांची असून ती तलम सूत कातणारी असेल तर दर ४५ चात्यांना एक माग व जाडें सूत कातणारी असेल तर ३२ चात्यांना एक माग या प्रमाणें तिला यंत्रशक्तीनें चालणाऱ्या मागांची जोड हवी, असें स्पष्टपणें नमूद केलेलें आहे. महाराष्ट्रांत युद्धकालीं निघालेल्या या गिरण्या वरील दृष्टीनें आर्थिक दृष्ट्या प्रमाणित नाहींत व त्यांचा उत्पादनाचा खर्च त्यामुळें अधिक आहे. त्या खेरीज, युद्धकालीन महागाईंत त्यांची उभारणी झाल्यानें त्यांच्यावर व्याज–घसारादींचा बोजा अधिक आहे तो वेगळाच. सद्यःस्थितींत २० नंबरच्या सुतापर्यंत दर पौंडामागें जुन्या मोठ्या गिरणीशीं तुलना करता त्यांचा उत्पादनाचा खर्च सुमारें चार आण्यांनीं अधिक आहे. सबब या गिरण्यांच्या २० नंबरापर्यंतच्या सुताला दहा पौंडाच्या बंडलामागें जुन्या गिरण्यांच्या सुतापेक्षां जादा अडीच रुपये किंमत आकारण्यास परवानगी द्यावी नि त्यांचें सूत महाग असल्यानें तें अमुकच भागांत विकावें असें बंधन नसावें; अगर पॉवरलूम्स व हातमाग यांच्यावर निघणाऱ्या कापडाचा उत्पादन खर्च अधिक असल्यानें त्यांचा माल ज्याप्रमाणें भाव नियंत्रणांतून वगळण्यांत आला त्याप्रमाणें या कमी चात्यांच्या गिरण्यांचें सूतहि नियंत्रणाबाहेर ठेवावें. श्री. वेंकटरमण यांच्या बरोबर मराठा चेंबरच्या शिष्टमंडळाच्या झालेल्या मुलाखतींत त्यांनीं मोठ्या सुताच्या गिरण्या व सीमान्त( मार्जिनल )गिरण्या असें वर्गीकरण करून सीमान्त गिरण्यांच्या सुताला कांहीं अधिक भाव १ नोव्हेंबरपासून देण्याचा सरकार विचार करील, असें आश्वासन दिलें आहे. नियंत्रित स्टोअर्स या गिरण्यांना देण्याबाबतहि सरकारचें धोरण सहानुभूतीचें आहे. सांप्रत " कार्ड क्लोदिंग " हा एकच प्रकारचा मिल स्टोअर्स नियंत्रित असून या गिरण्यांना त्यांचा प्रमाणशीर हिस्सा मिळत आहे. अपवाद करून त्यांच्यापैकीं एका गिरणीला जादा "फिलेट" खरेदी करण्याची परवानगीहि सरकारकडून मिळाली आहे.

परंतु, या गिरण्यांचा प्रश्न त्यांचें वर्गीकरण सीमान्त (मार्जिनल) गिरण्या म्हणून करूनहि सुटण्यासारखा नाहीं. कारण, त्या सीमान्त नसून त्याहिपेक्षां खालच्या वर्गीतील आहेत. त्यामुळें त्यांचें वर्गीकरण हिंदुस्थानांतील तत्सदृश इतर गिरण्यांसह स्वतंत्र करून त्यांच्या गरजांचा विचार व्हावयाला हवा. या सर्व गिरण्यांच्या चालकांची इच्छा चात्या वाढवून त्यांची गणना फायदेशीर घटकांत व्हावी अशीच आहे. परंतु आज परिस्थिति अशी आहे कीं, परदेशी कारखानदारांना आर्डर देऊनहि नव्या चात्या तातडतोब मिळूं शकत नाहींत. मराठा चेंबरनें सादर केलेल्या निवेदनाला हिंद सरकारच्या उद्योगधंदे पुरवठा खात्याकडून आलेल्या उत्तरांत तसें नमूद केलेलें आहे.

### सुतास योग्य किंमत दिली पाहिजे

अशा परिस्थितींत या गिरण्यांची पुरेशी वाढ होईपर्यंत त्यांत गुंतवलेल्या भांडवलावर योग्य तें व्याज पडेल व पुरेसा घसारा निघूं शकेल इतक्या त्यांच्या सुताच्या किंमती सरकारानें ठरवून दिल्या पाहिजेत. तशा त्या ठरवून दिल्या व त्यांना तें सूत उत्पादक घटकांना कोठेंहि विकण्यास परवानगी दिली, तर नवीन नियंत्रणाखालील वांटप योजनेंत पॉवरलूम व हातमाग यांना त्यांच्या गरजेइतकें सूत मिळण्याची मुळीच शक्यता दिसत नसल्यानें, यांचें महाग

सुतीहि विकलें जाईल व त्या गिरण्या जगूं शकतील. युद्धकालीं त्यांच्या बाबतींत त्या वेळच्या सरकारनें अन्याय करूनहि त्या जगूं शकल्या याचें एक कारण त्या संस्थानांत होत्या. आतां तीं संस्थानें हिंदी संघराज्यांत विलीन झाल्यानें या गिरण्यांना हिंदी संघराज्याचे कायदे लागू झाले आहेत. बदललेल्या परिस्थितींत संस्थानाधिपतींकडून मिळालेल्या सवलती कितपत चालू राहतील, हा प्रश्नहि अजून अनिर्णीत आहे.

या अल्पसंख्य चात्यांच्या गिरण्या बंद पडल्या तरी चालतील; त्यांच्या चालकांनीं त्या काढाव्या म्हणून सरकारानें त्यांना थोडेंच सांगितलें होतें ? अशी अतिरेकी भाषाहि कांहीं ठिकाणीं ऐकण्यांत येते. परंतु ती राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें घातक आहे. या गिरण्या आपल्या परीनें अल्पस्वल्प कां होईना, सुताच्या उत्पादनांत भर घालीत आहेत. सरकारनें त्यांना दीर्घकाल संरक्षण द्यावें असेंहि त्यांचें म्हणणें नाहीं. जादा चात्या घालून आवश्यक तेवढी वाढ करण्याची त्यांच्या चालकांची तयारी आहे. परंतु आज परदेशांतहि हव्या तेवढ्या नव्या चात्या ताबडतोब मिळत नाहींत व त्याकरतां लागणाऱ्या इमारतीसाठी देण्यास सरकाराजवळ पुरेसें लोखंड नि सीमेंटहि नाहीं. अशा परिस्थितींत संक्रमणकालांत त्यांचें संरक्षण करणें, हें सरकारचें कर्तव्य आहे. देशांत पुरेसें सूत निर्माण होत नाहीं म्हणून सरकार परदेशी सुताची आयात करण्यास परवानगी देत आहे. या परदेशी सुताचा दर सरकारनें ठरवून दिलेल्या दराच्या सवाई–दिढी इतका आहे. परदेशी सूत जर सरकार इतक्या महाग दरानें आणवूं देतें, तर या अल्पसंख्य चात्यांच्या गिरण्यांना त्यांचें सूत महाग दरानें विकण्यास सरकारनें परवानगी देणें इष्ट नि योग्य आहे. आपण कोणत्या दरानें सूत कोणाला विकलें याची सरकार मागेल ती माहिती सदर गिरण्यांचे चालक सरकाराला पुरवण्यास तयार आहेत. तेव्हां, परदेशांतून व स्वदेशांतून त्यांच्या वाढीकरतां आवश्यक तेवढ्या चात्या मिळून त्या बसवण्याकरता लागणाऱ्या इमारती बांधण्यास जरूर तें बांधकामाचें साहित्य योग्य दरानें उपलब्ध होईपर्यंत त्या तगून राहण्याकरतां त्यांच्या सुताला किती दर देणें योग्य, हें सरकारानें टॅरिफ बोर्डामार्फत चौकशी करून ठरवणेंच इष्ट होय.

---

**चीनमधील चलनाची सुधारणा**—चीनच्या हिंदुस्थानांतील वकिलानें दिल्ली येथें भाषण करतांना असें सांगितलें कीं, चीनमधील चलनासंबंधी करण्यांत आलेली सुधारणा टिकवून धरण्याचा आटोकाट प्रयत्न चिनी सरकार करीत आहे. चीनमधील चलनवृद्धी आतां आटोक्यांत आली असून आर्थिक पुनर्घटनेचें कार्य जोरांत सुरू असल्याचेंही त्यांनीं सांगितलें. चीनमधील चलनवृद्धीची कारणें त्यांनीं पुढीलप्रमाणें सांगितलीं: (१) जपानविरोधी चाललेल्या ८ वर्षांच्या लढाईत चीनचा खजिना जवळजवळ रिकामा झाला. (२) जपाननें समुद्रकिनाऱ्याची कोंडी केल्यामुळें आयात बंद होऊन मर्यादित पुरवठा असलेल्या मालाच्या किंमती वाढल्या. (३) विजयानंतर चिनी लोक जरूरीच्या व चैनीच्या वस्तू मोठ्या प्रमाणावर खरेदी करूं लागले. (४) चिनी कम्युनिस्टांनीं बंड केल्यामुळें सरकारला लष्करावर खूप खर्च करावा लागला. त्याशिवाय, आर्थिक व औद्योगिक पुनर्घटना करणेंही यादवीमुळें अवघड होऊन बसलें.

**विजेचे कारखाने मद्रास सरकारनें घेतले**—शहरांतून व खेड्यांतून विजेचा पुरवठा योग्य रीतीनें करण्याच्या हेतूनें मद्रास सरकारनें प्रांतांतील सर्व खाजगी मालकीच्या विजेच्या कंपन्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें आहे, असें समजतें.


# दि बँक ऑफ कराड, लि.

कराड, ( जि. सातारा )

( स्थापना : १९४६ )

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे ( चेअरमन ) कराड
„ द्वारकादास हरिदास वखारिया, J. P. मुंबई
„ विष्णू रामचंद्र वेलणकर सांगली
„ शंकरराव प्रभाकर ओगले ओगलेवाडी
„ मेजर सरदार बी. एन्. पाटणकर सातारा
„ पांडुरंग केशव शिराळकर कराड
„ गोपाळ रामकृष्ण काळे कराड
„ खानसाहेब हाजी अलीमहमद कासम कराड
„ डॉ. वामन गोविंद देशपांडे कराड
„ विष्णू दत्तात्रय शिराळकर (मॅनेजिंग डायरेक्टर)

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

विशेष माहितीकरतां लिहा.

कराड,
ता. १५–१०–४८

म. वि. खंडकर
मॅनेजर



— सरकारमान्यता असलेली —

# कोल्हापूर स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर

(स्थापना १९३८)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २,००,००० रु. |
| खपलेलं भांडवल | १,५१,९५० रु. |
| खेळतें भांडवल | १७,००,००० रु. |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

१ मे. राव. ॲ. एस. जी. दाभोळकर B.A.LL.B. प्रेसिडेंट
२ मे. सरदार बहादूर डी. डी. जाधव ओ. बी. आय.
३ मे. रावब. डॉ. पी. सी. पाटील D. SC, L. Ag., I. A.S. ( रि.) माजी शिक्षणमंत्री.
४ मे. राव. एस. एस. शिर्के B.A., B. SC. चीफ एक्साईज कमिशनर कोल्हापूर स्टेट.
५ मे. एन. टी. सरनाईक
६ मे. आर. डी. आडनाईक
७ मे. बळवंतराव सखाराम भोसले
८ मे. कृष्णाजी तुकाराम पाटील
९ मे. गुरुपाद राचय्या स्वामी
१० मे. बापूसाहेब हणमंतराव सूर्यवंशी
११ मे. एस. वाय. रणनवरे, मॅनेजिंग डायरेक्टर.

सहकारी, शेतकी व बिगर-शेतकी सोसायट्यांना लागणाऱ्या कर्जाऊ पैशाचा पुरवठा माफक व्याजाचे दरानें केला जाईल.

त्याचप्रमाणें चालू, सेव्हिंग, मुदतबंद ठेवी आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातील.

*शिवाय बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.*

एस. वाय. रणनवरे,
मॅ. डायरेक्टर

# मुंबई शहर व त्यावरून सुचलेले कांहीं विचार

लेखकः—श्री. सी. बा. जोशी, एम्. आय. ई., ॲडव्होकेट, ( ए. एस. ), इन्स्टिटयूशन ऑफ एंजिनिअर्स ( मुंबई ) चे १९४७-४८ चे अध्यक्ष.

हिंदुस्थानांत मुंबई, कलकत्ता, दिल्ली, अहमदाबाद वगैरे शहरांत दिवसेंदिवस रहिवाश्यांची बेसुमार गर्दी होत चालली आहे. या प्रश्नाचा तांतडीनें विचार करण्याची आवश्यकता आहे. लंडन शहरांत ग्रेट ब्रिटनमधील सर्व लोकसंख्येच्या एक तृतियांश लोक राहतात. लंडनची लोकसंख्या जसजशी वाढत गेली तसतशी त्याची आकर्षणशक्तीही त्याच प्रमाणांत वाढली. त्यामुळें वर्षानुवर्षें लंडन शहरांत माणसांची संख्या चक्रवाढीनें जास्त होऊं लागली. तसाच कांहींसा प्रकार जगांतील बहुतेक सर्व मोठ्या शहरांचा आहे. मुंबईची वस्ती देखील बारा लाखांवरून चवदा लाख, चवदावरून वीस व आज ती पंचवीस लाखांच्या घरांत आहे; व बृहन्मुंबईची योजना सदतीस लाख लोकसंख्या धरून करण्यांत येत आहे. कांहीं वर्षांनीं मुंबईची लोकसंख्या पन्नास लाख देखील व्हावयाची! या भरमसाट लोकसंख्येचे खालील परिणाम गेले कित्येक वर्षें अनुभवास येत आहेतः—

### भरमसाट लोकसंख्येचे दुष्परिणाम

( १ ) एकएका खोलींत वीस ते ऐंशीपर्यंत माणसें राहणाऱ्या अंधार कोठड्या किती तरी आहेत. एकच शहरांत घोड्यांचे राजेशाही तबेले व माणसांनीं भरलेले घाणेरडे गोठे असावे ही गोष्ट जगांतील सर्व शहरांत पाहावयास मिळते. तीच मुंबईत बऱ्याच जास्त प्रमाणांत आहे. अशा प्रकारचीं आरोग्यविघातक ठिकाणें नाहींशीं करण्याचे प्रयत्न गेलीं पंचवीस वर्षें विचारांतून, लेखांतून व थोडे कृतींतून चालू आहेत. परंतु आतां इतर महत्त्वाचे प्रश्न पुढें आल्यामुळें हा प्रश्न कायमचाच मागें पडणार कीं काय, अशी भीति वाटते.

( २ ) वाढलेल्या लोकसंख्येस राहण्याकरतां मुंबईस घरेंच नाहींत. त्यामुळें लाखो लोक घराशिवाय आहेत.

( ३ ) शहरांतील ट्राम, बसेस, आगगाड्या, गच्च भरून जातात. रांगेमध्यें तासनतास उभें रहावें लागतें. ट्राम व आगगाड्यामध्यें गर्दीचे वेळीं माणसें गुदमरतात. फूट बोर्डावरून माणसें पडून मरतात. कितीही नवीन ट्राम गाड्या, बसगाड्या व रेल्वेचें साहित्य आणलें तरी सध्यांच्या रस्त्यावरून व रुळावरून इतक्या लोकांची सुखानें जा-ये होणें मुष्किलीचें आहे. त्याकरतां रस्ते व लोहमार्ग रुंद करावे लागतील. बाजूचीं घरें पाडावीं लागतील.

( ४ ) मुंबईच्या पाणी पुरवठ्याकरतां आजपर्यंत कोट्यावधी रुपये खर्च झालेले आहेत. तरी सुद्धा पुरेसें पाणी मिळत नाहीं व पाण्याच्या नवीन योजनाकरतां दहा पंधरा कोटी खर्च करावा लागणार आहे. मैलापाणी वाहून नेणें, साफसुफाई, वगैरे करताही बेसुमार खर्च करावा लागणार आहे.

( ५ ) शिक्षण, करमणुकीचीं साधनें, दूध, खाद्य पदार्थ, वगैरे प्रत्येक बाबतींत अडचणींची स्थिति निर्माण होत आहे.

( ६ ) संप, दंगे वगैरे तर मुंबईतील स्वाभाविक जीवनाचा एक भाग झाला आहे.

( ७ ) १९४१ मध्यें मुंबईत पुरुष व स्त्रियांचें प्रमाण नऊ पुरुषांत पांच स्त्रिया असें होतें. तें प्रमाण आज आठरा पुरुषांस सात बायका असें असावें. अशा या विषम समाजामध्यें अनैतिक व्यवहार, दंगेधोपे व इतर असाधारण सामाजिक व्यथा दिसूं लागल्या तर त्यांत नवल काय? कृत्रिम उपायांनीं व कायद्यांनीं याला आळा कसा बसणार?

( ८ ) लढाईचीं आधुनिक साधनें इतकीं विध्वंसक आहेत कीं त्यांच्या भक्ष्यस्थानीं मुंबईसारखी मोठी शहरें देणें अदूरदर्शित्वाचें आहे.

### मनुष्यभक्षक संस्था

वर चित्रित केलेली मुंबईची परिस्थिति सुधारण्याकरतां व बृहन्मुंबईची योग्य आखणी करण्याकरतां योजना तयार आहेत. त्यांस अंदाजें ११५ (एकशें पंधरा कोटी) रुपये खर्च येणार आहे. मुंबई सरकार चार पांच कोटी रुपये खर्च करून लोकांना आसऱ्याकरतां घरें बांधीत आहे. परंतु दरवर्षी बांधून होत असलेल्या घरांत जितक्या लोकांना आसरा देतां येईल त्यापेक्षा एक वर्षाची निपज सुद्धा जास्त आहे! तेव्हां या सरकारी घरें बांधण्याच्या योजना घरें नसलेल्या लोकांना व नवीन येणाऱ्या लोकांना कशा पुऱ्या पडणार?

आतां असा प्रश्न उद्भवतो कीं शहरांच्या बेसुमार वाढीला कांहीं मर्यादा आहेत कीं नाहींत. कारण, ग्रेटर मुंबईप्रमाणेंच ग्रेटर अहमदाबाद, ग्रेटर पुणें वगैरे शहरांत कमी अधिक प्रमाणांत हे प्रश्न येणारच. वस्तुस्थिति अशी आहे कीं, कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत शहराची वाढ झाल्यास तेथील म्युनिसिपालिटीस पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वगैरे करतां कराव्या लागणाऱ्या योजनांना दरडोई खर्च कमी पडत जातो व त्या मानानें म्युनिसिपालिटीची कार्यक्षमता वाढते. परंतु याचे पलिकडे जर शहराची वाढ झाली तर म्युनिसिपालिटीचा दर माणशीं खर्च बेसुमार वाढत जातो. त्या मानानें जर कर आकारणी करतां आली नाहीं तर तेवढ्याच खर्चांत एकाच्या तोंडचा घास दुसऱ्याचे तोंडांत घालूनहि श्रीमंताची राहणी कशीबशी कायम ठेवून गरिबांची दुरवस्था होते. अशा म्युनिसिपालिटी मनुष्यभक्षक संस्थाच म्हणावयाच्या! जगांत रशिया खेरीज सर्व देशांतील शहरांत हा प्रकार चालू आहे. आपण तीच किता गिरवून त्याच त्याच चुका करणार कीं काय?

### इष्ट परिणामाकडे धोरण केंद्रित पाहिजे

या विषयावर मध्य सरकार व प्रांतिक सरकारें यांचें कांहींच निश्चित धोरण ठरल्यासारखें दिसत नाहीं. बोलतांना व लिहितांना विशिष्ट ध्येयवाक्यांचा उच्चार करून, कृतींत मात्र प्राप्त परिस्थितीच्या आधीन होऊन ध्येयाच्या विरुद्ध क्रिया दिसून येते. मध्य सरकार स्थापन होऊन एकच वर्ष झालें व प्रांतिक सरकारें आज तीन एक वर्षें अधिकारावर आहेत. येवढ्या थोड्या कालावधींत शंभर वर्षांचें दुखणें बरें करणें अशक्य खरेंच व त्याबद्दल सरकारास दूषण देणें हास्यास्पद आहे, हेंही खरेंच. परंतु प्रकाशशास्त्राचा असा एक नियम आहे कीं प्रकाश किरणें इष्ट आकृतीपर्यंत जाऊन भिडत नसली तरीसुद्धा जर तीं किरणें त्या आकृतीच्याकडे लक्षित असतील तर त्या आकृतीचें दर्शन होतें.

त्याप्रमाणेंच, सरकारी धोरणें जर इष्ट फलप्राप्तीकडे लक्षित असतील तर–प्रत्यक्ष फलप्राप्तीस जरी वीस पंचवीस वर्षें लागलीं तरी–इष्ट फलाचें दर्शन आजच घडेल. आज उलट कृतीकडून एकदम पंचवीस वर्षांनीं असा दिवस उजाडणार नाहीं कीं जेव्हां आज बोलून दाखविलेलीं ध्येयें प्रत्यक्षांत येतील. त्या इष्ट परिणामाकडे आजपासूनचीं धोरण केंद्रित केलीं पाहिजेत. सरकारच्या प्रस्तुत कृतींना ही कसोटी लावली तर पुढील इष्ट परिणामाचें दर्शन होत नाहीं. म्हणून आपणांस काय पाहिजे व तें कसें साध्य करावें, याची सार्वजनिक चर्चा इष्ट आहे.

**किमान गरजा लहान गांवांतहि भागल्या पाहिजेत**

मुंबईसारखी परिस्थिति इतर शहरांत होऊं नये व मुंबईचीही परिस्थिति सुधारावी याला इलाज काय? या बाबतींत अशी एक सूचना आली कीं, ज्या लोकांची मुंबईंत आवश्यकता नाहीं त्यांना मुंबईबाहेर टाकून द्यावें म्हणजे झालें. मुंबईबाहेर त्या लोकांनीं काय करावें व उदरभरणाचा त्या लोकांना मार्ग कोणता याचा विचार करण्याची जरूरी सदरहू सूचना करणारांना वाटत नाहीं. कोणीही मनुष्य मुंबईकडे सुखासुखी खेचला जात नाहीं. मुलाबाळांचे शिक्षणाकरतां गरीब आईबाप अर्धपोटीं दिवस काढून शहरांत राहतात. कच्चा माल, वीज किंवा तेल, पाणी पुरवठा वगैरे साधनांची मुंबईस उपलब्धता सुलभ म्हणून लहान व मोठे कारखानदार मुंबईस येण्याकरतां धडपडतात. बाहेर गांवीं कारखाना काढून जर सर्व साधनें मिळण्यास दुप्पट खर्च व त्रास झाला तर त्यानें आपले महाग जिन्नस कोणाला विकावयाचे? आजे कारखानदाराला प्रत्येक बाबतींत परमिट व लायसेन्स लागते व त्याकरतां सरकारदरबारीं खेटे घालावे लागतात. मुंबईस राहणाऱ्या माणसांचें काम सरकारदरबारीं जितक्या त्रासानें होते त्याच्या दसपट त्रास बाहेरच्या माणसास होतो. अशा परिस्थितींत मुंबईकडे लोक आकर्षिले जाणारच. याला खरा उपाय म्हणजे लोकांच्या किमान गरजा–म्हणजे उपजीविकेचीं साधनें–शिक्षणाचीं साधनें–कारखानदारांच्या सामान्य गरजा—ह्या सर्व गोष्टी मुंबईइतक्याच सुलभतेनें व स्वस्तांत बाहेर गांवींही मिळाल्या पाहिजेत. याकरतां सुचणाऱ्या उपायांचा निर्देश खालीं केला आहे.

**उपायांचें दिग्दर्शन**

(१) कारखान्याकरतां लागणाऱ्या वीज पुरवठ्याचे दर सगळीकडे सारखे करावे. म्हणजे, मुंबईंत दर वाढवून ती वाढ इतर ठिकाणीं दर कमी करण्यांत खर्च करावी.

(२) पाणीपुरवठ्याकरतां विहिरी खणण्यानें भागणार नाहीं. पांच पन्नास गांवांकरतां एक एक मोठी योजना करून त्यांपैकीं नमुना म्हणून एक तरी अमलांत आणावी व शुद्ध केलेलें पाणी लोकांस मिळावें.

(३) लहान बंदरांचा व्यापार वाढवून तेथें होणारा जादा खर्च मुंबई बंदरावर जास्त आकारणी करून वसूल करावा.

(४) रेल्वेचे आयात व निर्यात मालावरील दर असे ठरवावे कीं मुंबईंत कारखाना काढण्यांत जास्त फायदा नसावा.

(५) सरकारी कचेऱ्यांचा लवाजमा फार न वाढवता, फिरती सरकारी ऑफिसें ठेवून लोकांचीं कामें जागच्या जागीं व्हावीं. सरकारदरबारीं लोकांना खेटे घालावयास न लागता सरकारनें लोकांचें घरचें घरीं काम करावें. सध्या मुंबई सरकारचे ५० टक्के लक्ष व १०० टक्के वास्तव्य मुंबई शहरांत आहे. पुण्यांतील सरकारचें ठाणें बंद न करतां उलट जर धारवाड, पुणें व अहमदाबाद येथें सरकारी त्रैमासिक ठाणीं उघडलीं असतीं तर जास्त बरें झालें असतें; किंबहुना मुंबईकरतां एक खास प्रधानाची योजना करून बाकीचें सरकारचें वास्तव्य मुंबईबाहेरचें ठेवावें.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. वि. केळकर M. A., LL. B (वकील) (अध्यक्ष) | श्री. बी. बी. वाळवेकर (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

**एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर**

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
*मॅनेजिंग डायरेक्टर*

# लॉर्ड रे महाराष्ट्र
## औद्योगिक संग्रहालय, पुणें २.

हें संग्रहालय न्यायमूर्ति म. गो. रानडे यांनीं सन १८९० मध्यें स्थापन केलें व सन १९३० मध्यें याचें पुनरुज्जीवन झालें. मुंबई प्रांतिक सरकारनें संग्रहालयांसाठीं स्वतंत्र कायदा नुकताच संमत केला आहे. संग्रहालय खालीं दर्शविल्याप्रमाणें जनतेची सेवा करतें.

**संग्रहालय शिक्षण :** विद्यार्थ्यांचे वर्ग आणवून त्यांस संग्रहालयांत मांडण्यांत आलेले विषय, वस्तुपाठ पद्धतीनें शिकविण्यांत येतात.

**व्यापारसंवर्धनगृह :** हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणच्या हस्तकौशल्याच्या उत्तमोत्तम वस्तू या ठिकाणीं जनतेस पाहण्यासाठीं व खरीदण्यासाठीं संग्रहित केल्या आहेत. (कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी रोड)

**औद्योगिक प्रदर्शनें :** संग्रहालयाच्या विद्यमानें आंतरप्रांतीय औद्योगिक प्रदर्शनें भरविण्यांत येतात.

**माहिती-विभाग :** या विभागांतून कोणासहि उद्योगधंदेविषयक माहिती पुरविण्यांत येते.

**ग्रंथालय :** संग्रहालय उद्योगधंदे व व्यापारविषयक वाङ्मयाचें ग्रंथालय चालवितें.

**संग्रहालयास भेट :** अगाऊ कळविल्यास दिग्दर्शकाकडून संग्रहालय दाखविण्याची सोय करण्यांत येते.

आपण संग्रहालयास व व्यापारसंवर्धनगृहास भेट द्यावी अशी आपणांस आग्रहाची विनंति आहे.

# आपलीं गळिताचीं धान्यें

लेखकः—डॉ. गो. रा. केळकर, पीएच्. डी.; मुंबई.

तेलांचा शोध मनुष्यास प्रथम केव्हां लागला हें सांगतां येणें फार कठिण आहे. पण येवढें मात्र खरें कीं, हिंदुस्थानांतील लोकांस त्यांचा उपयोग फार पूर्वीपासून माहीत आहे. सुश्रुत आणि चरक या प्राचीन वैद्यकीय ग्रंथांत कित्येक ठिकाणीं तेलांचा उल्लेख उपचारांत आढळतो. दिपवाळींत अभ्यंगस्नानाकरतां, फराळाचे पदार्थ तळण्याकरतां, पंत्या व समयांमध्यें जाळण्याकरतां तेलांचा उपयोग पूर्वापार होत असल्याचें सर्वांस माहितच आहे.

तेलें व तत्सम इतर स्निग्ध पदार्थ आपणास अनेक मार्गांनीं मिळतात. उदाहरणार्थ, गोडें तेल, जवसाचें तेल इ. गळिताच्या धान्यांपासून; चंदनाचें तेल चंदनाच्या लाकडापासून; निलगिरी तेल युकॅलिप्टसच्या पानांपासून; घासलेट, पेट्रोल, पॅराफिन् हीं खाणीमधून व लोणी, कॉडलिव्हर तेल हीं प्राण्यांपासून आपणांस प्राप्त होतात. प्राणिज स्निग्ध पदार्थांचा पुरवठा फारच मर्यादित आहे. खनिज तेलें मोटारी, विमानें यामध्यें ज्वलनाकरतां मुख्यत: वापरलीं जातात. चंदनादि तेलें गंधद्रव्यांच्या धंद्यांत व औषधांत उपयोगी पडतात. तेव्हां इतर उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर लागणारीं तेलें पुरविण्याची कामगिरी मुख्यत: गळिताच्या धान्यांवरच पडते, हें उघड आहे.

हिंदुस्थानाचे दृष्टीनें गळिताच्या धान्यांचें महत्त्व फार आहे. ह्या धान्यांच्या विकास अनुकूल असें हवापाणी व जमीन येथें असल्यामुळें हीं धान्यें पिकविणाऱ्या देशांचे यादींत विपुलता आणि विविधता या दोन्ही दृष्टीनें हिंदुस्थानचें नांव अग्रभागीं चमकतें. गळिताच्या धान्याखालीं असलेल्या आपल्या जमिनीचें क्षेत्र २ कोटी एकरांपेक्षा ज्यास्त असून त्यांचें उत्पादन सुमारें ८० लक्ष टन इतकें आहे. जागतिक उत्पादनाच्या निम्याहून अधिक भुइमूग एकट्या हिंदुस्थानांत होतो, व एरंडेलाचा जवळ जवळ सर्व पुरवठा आपल्या देशांतूनच होतो. खोबरेल हें जरी गळिताच्या धान्यापासून मिळत नाहीं, तरी तेंहि आपल्याकडे होणारें एक महत्त्वाचें तेल आहे. कोचिनचें खोबरेल म्हणजे सर्वोत्कृष्ट, अशी बाजारांत ख्याति आहे. याशिवाय कपास, जवस, करडी, तीळ, कारळे, मोहरी, मोह, इत्यादि पासूनहि कित्येक टन तेल आपणास उपलब्ध होतें. गळिताच्या धान्याची निर्यातही आपण फार मोठ्या प्रमाणावर करीत होतों. आतां सरकारनें नियंत्रण घातल्यामुळें तिच प्रमाण कमी झालें आहे.

**गळिताचीं धान्यें पिकविणाऱ्या प्रमुख देशांचें वार्षिक उत्पादन**

| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थान | ८० | लक्ष टन |
| चीन | ७० | " " |
| युनायटेड स्टेटस् | ४२·५ | " " |
| अर्जेंटिना | २० | " " |
| रशिया | २० | " " |
| नायजेरिया | १० | " " |
| डच ईस्ट इंडीज | ५ | " " |

ह्या कच्च्या मालावर कोणकोणते उद्योगधंदे कसकसे अवलंबून आहेत, ह्याची आपणास माहिती झाली तर ह्या धान्यांचे रूपानें केवढी महत्त्वाची निसर्गसंपत्ति आपणांस मिळालेली आहे ह्याची कांहींशी कल्पना येईल. ती माहिती स्थूलमानानें देणें, हाच या लेखाचा उद्देश आहे.

## तेल काढण्याचीं साधनें व पद्धती

तेल काढण्याचें पूर्वापार चालत आलेलें साधन म्हणजे घाणा. हा खेडोपाडीं सर्वत्र दिसतो. हा लाकडाचा बनविलेला असतो. बाहेरचा भाग एकाद्या कुंडीसारखा असून त्यामध्यें एक उभा दांडा असतो. तो बैलाचे सहाय्यानें फिरविला जातो. तेल काढावयाचें धान्य घाण्यांत घातल्यावर तें हा दांडा व कुंडी यांचेमध्यें चिरडलें जातें व त्यांतील तेल मोकळें होऊन भांड्यांत जमतें. तेल काढून घेतल्यावर धान्याचा जो चोथा राहतो त्यास पेंड असें म्हणतात. घाण्याची तेल काढण्याची गती बरीच मंद असते व धान्यांतील तेलाच्या सुमारें २० टक्के इतकें तेल पेंडीमध्यें शिल्लक राहतें. मात्र घाण्याच्या तेलांना मूळच्या धान्याचा स्वाद असतो, त्यामुळें खाण्याकरितां तीं जास्त पसंत पडतात.

तेल काढण्याचीं आधुनिक साधनें जास्त कार्यक्षम आहेत. तीं मुख्यत: दोन वेगवेगळ्या तत्त्वांवर आधारलेलीं आहेत. धान्यावर यंत्रांचे योगानें दाब किंवा भार घालून त्यांतील तेल काढून घेणें हा एक मार्ग व तेलें ज्यामध्यें विरघळतील अशा रसायनांच्या सान्निध्यांत धान्यांना ठेवून दाबा-शिवाय तेल काढून घेणें हा दुसरा. ह्यापैकी पहिला मार्गच आपल्याकडे विशेष प्रचारांत आहे. तेल काढण्याकरतां आणलेलें धान्य प्रथम साफसूफ करून व आवश्यक तर त्यावरील टरफल काढून व पीठ करून तेल काढण्याकरतां वापरतात. कित्येकदां त्यांना उष्णताहि देण्यांत येते. दाब देण्याकरतां वापरतात तीं यंत्रें कापसाचे गठ्ठे बांधण्याकरतां वापरतात त्या यंत्रांसारखीच सामान्यत: असतात. तेल काढण्याचें दुसरें एक महत्त्वाचें आधुनिक साधन म्हणजे "एक्सपेलर्स" हें होय. या यंत्रामध्यें भोकें पाडलेली व उत्तरोत्तर अरुंद होत गेलेली अशी एक पेटी असते. तीमध्यें मळसूत्र (स्क्रू) असलेला एक दांडा असतो. धान्य भरून हा दांडा फिरविला म्हणजे मळसूत्राच्या योगानें धान्य पुढें पुढें सरकतें व त्यावर जास्त जास्त दाब पडून त्यांतील तेल मोकळें होतें व भोकांतून बाहेर पडतें. ह्या दोन्ही साधनांचे योगानें धान्यांतील तेलाचा ९० ते ९५ टक्के भाग काढून घेतां येतो.

रसायनांचे सहाय्यानें तेल काढण्याची पद्धत यूरोपमध्यें विशेष वापरण्यांत येते. पीठ केलेलें धान्य एका बंद पात्रांत रसायनामध्यें मिसळून ठेवून देतात. ठराविक काळ गेला म्हणजे रसायनाचा थर वेगळा करून घेतात. त्यास उष्णता दिली कीं रसायनाची वाफ होते व तेल खालीं राहतें. या साधनांत अशी योजना असते कीं, ती रसायनाची वाफ पुन्हा थंड करता यावी. त्यामुळें तें रसायन द्रवरूप होऊन पुन्हां पुन्हां वापरतां येतें. मद्यार्क, हेक्झेन, ह्यासारखीं तेलापेक्षां जलद वाफ होणारीं द्रव्यें ह्या कामीं फार उपयोगी पडतात. घाण्याच्या पेंडीमध्यें राहिलेलें तेल काढून घेण्याकरताहि ह्या पद्धतीचा उपयोग करतां येतो व अशा तऱ्हेचें कांहीं कारखाने सध्यां येथें चालू आहेत.

**निरनिराळ्या धान्यांतील तेलाचें प्रमाण**

| | % | | % |
|---|---|---|---|
| करडी | ३० | भुइमूग | ४५ ते ५० |
| जवस | ३५ ते ४४ | एरंडी | ५० |
| तीळ | ३७ ते ५१ | खोबरें | |
| मोह | ४२ ते ४७ | (वाळविलेलें) | ६० ते ७० |

बाजारांत पाठविण्यापूर्वी तेलांवर आणखीहि कांहीं संस्कार करावे लागतात. तीं गढूळ असतील तर त्यांना गाळावें लागतें व खवट असतील तर त्यांचा तो दोष दूर करावा लागतो.

### तेलें व रंग–रोगणांचा धंदा

हवेमध्यें उघडीं ठेवल्यास तेलावर कमजास्त परिणाम घडून येतात. कांहीं तेलें अशा प्रकारें ठेवल्यास कोरडीं पडतात. तीं एखाद्या पृष्ठभागास लावून तो हवेंत ठेवला तर या वाळलेल्या तेलाचा त्यावर पातळसा घनरूप थर बसतो. जवसाच्या तेलाच्या अंगीं असा गुण प्रामुख्यानें आहे. अशा तेलांना इंग्रजींत 'ड्राइंग ऑइल्स' असें म्हणतात. या तेलाचा हा गुण फार महत्त्वाचा आहे. तेलांतील रंग-रोगणांच्या धंद्याची सर्व मदार यावर आहे. लाकडी किंवा लोखंडी वस्तूंना, यंत्रांना, आगगाडीच्या पुलांना लावण्याकरतां इ. अनेक ठिकाणीं आपण तेलांचे रंग वापरतों. तेल्या रंगाचे मुख्य घटक म्हणजे जवसाचें किंवा असेंच एखादें वाळणारें तेल, रंगाची पूड व या दोहोंचें मिश्रण वापरतां येईल इतपत पातळ व्हावें म्हणून त्यांत मिसळलेलें टरपेंटाईन, हे होत. वस्तूला रंग देतांना दोन हेतू आपल्या मनांत असतात. वस्तूचा खडबडीतपणा जावा हा एक व त्या वस्तूचें हवापाण्यापासून संरक्षण व्हावें हा दुसरा. वाळणाऱ्या तेलापासून निर्माण होणारा पातळ थर नितळ व गुळगुळीत असल्यामुळें वस्तूचा पृष्ठभाग चांगला दिसतो व या थरामुळें तो झाकला जाऊन त्याचें संरक्षणही होतें. जवसासारखीं धान्यें येथें मुबलक असल्यामुळें तेलातील रंगाच्या धंद्याला चांगला वाव आहे.

### साबण व ग्लिसरिन

साबण करण्यांकरतांहि तेलांची अत्यंत आवश्यकता असते. रासायनिक दृष्ट्या विचार केला तर तेलें म्हणजे ग्लिसरिन नामक एक मधुर द्रव्य व निरनिराळीं अम्लें यांचें संयुग होत. साबणाच्या कृतीमध्यें निरनिराळया तेलांचें मिश्रण कढईसारख्या एका पात्रांत घेऊन त्यावर कॉस्टिक सोड्याची क्रिया केली जाते.

पुरेशी उष्णता दिली म्हणजे तेलांची मूळची घटना नाहींशी होते. त्यामधील ग्लिसरिन हें द्रव्य वेगळें होतें व त्याच्या जागीं "सोडियम" नांवाचें मूलद्रव्य येतें. ही नवीन तयार झालेली घटना म्हणजेच साबण. तो मिश्रणांतून काढून घेतात व खालीं राहिलेल्या द्रवांतून ग्लिसरिन मोकळें करतात. कारण, स्फोटक द्रव्यें तसेंच औषधें,यामध्यें तें अत्यंत महत्त्वाचें आहे. अशुद्ध स्वरूपाचा साबण आपल्याकडे पूर्वीपासून प्रचारांत असावा, असें दिसतें. आजच्या सारखा शुद्ध साबण करण्याचा पहिला कारखाना मिरत येथें १८७९ चे सुमारास निघाला. सध्यां लहान, मोठे सर्व साबण कारखाने धरले तर त्यांची संख्या जवळ जवळ एक हजार भरेल. त्यामध्यें सुमारें ७५,००० टन साबण तयार होत असावा असा अंदाज आहे. साबणाचा खप हें संस्कृतिमापनाचें पाश्चात्य परिमाण आहे. तें आपणास मान्य असो वा नसो, पण रहाणीचें मान जसजसें वाढत जाईल तसतसा साबणाचा आपला खपही वाढणार हें निश्चित आणि म्हणून चांगल्या प्रतीच्या साबण कारखान्यांना भावी काळ अनुकूल होईल.

### कृत्रिम तूप

"डालडा", "वनस्पती" इत्यादि पदार्थ आज कोणाच्या परिचयाचे नाहींत ? हे पदार्थ दिसण्यांत व कांहींसे चवीलाहि तुपासारखे असल्यामुळें सध्यांच्या अन्नटंचाईच्या काळांत त्यांचा जास्तजास्त उपयोग केला जात आहे. आहारांत त्यांचा समावेश करणें हें कितपत श्रेयस्कर आहे ह्याविषयीं तज्ञांत अजून एक मत नाहीं. जेथें आपण तेलें वापरतों तेथें ते वापरणें हानिकारक नाहीं. पण तुपाचें स्थान त्यांना देणें मात्र योग्य नव्हे. कारण, शरिरास कांहीं प्रमाणांत प्राणिज स्निग्ध पदार्थांची आवश्यकता असते ती तुपानें भागते. ती ह्या पदार्थांनी मात्र भागणें शक्य नाहीं. कारण, ते वनस्पतिज तेलांपासून बनविलेले असतात. खाद्य म्हणून उपयोगाखेरीज साबण वगैरे करण्याकरताही ह्यांचा फार उपयोग होतो.

द्रवरूप तेलापासून हे घनरूप पदार्थ बनविण्याकरतां तेलांचा उद्जन ( हैड्रोजन) या वायूशीं रासायनिक संयोग व्हावा लागतो. भुइमुगाचें तेल आपल्याकडे या कामीं फार वापरलें जातें. इतर तेलेंहि अशींच वापरतां येतात. तेलांतील अम्लें वेगळीं करणें हाही एक महत्त्वाचा धंदा आहे. कापड-गिरण्यांना लागणारे कित्येक रासायनिक पदार्थ, रबरासारखे पदार्थ, मेणबत्त्या व मेणकापड हीं बनविण्याकरतां त्याचप्रमाणें यंत्रांना घालावयाच्या वंगणाकरतां व सौंदर्य प्रसाधनामध्येंहि तेलांचा उपयोग पुष्कळ होतो.

### पेंडीचें महत्त्व

पेंड हा तेलाच्या धंद्यापासून मिळणारा एक महत्त्वाचा उपपदार्थ आहे. पेंडीमध्यें असणाऱ्या द्रव्यांचा खत म्हणून फार चांगला उपयोग होतो. भुइमूग, तीळ, खोबरें, यांच्या पेंडी जनावरांना खुराक म्हणून वापरतात.

गळिताच्या धान्यांची निर्यात सरकारनें नियंत्रित केल्यामुळें देशी उद्योगधंद्यांना आवश्यक असा कच्चा माल उपलब्ध झाला, इतकेंच नव्हे तर ज्या जमिनींत तो उत्पन्न झाला ती सुपीक व्हावी म्हणून आवश्यक असें खत पेंडीचे रूपानें आपणास मिळालें.


# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल
## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरीः— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई १.
( मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली )
स्थापन साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. २०,३९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. २७,२१,००० |
| ठेवी | रु. ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५१ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरीकडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

[ United Advertisers ]

# धरणांच्या योजनांमागील पूर्वतयारी

लेखकः—श्री. गो. के. मनोळीकर, बी. ई. (सिव्हिल), ए. एम्. आय. ई. (इं.), एक्झि. एंजिनिअर, (कराड), इलेक्ट्रिक ग्रिड खातें, मुंबई.

देशामध्यें नाना ठिकाणीं निसर्गानें दिलेल्या वस्तुस्थितीचा शक्यतों फायदा करून घेणें हें प्रत्येक राष्ट्राचें कर्तव्य आहे. यापैकीं जमीन सुपीक करणें, जंगलांतून पैदास ज्यास्त करणें, खनिज संपत्ति शोधून काढणें, या गोष्टी सर्वांच्या परिचयाच्या आहेत. तथापि, डोंगरामध्यें पडणाऱ्या पावसाचा व त्यामुळें नद्यांना येणाऱ्या पुराचा योग्य तो उपयोग करून घेणें हें अवघड असल्यामुळें कित्येक वर्षें या पुरामुळें फायद्याऐवजीं नुकसान झालेलें आहे. नद्यांचे पुराबरोबर जमिनीवरील सकस माती वाहून जाते व कित्येक वेळां पिकें व गांवेंही वाहून जातात. हे अनर्थ टाळण्याकडे आणि या फुकट जाणाऱ्या पाण्याचा सर्व तऱ्हेनें उपयोग करून घेण्याकडे सर्वांचेंच लक्ष दिवसेंदिवस ज्यास्त लागून राहिलें आहे. यासाठी नद्यांना बंधारे अगर मोठीं धरणें बांधून त्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी आणि शक्य तर वीज उत्पन्न करण्यासाठी अलिकडे बऱ्याच योजना आंखण्यांत येत आहेत.

अशा तऱ्हेच्या योजना तयार करण्यास व त्या पूर्ण होण्यास बरींच वर्षें लागतात. या कालावधीचीं कारणें सहजरीत्या लक्षांत येत नसल्यामुळें कोणतीही योजना पूर्ण होणेबद्दल सामान्य जनतेच्या मनांत अधीरता निर्माण होते. सबब प्रस्तुत लेखांत अशा मोठ्या योजना आंखण्यापूर्वीं किती शोध घ्यावे लागतात व कशाप्रकारची अनुकूल परिस्थिति असली म्हणजे अशा योजना होऊं शकतात यासंबंधीची माहिती सोप्या शब्दांत देण्याचा प्रयत्न केला आहे. येथें संपूर्ण बाबींचा विचार करतां येणें शक्य नसल्यामुळें व संपादकांनीं धरणासंबंधीच्या पूर्वतयारीची विचारणा केल्यामुळें फारसें शास्त्रीय भागांत न शिरतां मुख्य मुद्यांचा थोडा विचार करूं.

## पाणी

पाण्याचे अंगांत असलेल्या अनेक गुणांपैकीं कांहीं म्हणजे जमिनींत धान्य पिकविण्यासाठी, पिण्यासाठी वगैरे उपयोग सहज नजरेस पडतात. तसेंच सर्वव्यापित्व म्हणजे आकाशांत, जमिनीवर व जमिनीचे पोटांत, पाऊस, गुप्त प्रवाह, झरे, नद्या व समुद्र यांच्या रूपानें प्रत्येकास दिसतात तसेच उताराकडे वाहात जाणें, संलग्न होणाऱ्या वस्तूंना बरोबर ओढून नेणें, एका पातळींत राहणें, दाबाचा प्रतिकार करणें, वगैरे गुणहि थोडे काळजीपूर्वक पहिल्यास कळून येतात. परंतु मुसळधार पाऊस पडून नद्यांना मोठे पूर आले म्हणजे जें उग्र स्वरूप धारण होतें आणि लक्षावधि घनफूट पाणी दर सेकंदास जेव्हां सैरावैरा धांवत सुटतें व समुद्रापर्यंत सर्व पदार्थ धुवून नेतें त्यावेळची, त्याचे अंगांत असलेली शक्ति व त्याचें मोजमाप करणें हें कठीण असतें. अशावेळीं होणाऱ्या हाहाःकाराकडे पाहूनच सामान्य माणसास पाण्याचे अंगांत असलेल्या सामर्थ्याची कल्पना करावी लागते.

वाहात्या पाण्याच्या अंगांत शक्ति असते व उंचावरून खाली पडणाऱ्या पाण्याचे अंगीं ज्यास्त जोर असतो हें उघड आहे. त्याचप्रमाणें ज्यास्त उंचावरून पुष्कळ पाणी खाली सोडलें तर त्यापासून ज्यास्त शक्ति उत्पन्न होऊं शकते आणि अशा तऱ्हेनें पाण्याचा प्रवाह उंचावरून खाली जर सतत सोडता आला तर आपणांस सतत व पुष्कळ शक्ति निर्माण करतां येते.

ज्या ठिकाणीं पाण्याचा प्रवाह सतत आहे व उंचीही पुष्कळ आहे, अशीं स्थळें वीज उत्पन्न करण्यास ज्यास्त सोयीचीं असतात आणि सहाजीक तीं डोंगर प्रदेशांत जेथें पाऊस ज्यास्ती पडतो अशा ठिकाणीं असतात.

निसर्गानें अशीं बरींच स्थळें आपल्या प्रांताच्या पश्चिम घाटांत —सह्याद्रिमध्यें—निर्माण केलेली आहेत. तथापि त्यापैकीं किती ठिकाणी पाण्याचा सांठा भरपूर करतां येण्यासारखा आहे व तसेंच विद्युत् शक्ति उत्पन्न करतां येण्यासाठी कितीशी अनुकूलता आहे याची पाहाणी करावी लागते आणि ती करतांना पुढील गोष्टींचा विचार करावा लागतो :—

( १ ) पाण्याचा मोठा तलाव बनवितां येण्यासारखें डोंगरामध्यें एकादें खोरें आहे काय ( २ ) पावसाचें मान दरसाल भरपूर आहे काय ( ३ ) जलाशय बनविल्यावर त्यांतील पाणी निघून जाण्यास डोंगरामध्यें पळवाट नाहींत ना, सभोंवारचे डोंगर पुरेसे उंच आहेत काय ( ४ ) जलाशयाजवळ एखादी खोल दरी आहे काय ( ५ ) हें पाणी डोंगराचे पायथ्याशीं मोठमोठ्या नळांतून न्यावें लागतें. सबब हे मोठाले नळ ज्यावर बसवितां येतील अशी एखादी डोंगराची उतरती सोंड जवळपास आहे काय ( ६ ) कड्याच्या पायथ्याशीं पावर हाऊस बांधण्यास योग्य जागा आहे काय ? ( ७ ) पावरहाऊसमधून बाहेर पडणाऱ्या पाण्याच्या प्रचंड ओघास वाट देऊन तो जवळपासच्या दुसऱ्या एखाद्या नदीस जोडून देतां येईल काय ? ( ८ ) विद्युत् उत्पादन व शेतीसाठी कालवे अशी जोड योजना असल्यास धरणांतील पाणी सोडण्यास व कालवे काढण्यास योग्य जागा आणी दूरवर असलेल्या हजारो एकर जमिनीस पाणी पुरविण्यासाठी लागणारी अनुकूलता आहे काय ?

वर नमूद केलेल्या सर्वच बाबी किती महत्त्वाच्या व गुंतागुंतीच्या आहेत हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. त्या प्रत्येकीसंबंधीची पूर्ण माहिती मिळविल्याशिवाय अशा तऱ्हेची कोणतीही मोठी योजना बरोबर आंखतां येणार नाहीं.

तथापि, त्यापैकीं कांहींचा म्हणजे मोठालीं धरणें बांधण्यापूर्वीं ज्या गोष्टींची निश्चितपणें माहिती मिळवावी लागते त्यांचाच येथें थोडासा विचार करूं.

## नद्यांचे प्रवाह व पूर

एखादें मोठें धरण बांधण्याची योजना आंखण्यापूर्वीं त्या ठिकाणीं जी नदी असेल तिचा प्रवाह किती व केव्हां वाहातो यासंबंधीची पूर्ण माहिती असावी लागते. कारण, धरण बांधण्याचा उद्देश पाण्याचा मोठा सांठा बनविणें हा असल्यानें येथील पाण्याची आयात दरसालची किती आहे हें पाहिलेंच पाहिजे.

आतां पाण्याचा पुरवठा हा त्या भागांत पडणाऱ्या पावसावर व तेथील क्षेत्राच्या विस्तारावर अवलंबून असल्यानें त्या दोहोंचें मोजमाप करणें अवश्य आहे. यासाठी त्या भागांत बऱ्याच ठिकाणीं पाऊस मोजण्यासाठी "रेन गेजेस" बसवून दरसालचें पावसाचें मान काढावें लागतें. कोणत्याही खोऱ्यांत दरसाल एकाच मानानें पाऊस पडत नाहीं. सबब अनेक वर्षांचे पावसाचे आंकडे काढून त्यावरून दरसालची सरासरी काढावी लागते. पावसाचें पाणी नद्यांचे उगमापासून धरणाचे जागेपर्यंतच्या सर्व क्षेत्रावर पडतें व त्यापैकीं कांहीं भाग जमिनींत व जंगलामध्यें शोषिला जाऊन बाकीचें पाणी नद्यांतून पुराचे रूपानें वाहूं लागतें. तेंही रिव्हर गेजेस-

त्या सहाय्यानें अंदाजानें मोजून पाहातां येतें. सहाजीकच जेथें पावसाचें मान ज्यास्ती व डोंगरांतील खोऱ्यांचें क्षेत्रही मोठें असतें तेथें नदीचे पूरही मोठे येतात. यासंबंधीची माहिती जितक्या दीर्घ कालापर्यंतची असेल तितकी ती हवी असते. कारण, त्यावरून त्या भागांत नदीस पूर कोणत्या वेळीं व किती येतात, कोणकोणत्या वर्षी महापूर येऊन गेले अगर पूर अगदींच कमी आले आणि पाण्याचा दुष्काळ पडला, दुष्काळाचे अगर अतिवृष्टीचे फेरे किती वर्षांनीं पुनः आले आणि त्याचप्रमाणें महापुराचे वेळीं दर सेकंदास पाणी किती वाहात होतें व नेहेमींच्या इतर वर्षामध्यें नदीचा प्रवाह साधारणपणें किती वाहातो याची माहिती मिळविणें फार आवश्यक असतें. कारण, या निश्चित माहितीवरच पुढें होणाऱ्या तलावांतील पाण्याच्या सांठ्याचें भवितव्य अवलंबून असतें.

निसर्गापासून मिळणाऱ्या पाण्याचा अंदाज काढल्यावर हें सर्व पाणी सांठवितां येईल काय, त्याला लागणारें लांब, रुंद व उंच असें मोठें विस्तृत खोरें आहे काय हें पाहावें लागतें.

ही पाहाणी करतांना अवघड अशा डोंगरकठाड्यांतून सर्व खोऱ्यांमध्यें नदीचे उगमापर्यंत अनेक वेळां लेव्हल व होकायंत्र यांच्या सहाय्यानें तपासून पाहावें लागतें. समान उंचीचे भाग, त्यांची लांबी, रुंदी वगैरे मोजून सर्व भागांचे नकाशे तयार करावे लागतात आणि त्यावरून किती पाण्याचा सांठा होऊं शकेल व धरण बांधल्यावर पाणी कोणत्या घळींतून घुसेल, किती भाग जलमय होईल, किती गांवें तलावांत बुडतील यासंबंधीची माहिती काढतां येते. अशा मोठ्या धरणामुळें बनविलेला भाटघर येथील पाण्याचा सांठा अंदाजें २१/२ सर्व घनफूट आहे व मुळशी धरणातील पाण्याचासांठा ११/२ सर्व घनफूट आहे आणि कोयना धरणामुळें होणारा पाण्याचा सांठा १५३/४ सर्व घनफूट होईल.

### धरणास योग्य जागा

अशा तऱ्हेनें अमुक एक कोटी घनफूट पाणी सांठवितां येईल असा अंदाज लागल्यावर तितकें पाणी थोपविण्यासाठी किती उंच धरण बांधावें लागेल हें ठरविण्यांत येतें आणि त्यासाठी योग्य अशी जागेची निवड करावी लागते.

धरणाची जागा निवडतांना धरणाची लांबी थोडी असावी आणि त्यासाठी नदीचे दोनही तीरावरील टेकड्या उंच असाव्या; तसेंच त्या समोरासमोर असून जवळ आलेल्या असाव्या, पाया पक्का असावा व पुराचें ज्यास्ती येणारें पाणी वाहून देण्यासाठी सोय असावी; अशा अनेक गोष्टींसंबंधी काळजीपूर्वक पाहाणी करावी लागते.

धरणाचा पाया पक्क्या दगडाचा नसेल तर धरण खचेल व फुटेल. नदीस मोठे पूर आले व पाण्यास योग्य ती वाट ठेवली नाहीं तर पाण्याचे लोंढे धरणास धक्के देऊन त्यावरून खालीं कोसळेल व त्याचा जोर ज्यास्ती झाल्यास तें धरणासही फोडील

धरणाचे ठिकाणीं पाया पक्का आहे किंवा नाहीं हें शोधण्यासाठी बोअरिंग मशिनचा फार उपयोग होतो. त्याच्या सहाय्यानें नदीच्या पात्रांत व तीरावरील टेकड्यामध्यें दगड किती खोल आहे हें समजूं शकतें. बोअरिंग करून जमिनीचे आंतील १००–२०० फूट अगर ज्यास्त खोलीचे सुद्धां वरवंट्यासारखे दगड बाहेर काढता येतात व ते तपासून दगड कसला आहे, किती खोलीवर आहे, किती जाड आहे, वगैरे माहिती मिळते. कित्येक ठिकाणीं १००–१५० फूट खोल गेल्याशिवाय चांगला पक्का दगड मिळत नाहीं व कांहीं ठिकाणीं पक्का दगड लागून त्याखालीं पुनः मातीमुरूम लागतो. कांहीं ठिकाणीं पाण्याचे झरे लागतात आणि कांहीं ठिकाणीं फारसे खोल न जातांहीं काळा पाषाण लागतो.

आपल्या सह्याद्रींतील (ट्रॅप) दगड बहुतेक ठिकाणीं पक्का, एक जिवाचा, घट्ट, बिनसांध्याचा, जड वजनाचा व लवकर न फुटणारा असतो आणि त्यामुळें त्यावर मोठालीं उंच धरणें बांधलीं तरी तो पेलून धरतो व खचत नाहीं.

### धरणाचा आकार व प्रकार

धरणाचें डिझाइन ठरविणें हें फार महत्त्वाचें काम असतें. धरणाचा आकार, जाडी, उंची वगैरे सर्व योग्य त्या प्रमाणांत असलीं पाहिजेत; कारण, धरण बांधल्यावर त्याला पाण्याचा दाब सहन करतां आला पाहिजे. तसेच, नदीच्या पुरामध्यें तें न डगमगता पाण्याचे धक्के सहन करून ठाम उभें राहिलें पाहिजे. सरोवराएवढा पाण्याचा मोठा सांठा झिरपूं न देतां आपल्या ताब्यांत ठेवील व हवें तेव्हां आणि हवें तेवढें पाणी त्यांतून नियमितपणें सोडतां येईल, पावसांत अगर उन्हांत कसलेंही आच्छादन नसतांहि शेंकडों वर्षें आपलें काम बजावील आणि डागडुजी करणें शक्य नसल्यामुळें त्याची गरजच भासूं देणार नाहीं, असें तें व्हावें लागतें. किंबहुना, नदीचे दोन तीरांवर जशा निसर्गनिर्मित टेकड्या असतात तशीच दोहोंना जोडणारी एक बिनसांधी कृत्रिम टेकडीवजा अभेद्य भिंत निर्माण करावी लागते.

धरणामध्यें निरनिराळे प्रकार असतात. कांहीं धरणें एका सरळ रेषेंत असतात, कांहीं थोडासा बांक घेऊन आडव्या कमानीच्या आकृतीचीं असतात, कांहीं धरणें दगडी बांधकामाचीं असतात तर कांहीं सिमेंट कॉंक्रीटचीं असतात. त्याचप्रमाणें, नद्यांचे पूर डोक्यावरून वाहून देणारीं अशीं कांहीं धरणें असतात, तर फार उंच धरणावरून सबंध नदीचा प्रवाह खालीं पाडणें धोक्याचें असल्यानें अशा धरणाशेजारी 'वेस्ट वीर' बांधून अगर फाजील पाणी वाहून जाण्याची दुसरी सोय (सरप्लस चॅनेल) खोदून सबंध पुराचें पाणी परभारें दुसऱ्या वाटेनें नेऊन पुढें नदीस मिळवावें लागते.

### धरणाची सामुग्री

मोठ्या प्रतीच्या धरणास पायाही खोल खोदावा लागतो व तो सर्व बांधून भरून काढण्यास आणि त्यावर सर्व धरण पूर्ण बांधण्यास साधनसामुग्रीहि फार मोठी लागते. दगड, वाळू, खडी, सिमेंट, चुना वगैरे मुख्य जिन्नस तर लाखों घनफुटांवर पुरवावे लागतात. त्यासाठीं हें सर्व सामान चांगल्या प्रतीचें कोठें मिळेल, लांबून आणावें लागेल किंवा काय आणि त्यासाठी वहातुकीचीं साधनें किती लागतील व त्याला किती खर्च येईल याची पूर्ण माहिती काढावी लागते. त्याचप्रमाणें, यंत्रसामुग्रीही बऱ्याच प्रकारची लागते. प्रत्यक्ष पाया फोडतांना पाणी उपसून टाकण्यासाठी मोठाले पंप, दगड फोडून खडी व वाळू दळण्यासाठीं अनेक क्रशर्स, कॉंप्रेसर्स, जॅकहॅमर्स, ड्रिलिंग मशीन्स, मिक्सर्स, माल धरणावर पुरविण्यासाठी क्रेन्स, टॉवर्स, इंजिने, डबे, लाडसे व शेकडों मैल ट्राम लाईन्स, अशीं अनेक प्रकारचीं यंत्रें व एक सुसज्ज वर्कशॉप आवश्यक असतें. आपल्याकडील झालेल्या मोठ्या धरणांपैकीं भाटघर धरणामधील बांधकाम ५ कोटी, १५ लक्ष घनफूट आहे. तसेंच मद्रास इलाख्यांतील मोठें धरण "मेट्टूर डॅम" यामधील बांधकामाचें मापहि ५॥ कोटी घनफूट आहे. यावरून सहज लक्षांत येईल कीं, एवढी मोठी सामुग्री जमा करण्यापूर्वीं त्यासाठी शक्य ती लागणारी माहिती, जागांचा शोध व खर्चाचा अंदाज हें आगाऊ काढणें किती महत्वाचें आहे.

धरणाचें काम सुरू करण्यापूर्वी नदीचा प्रवाह थोडाथोडा क्रमानें ताब्यांत घ्यावा लागतो. एकदमच सर्व पात्रांत पाया सुरू करता येत नाहीं आणि त्यासाठीं जेथें प्रत्यक्ष प्रथम काम सुरू करावयाचें असेल त्या जागेच्या सभोंवार 'कॉफरडॅम'—लहान बांध बांधावे लागतात. त्यामध्यें पंप बसवून पाया उकरण्यास सुरवात होते व तो खोलपर्यंत जेथें एकसंधी पक्का दगड असेल तेथपर्यंत फोडावा लागतो. खोल पाण्यांतील काम बरेंच अवघड व जोखमीचें असतें. होणाऱ्या धरणाचा पाया जितका चांगला, बळकट आणि काळजीपूर्वक घातला जाईल तितकें तें आवश्यक असतें. सर्व पाया तयार होईपर्यंत दोन वर्षें अंदाजें लागतात आणि मोठी धरणें पूर्ण होण्यास अंदाजी दहा वर्षें लागतात. या बाबतींत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी असते. अशा तऱ्हेचीं कामें हीं अवघड, अडचणींच्या ठिकाणीं असतात. तसेंच पावसाळ्यामध्यें नद्यांना पूर आले म्हणजे सुमारें चार महिने तेथें कामही चालूं शकत नाहीं. अशा वेळीं हजारों मजुरांना काम पुरविणें हा बिकट प्रश्न सोडवावा लागतो; कारण वाकबगार व कामाचा अनुभव असलेलीं माणसें वरचेवर बंद केल्यास पुनः लवकर ती मिळत नाहींत.

धरणाचे कामासाठीं लागणाऱ्या सर्व माणसांना राहाण्यासाठी घरें व चाळी पुष्कळच बांधाव्या लागतात; किंबहुना तेथें एक लहानसें नवीन गांवच वसवावें लागतें. असो.

अशा तऱ्हेनें पाण्याचा सांठा तयार केल्यावर प्रथम सांगितल्याप्रमाणें वीज उत्पन्न करावयाची असल्यास हें पाणी उंच डोंगरावरून खालीं पायथ्यापर्यंत मोठाल्या नळांतून न्यावें लागतें. त्यासाठी ६ अगर ८ फूट व्यासाएवढे मोठालेसुद्धां नळ उपयोगांत आणावे लागतात व अतिशय बिकट जागेंत डोंगराच्या पायथ्याशीं पॉवर हाऊसपर्यंत जोडावे लागतात. उंचावरून सुटलेल्या पाण्याचा दाब सहन करण्यासारखे सामर्थ्यवान असे हे नळ असतात व यांची किंमतही लक्षावधि रुपये असते.

पुढें पॉवर हाऊसमध्यें बसविलेल्या मोठाल्या टर्बाइन्सवर हें पाणी सोडलें जातें व त्यायोगानें सर्व मशिनरी फिरूं लागून त्यावर हजारों अगर लक्षावधि अश्वशक्ति वीज निर्माण होऊं लागते आणि ही शक्ति अनेक शहरांत व कारखान्यांना पोहोंचविली जाते. त्याचप्रमाणें धरणांतील कांहीं पाणी देशावर शेतीसाठी दूरवर कालवे काढून त्यांतून लक्षावधि एकरांना पिकासाठी पुरविलें जातें.

वर सांगितलेल्या सर्व गोष्टींचा विचार करून व पूर्ण माहिती मिळवून अशा तऱ्हेच्या योजना आंखण्यास सहाजीकच ४--५ वर्षें लागतात. त्यांचेवर होणाऱ्या खर्चाचा अंदाज काढण्यांत येतो व त्या आर्थिक दृष्टया कितपत ग्राह्य व फायदेशीर होतील याचाही विचार करावा लागतो. त्यासाठीं कामास लागणाऱ्या खर्चाचें सालवारी पत्रकाचें काम पूर्ण झाल्यावर दरसाल त्यासाठीं होणारा खर्च व योजना अमलांत आल्यावर त्यापासून विद्युत्शक्तीच्या विक्रीचें व शेतीस पुरविल्या जाणाऱ्या पाण्याचें दरसालचें उत्पन्न हीं सर्व अंदाजपत्रकें आगाऊ तयार करणें अगत्याचें असते. असो.

महाराष्ट्रामध्यें अशा योजना होण्याची शक्यता फार आहे आणि त्या तशा झाल्यास त्यापासून सहाजीकपणेंच उद्योगधंद्यांना, कारखान्यांना व शहरांना मुबलक वीज मिळून शेतीसही पुष्कळ पाणी मिळेल. सध्यां भासत असलेली कोळसा व इतर तेलें यांची टंचाई आपोआपच कमी होईल व धान्य ज्यास्त पिकूं लागून आणि लोकांना उद्योग मिळून सुस्थिति प्राप्त करून घेतां येईल.


# दि कोल्हापूर मराठा को. बँक, लि.

कोल्हापूर.

स्थापना १९३३

| | रुपये |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २,००,००० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ७१,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ५०,००० |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

व्ही.एन. यादव, मॅनेजर. कर्नल के.एस. खानविलकर, झुंजारराव प्रेसिडेंट.

( फलटण येथें १९२६ मध्यें स्थापन झालेली )

# श्रीलक्ष्मी सें. को-आपरेटिव्ह बँक लि., फलटण

फलटण, ( जि. सातारा. )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | २,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | १,५३,००० |
| वसूल भांडवल ... ... ... | रु. | ६३,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... ... | रु. | १,४५,००० |
| ठेवींची एकूण रक्कम ... ... | रु. | २३,८८,००० |
| खेळतें भांडवल ... ... ... | रु. | २५,९६,००० |

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

★ जोडलेल्या सहकारी पतपेढ्या व बँकेचे भागीदार यांना सर्व प्रकारच्या तारणावर कर्ज, कॅश क्रेडिट व ओव्हरड्राफ्ट दिला जातो.

★ वेस्टर्न इंडिया, एशीयन व कॉमनवेल्थ या कंपन्यांचे विमा इथे स्वीकारण्यांत येतात.

★ बँकेचे सर्व व्यवहार केले जातात. ★

★ ही दीपावली ★
बँकेच्या सर्व हितचिंतकांना भाग्याची व आनंदाची होवो.

श्री. ह. तळवलकर, व्यवस्थापक

वि. शं. झिरपे, वकील B. A., LL. B. अध्यक्ष

नवीन वर्ष आमच्या सर्व सभासदांना व गिऱ्हाइकांना सुखाचें जावो.

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

( स्थापनाः २४ जानेवारी, १९१७ )

चेअरमनः—श्री. पु. पां. गोखले, बी. ए., एम. एल. ए.

| | रुपये |
|---|---|
| भाग वसूल भांडवल : | १,१४,००० |
| गंगाजळी व इतर निधी : | १,७०,००० |
| एकूण ठेवींची रक्कम : | ११,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल : | २४,००,००० |

चालू वर्षापासून सभासदांचेकरितां बँकेनें प्रॉ. फंड योजना आंखली आहे.

ठेवींचे दरः—( १ ) चालू ठेव : रु. ०–१२–० ( २ ) सेव्हिंग्ज ठेव : रु. १–१२–० ( ३ ) मुदत ठेव रु.३ %

सतत १६ वर्षें 'अ' वर्गांत दाखल असलेली ही बँक ठेवीदारांचा विश्वास व सभासदांचें सहकार्य यांचे बलावर स्वातंत्र्याचे काळांत जनतेची सेवा अधिक प्रमाणांत करण्याची उमेद बाळगते.

सि. कृ. एकांडे
मॅनेजिंग डायरेक्टर



## दी बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP    फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी ( २ ) शाहुपुरी–कोल्हापूर ( ३ ) मलकापूर ( ४ ) पेठ वडगांव ( ५ ) जयसिंगपूर ( ६ ) इचलकरंजी ( ७ ) गडहिंग्लज ( ८ ) निपाणी (जि. बेळगांव) ( ९ ) मुंबई ( १० ) मांडवी–मुंबई.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था होत आहे.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.



## "जय हिंद"

बँकेच्या सर्व हितचिंतकांना, भागिदारांना व खातेदारांना ही दिवाळी आनंदाची जावो व नवीन वर्षी अधिकाधिक भरभराट प्राप्त होवो.

## दी बँक ऑफ औंध, लि०

सातारा

( औंध संस्थानांत स्थापना; भागिदारांची जबाबदारी नियमित )

शाखा—औंध, आटपाडी भवानीनगर व ओगलेवाडी

हेड ऑफिस : सदाशिव पेठ, सातारा शहर



## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | "Cencobank" | नं. ५११ |

मुख्य कचेरीः–लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातातः—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

# उत्पादन आणि महागाई

लेखकः— श्री. शंकर ज. जोशी, बी. कॉम्.
( त्रावणकोर-ओगले ग्लास मॅ. कं. लि., त्रावणकोर )

आज आपणा सर्वांना अधिक उत्पादन पाहिजे आहे.

कशाकरितां ?

नुकतेंच मिळालेलें स्वातंत्र्य टिकविण्यासाठी. झपाट्यानें बदलणाऱ्या जगांत आपलें स्थान सुरक्षित राखण्यासाठी. 'श्रीमंत हिंदुस्थानांतील दरिद्री माणूस' हें चित्र बदलण्यासाठी. सर्वांचें जीवन सुखी, समाधानी नि समृद्ध करण्यासाठी.

ह्यांत नवीन असें कांहींच नाहीं. कालपर्यंतच्या स्वातंत्र्यसंग्रामांतील आपले पुढारीच आज सरकारांत आहेत.आपल्या आशा-आकांक्षा त्यांना समजत नाहींत, आपली बोंच त्यांना खुपत नाहीं, असें कसें म्हणतां येईल ?

युद्धोत्तरच्या गेल्या दोन वर्षांतील काळांत उत्पादन विशेष सुधारलें नाहीं. महागाई मात्र सर्व देशांत कमी अधिक प्रमाणांत वाढत आहे.

चढलेल्या किंमती उतरविणें एवढाच आपला प्रश्न असेल तर तो सोपा आहे. व्यवहारांतील चलन काढून घेऊन किंमती उतरविता येतील. पण तेवढ्यानें जिनसा कशा मिळणार ? याकरितां उत्पादन वाढवून चढ किंमती उतरविण्याचे आपले प्रयत्न हवेत. वस्त्रप्रावरण, भाजी, सर्पण, अन्नपाणी इत्यादि जीवनोपयोगी वस्तूंचें उत्पादन व पुरवठा वाढवून त्यांच्या वाटणीची योग्य व्यवस्था करणें आवश्यक आहे. केवळ चलनांत कमीजास्त करून हा प्रश्न सुटणारा नाहीं.

सर चिंतामणराव देशमुख यांनीं आर्थिक अरिष्टाबाबत निःसंदिग्ध शब्दांत इशारा दिला होता:—"हिंदुस्थान व पाकिस्तान सरकार आपापले राज्यकारभार पाहूं लागल्यावर त्यांना एका निकडीच्या प्रश्नाचा विचार करावा लागेल. तो म्हणजे सार्वजनिक जीवनांत व सरकारी खात्यांत माजलेली लांचलुचपत. परिस्थिति अशीच चिघळत गेली तर सरकारी नियंत्रणांची अंमलबजावणी शिथिल होत जाईल आणि त्याचे दुष्परिणाम गरीब व कायदा-भीत जनतेला भोगावे लागतील. अन् तसें झालें म्हणजे नियोजनबद्ध उन्नतीची भाषा सोडून द्यावी लागेल. किंमती वाढल्या म्हणून पगार वाढले, पगार वाढले म्हणून किंमती वाढल्या हा पाठशिवणीचा खेळ थांबवून महागाईला पायबंद घालण्याकरितां औद्योगिक, विशेषतः शेतकीचें उत्पन्न वाढविण्याचा तितक्याच महत्त्वाचा दुसरा प्रश्न आहे. आपल्याला शहाजोग राष्ट्र म्हणून मानानें रहावयाचें असल्यास देशांतील अन्नाची पुरेशी पैदास होण्याची व्यवस्था होणें आवश्यक आहे. समाजांतील मध्यवर्गीय व गरीब मंडळींना झेपतील अशा निदान जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमती ठेवण्याची व आर्थिक परिस्थिति आणखी बिघडूं न देण्याची व्यवस्था झाली नाहीं तर देशांत नियोजनबद्ध औद्योगीकरण अशक्य होईल. याबाबत ताबडतोब योजना न झाल्या तर वाढती निराशा नि असहाय्यता सारें सामाजिक व आर्थिक जीवन उध्वस्त करून टाकील अशी भीति वाटते." पहिल्या स्वातंत्र्य दिनापूर्वी नमूद केलेले हे विचार एका वर्षाचे आंत खरे ठरले; तज्ज्ञांची भविष्यवाणी खरी ठरली !

उत्पादन व पुरवठा वाढविल्याखेरीज तरणोपाय नाहीं याची जाणीव सर्वांना होत आहे. पण...पण

**आमचें सरकार :**

देशाच्या संरक्षणाच्या हिताच्या दृष्टीनें व जनतेच्या स्वास्थ्याकरितां देशांत भरपूर उत्पादन होणें आवश्यक आहे, निकडीचें आहे. आम्हीं याबाबत योजना आखीत आहोंत. सर्वांनीं सहकार्य द्यावें.

**भांडवलदार-कारखानदार :**

आमचीही इच्छा तीच आहे. गेल्या वर्षी उत्पादन कमी झालें. आमचें उत्पन्न कमी झालें. उत्पादन वाढीबरोबर आमचा फायदाच आहे. आम्ही सदैव त्याच खटपटींत असतो. पण-पण आमच्या कार्यांत अडचणी आहेत. सरकारनें आम्हांस मदत द्यावी. कामगारांनीं सहकार्य द्यावें.

**कामगार किसान :**

काम कशाकरितां करावयाचें ? पोटाकरितां ? मरमर मरतोय् पण महागाई सारी खाऊन टाकतेय्. काम करायला त्राण तरी आहे कां शिल्लक ? अन् जास्ती काम करून मालकाचेच खिसे भरावयाचे ना ? आम्हांला काय मिळणार, हाडं कीं लांकडं ? मान कीं पैसा ? हाडाची काडें करून मिळतें काय हातांत ? महागाई वाढली २० रुपयांनीं अन् भत्ता हातीं आला ५ रुपये ! कांहीं करा. कसंही करा. कितीही राबा. पुरं म्हणून पडत नाहीं.

रेशन बंद झालें. गहूं-तांदूळ महागला. कापड कडाडलें. सारा बाजारच भडकला. नफेबाजीला नुसता ऊत आला. काळा बाजार खुला बाजार झाला. लाखा-कोटींनीं पैसे केले म्हणतात. आम्हाला काय त्याचं ? आम्ही काम करायचं-मरायचं, अन् त्यानं श्रीमंत व्हायचं !

सरकारनें सक्ति केली. धान्याचा खरेदीभाव ठेवला कमी. बाजारांत जावें तो कापड नाहीं, साखर नाहीं, राकेल नाहीं. त्याला द्यायची काळ्या बाजाराची किंमत. भागायचं कसं ?

रेशनिंग उठलें. बरं वाटलं. भाव मागूं तो मिळायला लागला. पण पुन्हां घेरे माझ्या मागल्या. कशा, कशाकरितां राबायचं ?

**बहुजनः**

आम्ही सरकारला निवडून दिलें. सरकारी मंडळींचें ठीक आहे. आमच्याकरितां एक घर बांधून झालें नाहीं अजून कीं धान्या-कापडाची किंमत एक पैनेही उतरली नाहीं. सारें कठीणच होत चाललें आहे. आमचेंचें सरकार, त्यामुळें धड आम्हाला स्पष्टपणानें बोलतांही येत नाहीं. सरकारजवळ धड योजना नाहीं, निश्चित कार्यक्रम नाहीं. सरकारी मंडळी काय काय बोलतात, सान्याचा अर्थ लावावयाचा म्हटला तर वेळ नाहीं पुरावयाचा. गोष्टी सामुदायिक शेतीच्या तर मुंबईत कायदा ५० एकरांचा, कारखान्यांनीं उत्पादन वाढवावें म्हणून एक बोलणें तर दुसऱ्या दिवशीं स्वस्त परदेशी मालाच्या आयातीचा जाहिरनामा, ही महागाई, जागेची-पाण्याची टंचाई, प्रवासांतील गर्दी, हें रेशनिंग, ही नफेबाजी, हा खुला काळा बाजार, हें निःसत्त्व अपुरें अन्न. अगदीं कावून चिडून गेलों आहे. हा वनवास संपणार तरी कधीं ? कांहीं समजेनासें झालें आहे. ही आठ वर्षांखालचीं इवलीं इवलीं मुलें. वॉर क्वालिटी. बघवत नाहीं त्यांचेकडे. त्यांचे ते निस्तेज फिकट चेहरे, हातापायांच्या काड्या, सारखी येणारी आजारपणें. डोळ्याला टचदिशी पाणी येतें. पोटांत ढवळतं. कर्जपाणी न करतां अब्रूनें राहणेंही अशक्य झालें आहे. वाटतें



डोकेंदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज

# रामतीर्थ ब्राम्ही तेल

[ स्पेशल नं. १ ]

पांढरे केस काळे होतात, स्मरण-शक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोंप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.

१ पौं. बाटली रु. ३-८-०
८ औं. बाटली रु. २-०-०
( ट. ख. निराळा )

प्रत्येक दुकानदाराकडे मिळतें.

श्री रामतीर्थ योगाश्रम
४४८, सॅन्डहर्स्ट रोड, मुंबई ४

★ मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.



# हिंदुस्थान रबर प्रॉडक्टस्

११० मंगळवार, पुणें.

रबरी फुग्यांसाठी नांवाजलेला हा पहिला व जुना कारखाना लवकरच हरतऱ्हेच्या नव्या नव्या रबरी वस्तू विक्रीस काढणार आहे.

ही दिवाळी आमचे ग्राहकांस सुखाची जावो.



# भोर स्टेट बँक लि., भोर

शाखाः-पाली, पुणें, शिरवळ.

वसूल झालेलें भांडवल. रु. २,५०,०००
रिझर्व फंड रु. ८०,००० चे वर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. वि. वि. बावडेकर ( अध्यक्ष )
श्री. वा. पुं. वर्दे ( उपाध्यक्ष )
श्री. व. वि. लोणकर
श्री. द. शं. वाळिंबे
श्री. वा. ग. रानडे
श्री. म. व्यं. शिंगरे
श्री. ना. पां. थोपटे
श्री. चु. शि. रावळ
श्री. चं. रा. राठी

रा. गो. आगाशे
मॅनेजर



# दि बेळगांव बँक लि.

हेड ऑफिस : बेळगांव.

शाखाः—संकेश्वर, होसूर ( बेळगांव ), गोकाक, कँप ( बेळगांव ), वेंगुर्ला, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, धारवाड, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी व अनगोळ.

| | |
|---|---|
| वसूल झालेलें शेअर भांडवलः | ५,००,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड्स : | १,०९,००० रु. |
| एकूण ठेवी : | ५६,००,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल : | ६२,००,००० रु. चे वर |

बँकिंगचा सर्व तऱ्हेचा व्यवहार केला जातो.

श्री. अ. रा. नाईक, बी., ए, बी. एससी., एलएल. बी. मॅनेजिंग डायरेक्टर

श्री. गो. वि. सराफ बी. ए., एलएल. बी. चेअरमन

नको हा संसार नि पसारा. नाहीं आतां सहन होत सारं पण. पण जाऊं तरी कुठं. कसा ?

## उत्पादन कशानें वाढेल ?

**आपलें सरकार :**

कारखानदार व कामगार यांनीं सलोख्यानें वागून जास्तीत जास्त उत्पादन करावें. औद्योगिक तहनाम्याप्रमाणें आम्ही व्यवस्था करीत आहोंत.

किंमती स्थिरावण्याकरितां चलन-नाण्याबरोबर मालाचा पुरवठा वाढवयास पाहिजे. देशांतील उत्पादन कमी पडल्यास परदेशांतून माल आणून किंमती काबूंत ठेवण्याचा आम्ही विचार कायम केला आहे.

कारखानदारांनीं भांडवलशाही वृत्ति सोडावी. परवां कापड-व्यापाऱ्यांनीं व गिरणीमालकांनीं नफेबाजी केलेली पाहून आम्हांला परम दुःख होत आहे.

कामगारांनीं जास्ती काम, व कामांतील नुकसान कमी करून उत्पादन वाढवावें. त्यांच्या सुखसोयींबाबत आम्ही निरनिराळे कायदे करीत आहोंत.

कसेल त्याची जमीन हें तत्त्व आम्ही मान्य केलें असल्यानें शेतकऱ्यानें आतां निश्चिन्त असावें व जास्तींत जास्त पीक काढावें. सहकारी संस्थांमार्फत त्याच्या सर्व गरजा भागविण्याची आम्ही व्यवस्था करीत आहोंत.

परदेशी धान्याच्या किंमती चढत आहेत. पाकिस्तानमध्यें गव्हाचें कोठार गेलें. गंगेला पूर आल्यानें खूपच नुकसान झालें आहे. पावसाची कृपाही नाहीं. परिस्थिति कठीण आहे. तरी आमचा सर्व भरंवसा आमच्या किसान-बंधूंवर आहे.

नियंत्रणें आम्ही पुन्हां हळुहळु बसवींत आहोंत. जनतेनें काळ्या बाजाराला व नफेबाजीला बळी पडूं नये.

सरकार आपलें आहे. त्यावर विश्वास ठेवावा. आपल्या सरकारनें केलेले कायदे-नियम काटेकोरपणानें पाळावे.

याबाबत इंग्लिश माणसाचें उदाहरण मोठें नमुनेदार आहे. लोकशाहींतील मतमतांचा गलबला इंग्लंडमध्येंही आहे. पण सरकारनें एकदां कायदा केला कीं तो कटाक्षानें पाळला जातो. स्वातंत्र्याबरोबर जबाबदारी व शिस्त आलीच. बेजबाबदार, गैरशिस्त, आळशी, चैनीचट्ट असलेलें कोणतेंही राष्ट्र वर आल्याचा इतिहासांत दाखला नाहीं.

**भांडवलदार-कारखानदार :**

संपत्तीनें संपत्ति लवकर निर्माण होते. आमच्या संपत्तीचा, व्यापार-उद्दिमांतील अनुभवाचा, औद्योगिक क्षेत्रांतील तज्ज्ञतेचा सरकारनें उपयोग जरूर करून घ्यावा.

आज सर्वत्र राष्ट्रीयीकरणाचें वातावरण आहे. रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयिकरणाच्या बिलाच्या चर्चेच्या वेळीं हा प्रश्न निघाला. बँकेचें राष्ट्रीयीकरण करून आज तादृश फायदा कोणता ? आजच्या स्वरूपांतील रिझर्व्ह बँक देशाच्या प्रगति आड कुठें येत आहे ? या प्रश्नाचीं समाधानकारक उत्तरें सांपडत नाहींत.

आल्डस हक्स्ले म्हणतात : आतांपर्यंतचा अनुभव असा आहे कीं, भांडवलशाही पद्धतीनुसारच सरकारी संचालनाखालील धंदे चालविले जात आहेत. जमीन व नैसर्गिक साधनसंपत्तीबरोबरच उत्पादनाच्या साधनांचेंही राष्ट्रीयीकरण करण्यांत येतें. अन् तसें करण्याचा हेतू सर्वसामान्य स्त्री-पुरुषांची मालकशाहींच्या आर्थिक पाशांतून मुक्तता करण्याचा नसून जनतेच्या विरुद्ध सरकारचे ( सरकारांत असलेल्या राजकीय पुढाऱ्यांचे ) हात बळकट करण्याचाच असतो.

एका इंग्लिश वृत्तपत्रांत म्हटल्याप्रमाणें, "सरकार हा चांगला मालक नाहीं; वाईटही नाहीं. सरकार म्हणजे अति दूर, व्यक्तित्व नसलेला, अबोल मालक आहे. त्याला कामगारांत उत्साह निर्माण करतां येत नाहीं कीं त्यांच्या सदिच्छाही संपादन करतां येत नाहींत. सरकार हा असा निर्गुण, निराकार, निरहंकार मालक आहे !"

इंग्लंडच्या राष्ट्रीय जीवनांत लोखंड-पोलाद या धंद्याला महत्त्वाचें स्थान आहे. तसाच तो मोठा गुंतागुंतीचा नि अवघड धंदा आहे. त्याचें भवितव्य ठरवितांना विशेष काळजी घ्यावयास हवी; दूरवर विचार करावयास हवा, याबाबत सरकारला निराळी व्यवस्था करावयास सांगून त्याला घाई करण्याबाबतचा ठराव ब्रिटिश ट्रेड युनिअन काँग्रेसच्या मार्गेट येथें नुकत्याच भरलेल्या अधिवेशनांत बहुमतानें फेटाळण्यांत आला ! इंग्लिश कामगारांची राष्ट्रीयीकरण याबाबतची भूमिका ही अशी आहे.

सरकारच्या ताब्यांत जाईपर्यंत फायद्यांत चालणारी कानपूर इलेक्ट्रिक कंपनी गेल्या वर्षी—राष्ट्रीयीकरणाच्या पहिल्याच वर्षी—तोट्यांत गेली. हा झाला आमचा अनुभव.

उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करावयाचें, जमीनदारी नाहींशी करावयाची, तर त्याला लागणारा पैसा सरकारजवळ आहे का ? अधिक चलनी नोटा काढावयाच्या तर महागाई वाढेल कीं कमी होईल ? अन् हें सारें करून उत्पादन ताबडतोब वाढणार आहे कां ? आज निकड आहे प्रत्यक्ष कार्याची.

कच्च्या मालाच्या वाहतुकीच्या, भांडवली खर्चाच्या, अडचणी सरकारनें भागवल्या तर साधनसामुग्री आहे त्यांतही उत्पादन वाढवितां येईल—नवीन यंत्रसहाय्यानें पुष्कळच वाढवितां येईल. याबाबत सरकारला आम्ही निश्चित योजनाही दिली आहे.

सरकारचें सर्वसाधारण धोरण कामगारांना अनुकूल असें आहे. त्याबद्दल आम्हांला कांहीं म्हणायचें नाहीं. फक्त आम्हीं नेहमीं चूक अन् कामगारांनीं मागण्या करायच्या व त्या सरकारनें एकतर्फी मान्य करीत जावयाचें असें कांहींसें होत आहे. कामगार भरपूर काम करीत नाहींत, कामांत लक्ष देत नाहींत. त्यामुळें हातीं कामही पुरेसें नि चांगलें येत नाहीं. याबाबत सरकारनें त्यांना समज दिली पाहिजे.

**कामगार-किसान :**

सरकारनें खूपशा नोटा काढल्या म्हणून महागाई झाली असें कांहींसे म्हणतात. त्याची व्यवस्था सरकारनें करावी. आम्ही गरीबांवर कां उगीच ?

म्हणे काम चांगलें करा, जास्ती करा म्हणजे महागाई हटेल. वॉर टाईमांत नाहीं कां रात्रंदिवस केलीं कामें आम्ही ? कामाचें काय ? आजही करूं. पण कशाकरितां ? कसं ? या महागाईत कांहीं पुरेंच पडेना.

यंत्रें सारीं खराब झालीं आहेत. जुनीं झालीं. काम करायला चांगला मालही देत नाहींत. तयार माल तर गुदामांत पडून आहे. फार झाला म्हणजे मालक सांगणार "आतां कारखाना बंद." कांहीं कांहीं ठिकाणीं ही भाषा सुरू झाल्याचें येत आहे कानावर.

आमच्या नशिबाला लागलेली चाकरी कांहीं सुटत नाहीं.

म्हणे दुष्काळ आहे. एका काडीचे जागीं दोन काड्या पिकवा. सरकारनेंच तें करून दाखवावें. नफा-तोटा पत्रकही दाखवावें. सामुदायिक शेती, ट्रॅक्टर्स, विलायती खतें, सहकारी खरेदी-विक्री. आहेत पडीक जमिनी पुष्कळ. निर्वासीतही आहेत.

---

महागाईचें तंग वातावरण बदलावयाचें तर कोणत्या तरी स्वरूपांत नियोजन नि नियंत्रण पाहिजे. निदान अन्न-वस्त्राच्या, तेल-पाण्याच्या व्यवस्था तरी झाल्याच पाहिजेत; सरकारलाही तें आतां पटूं लागलेलें दिसतें.

उद्योग-धंद्यांना लागणारा कच्चा मालही असाच नियंत्रित पद्धतीनें मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे; तरच उत्पादन टिकेल, वाढेल.

चलन व इतर आर्थिक व्यवहारावर, घडामोडीवर सतत लक्ष पाहिजेच. पण मुख्य प्रश्न रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालांत म्हटल्याप्रमाणें, चोख सुसूत्र कारभाराचा नि सुबुद्ध, परिणामकारक अंमलबजावणीचाच आहे. लहान-थोरांच्या जीवनावर काळीकुट्ट छाया पाडणाऱ्या या आर्थिक अरिष्टांत परस्पर विश्वासाचा–श्रद्धेचा बळी पडला आहे. ह्या अरिष्टांतून बाहेर पडावयाचें तर त्या दृष्टीनें प्रयत्न व्हावयास पाहिजेत.

---

## अमेरिकेच्या औदार्याचें रहस्य

### आर्थिक भरभराटीस धोका नको!

दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं, अमेरिकेनें उधार-उसनवार योजनेखाली मित्र राष्ट्रांना ४४ अब्ज डॉलर्सचा माल पुरविला. त्यापैकी २५% रशियाकडे गेला आणि ६६% माल ग्रेट ब्रिटनकडे गेला. हें करीत असतांनाच, जपानशीं टक्कर देण्याचें काम एकट्या अमेरिकेवर पडलें आणि नाझींपासून पश्चिम युरोपचा बचाव करणाऱ्या फौजांपैकी ६८% फौजा अमेरिकेच्याच होत्या. दुसरें महायुद्ध संपल्यापासून अमेरिकेनें इतर राष्ट्रांना सर्व तऱ्हेची मिळून २१ अब्ज डॉलर्सची मदत केली आहे आणि युरोपच्या आर्थिक पुनर्जीवनासाठी तो देश १७ अब्ज डॉलर्स खर्च करण्यास तयार आहे. दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं मित्र राष्ट्रांना माल पुरवून हिंदुस्थान दरिद्री बनला तशी मात्र स्थिती अमेरिकेची झाली नाहीं. तेथें अत्यंत तेजी असून अमेरिकेचा कोणासहि हवा वाटावा अशी त्याची परिस्थिति आहे.

सबंध जगाच्या उद्धारासाठी अमेरिकेचा हा प्रयत्न का चालू आहे? इतरांविषयी अमेरिका इतका उदारपणा का दाखवीत आहे? त्याचें मर्म असें आहे कीं, जगाची घडी बसविण्यास आज जेवढा खर्च अमेरिकेस येईल, त्या मानानें ती घडी बिघडून पुनः युद्धाची पाळी आली तर अमेरिकेचें होणारें नुकसान कितीतरी पट भरेल! ही संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी अमेरिका आज मुक्त हस्तानें मदत करीत आहे. आजची चलती कायम राखण्यासाठी दुसऱ्यासाठी "थोडा" खर्च करणें अमेरिकेस परवडत आहे. जगाच्या काना-कोपऱ्यांत शांतता रहावी व तेथील घडी आपणांस अनुकूल बसावी ह्यासाठी अमेरिकेची धडपड चालू आहे, त्याचें रहस्य 'आर्थिक' आहे. सबंध जगाचें नेतृत्व पत्करून, आपल्या देशापासून हजारों मैल दूर असणाऱ्या प्रदेशांवरहि वर्चस्व कायम ठेवण्यासाठी अमेरिका आपल्या आर्थिक व लष्करी सामर्थ्याच्या जोरावर राजकीय खेळ खेळत आहे, त्याचें इंगीत हें आहे.

---


## दी मॉडर्न इंडस्ट्रीज, लि.

उद्यमनगर—कराड

| अधिकृत भांडवल: | साधारण शेअर |
|---|---|
| रु. ५,००,००० | रुपये २५ चा |
| रु. पांच लाख | असून शेअरविक्री |
| (वाढविणेचे हक्कासह) | चालू आहे. |

जयहिंद —॥— जयहिंद

० बागायतीसाठीं पाण्याचे पंप, इलेक्ट्रिक मोटार्स, स्टील फर्निचर, वगैरे तयार करण्यास लवकरच सुरवात होईल.

०० फौन्ड्रीचे कामास सुरवात झाली असून नांगर, हातपंप व त्यांचे सुटे भाग तयार होऊं लागले आहेत.

००० मशीन शॉपची इमारत पुरी झाली असून, माशिनरी बसविणेचें काम सध्या चालू आहे.

०००० मॅनेजिंग एजंटस् या धंद्यांतील तज्ज्ञ व अनुभविक आहेत.

**मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातील.**

माहितीकरितां लिहा--मॅनेजिंग एजन्टस्: (इंजिनिअर्स ऑर्गनायझर्स लि.) उद्यमनगर, कराड (सातारा)

देशी धंद्यांना उत्तेजन देऊन, हिंदचें स्वातंत्र्य चिरकाल टिकवा.



## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि., पुणें

(स्थापना: १८ जानेवारी १९०६)

कामाची वेळ–सकाळीं ८॥ ते ११॥ सायंकाळीं ५॥ ते ७
शनिवारीं फक्त सकाळीं ८॥ ते ११॥

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,२५,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ९५,६०० |
| गंगाजळी | रु. | ५४,८१६ |

कायम ठेवींवरील व्याजाचा दरः–एक वर्ष १॥ टक्का, २ वर्षे २ टक्के व ३ वर्षे २॥ टक्के.

बँक सभासदांनाच दोन जामीन, घर, सरकारी कर्जरोखे, कायम ठेव, सोनें, पोस्टल पॉलिसी अगर बँकेनें पसंत केलेल्या विमा कंपन्यांच्या पॉलिसी वगैरे तारणावरच कर्ज देतें. सोन्याच्या तारणावर व्याजाचा दर ४॥ टक्केप्रमाणें आहे. तसेंच माफक व्याजाच्या दरानें सभासदांना ओव्हरड्राफ्ट देण्यांत येतात. सरकारी नोकरांचा पगार, पेन्शन, बिलेवसुली इत्यादि बँकिंगचे व्यवहार बँक करते. बँकेनें सुरक्षिततेसाठी सेफ कस्टडी खातेंहि नवीनच सुरू केलें आहे.

नियमासंबंधीं कचेरींत चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह } ना. वा. द्रवीड, कार्याध्यक्ष

# जागतिक मंदीची भीति आतां कमी आहे

## अर्थव्यवस्थेवरील सरकारी नियंत्रण

लेखकः—श्री. भा. म. काळे, एम्. ए.

दुसऱ्या महायुद्धानंतर तेजीचा काळ आलेला आहे व आणखी कांहीं वर्षांनीं पुन्हां जागतिक मंदी येईल अशी सामान्य कल्पना आहे. तेजी व मंदी हे अर्थव्यवस्थेवर होणारे विशिष्ट परिणाम आहेत. तेजीच्या काळांत मालाला विशेष मागणी असून वस्तूंच्या किंमती उच्च पातळीवर असतात व कारखानदारांना किंवा मालाच्या उत्पादकांना चांगला नफा मिळतो. उलट, मंदीच्या काळांत बाजर्वापेक्षां जास्त उत्पादनामुळें मालाच्या किंमती उतरतात व त्याबरोबर कारखानदारांचें नफ्याचेंहि प्रमाण कमी होतें. शिल्लक माल पडून राहातो व मालाची मागणीहि हळू हळू कमी होते. मंदीच्या काळांत बेकारी निर्माण होते. तेजी व मंदी हे अर्थव्यवहारावर होणारे स्वाभाविक परिणाम आहेत, व तेजी—मंदीचें चक्र हें रहाटगाडग्याप्रमाणें सदैव चालू असतें.

### नियंत्रणाचा उद्देश

परंतु, तेजी—मंदीची ही कल्पना विशेषतः वैयक्तिक अनिर्बंध आर्थिक व्यवहाराच्या काळांत जोपासिली गेली, व भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्यें संपत्तीचें उत्पादन व वांटणी यांवर विशेष निर्बंध नसतात अशा काळांत तेजी—मंदीचें हें चक्र जणूं कांहीं निसर्गजन्य आहे असें वाटतें. जुन्या 'क्लासिकल' परंपरेंतील अर्थशास्त्रज्ञांनीं खाजगी मालकी, भांडवलशाही व्यवस्था व अनिर्बंध वैयक्तिक हक्क ह्यांचा पाठपुरावा केल्यामुळें, तेजी—मंदीचे अनुभव हे स्वाभाविक आहेत असें त्या अर्थशास्त्रज्ञांना वाटत होतें. १९ व्या शतकांत अनिर्बंध खाजगी सत्तेऐवजीं 'सरकारचें नियंत्रण' ही कल्पना परिस्थितीच्या दडपणामुळें हळू हळू पुढें आली व तिला राजकारणांतहि मान्यता मिळाली. 'सरकारी नियंत्रणा'च्या नांवाखालीं प्रथम इंग्लंडसारख्या देशांनीं मजुरांच्या हितासाठीं फॅक्टरी कायदे पास केले. जमिनीच्या बाबतींतहि कुळांना संरक्षण देण्यासाठीं कायदे करण्याची आवश्यकता भासूं लागली. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानामुळें जुन्या सांप्रदायाच्या भांडवलशाही अनिर्बंध अर्थव्यवस्थेच्या तत्त्वाला जोराचा धक्का बसला व अर्थशास्त्रज्ञांचें लक्ष विशेषतः वांटणीच्या पद्धतीकडे जास्त प्रमाणांत वळूं लागलें. आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठीं प्राप्तीवरील करासारखे कर श्रीमंतांवर उत्पन्नाच्या प्रमाणांत बसविले जाऊं लागले. अर्थव्यवस्थेमध्यें बहुजनसमाजाच्या हितासाठीं जरूर तेथें सरकारी नियंत्रणाची कल्पना सर्वमान्य होऊं लागली. सरकारी नियंत्रणाचा मुख्य उद्देश अर्थव्यवस्थेमधील दोष सौम्य करणें किंवा शक्य तर दूर करणें, हा होता.

### विशेष प्रयत्नांची आवश्यकता

हल्लींच्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर अतिशय जोराचा ताण पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं पडला. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं अर्थव्यवस्थेंतील दोष दूर करण्यासाठीं सुधारलेल्या देशांच्या सरकारांनीं निरनिराळीं नियंत्रणें सुरू केलीं, परंतु महायुद्ध संपतांच हीं नियंत्रणें लौकरच रद्द करण्यांत आलीं. दुसऱ्या महायुद्धाचें स्वरूप ज्यास्त व्यापक व तीव्र असल्यामुळें नियंत्रणें, वांटपपद्धति, भावनियंत्रण, उत्पादन ताब्यांत घेणें, इ. गोष्टी युद्धाची झळ लागलेल्या सर्व देशांना कमी-जास्त प्रमाणांत सुरू कराव्या लागल्या. महायुद्ध संपलें तरीहि युद्धकालीन भयंकर हानीमुळें उत्पादनाची परिस्थिति मूळ पदावर यावयास वेळ लागणार असल्यामुळें निरनिराळ्या देशांना युद्धकालीन नियंत्रणें कांहीं प्रमाणांत अद्याप चालू ठेवावीं लागलीं आहेत. जेथें नियंत्रणें घाईनें रद्द केलीं गेलीं, तेथें महागाई, काळा बाजार, अपुरा पुरवठा, इ. स्वरूपाचे अनुभव येऊं लागले. दुसऱ्या महायुद्धांत बहुतेक देशांची अर्थव्यवस्था जणू कांहीं कोलमडून खालीं पडल्यामुळें युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनाहि कांहीं देशांनीं आखून त्यांची अंमलबजावणीहि केली. इंग्लंडमधील बीव्हरिज योजना किंवा पश्चिम युरोपसाठीं मार्शल योजना त्याच स्वरूपाच्या आहेत. सारांश, महायुद्धामुळें निर्माण झालेल्या तीव्र परिस्थितीला तोंड देण्यासाठीं भांडवलशाही अनिर्बंध अर्थव्यवस्था मान्य करणाऱ्या देशांनाहि अर्थव्यवस्थेला आटोक्यांत ठेवण्यासाठीं युद्ध-काळांत व नंतरहि विशेष प्रयत्न करावे लागत आहेत. ह्या प्रयत्नांचा उद्देश तेजी-मंदी सारखीं संकटें कीं जीं सामान्य काळींहि अर्थव्यवस्थेवर ओढवतात, त्या संकटांचें स्वरूप शक्य तितकें सौम्य करणें किंवा तीं येऊं देण्याचें टाळणें हाच आहे. चलनवाढ व महागाई यांवर करण्यांत येणारी उपाययोजना ही तेजीनंतर निर्माण होणारी परिस्थिति आटोक्यांत ठेवण्यासाठींच असते. हल्लीं प्रत्येक सुधारलेलें सरकार अर्थव्यवस्थेवर शास्त्रज्ञांच्या सल्ल्यानें शक्य तितकें लक्ष ठेवीत असतें व त्याचा उद्देश अर्थव्यवस्थेंत निर्माण होणाऱ्या एखाद्या बिघाडामुळें सामान्य जनता त्रस्त होऊं देण्याचें टाळणें, हाच असतो.

### अर्थशास्त्राची नवी भूमिका

येथें स्पष्ट केलेली विचारसरणी लक्षांत घेतली व दुसऱ्या महायुद्धांत सर्व तऱ्हेच्या उत्पादनाचें व आर्थिक जीवनाला आवश्यक अशा सोईचें किती नुकसान झालें आहे हें लक्षांत घेतलें म्हणजे १९२९ प्रमाणें मंदीची आपत्ति लौकरच ओढवेल असें मानण्याचें कारण नाहीं, असें वाटतें. शिवाय मंदी न येण्याचें आणखी एक मुख्य कारण म्हणजे हल्लीं प्रत्येक सुधारलेलें सरकार अर्थव्यवस्थेवर ओढवणाऱ्या आपत्तीपासून आपल्या प्रजेची सुटका करण्याविषयीं दक्ष असतें. असें असल्यामुळें, मंदीचीं पूर्वलक्षणें दिसूं लागतांच त्यांवर उपाययोजना करण्यास सुधारलेल्या देशांचीं सरकारें विलंब लावणार नाहींत, हें निश्चित. गेल्या आठदहा वर्षांत अर्थशास्त्रीय विचारांची बरीच प्रगति झाली आहे, व अर्थशास्त्र हें केवळ आतां परिस्थितीचें पृथक्करण किंवा विश्लेषण करणारेंच शास्त्र राहिलें नसून, अर्थव्यवहारामध्यें समतोलपणा व व्यवस्थितपणा निर्माण करणारें व ह्यासाठीं जरूर ती योजना करणारें शास्त्र बनत चाललें आहे. ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतां १९२९ च्या स्वरूपाची जागतिक मंदी येणें शक्य नाहीं असें वाटतें; व जरी ती आली तरी तिच्यावर आगाऊ प्रतिबंधक उपाय केले जातील.

### योजनाबद्ध अर्थव्यवहार

वरील विवेचनाचा अर्थ, मंदी अजिबात येणार नाहीं असा नव्हे; तर मंदीची परिस्थिति निर्माण होऊं लागल्यास तिच्यावर आगाऊ उपाययोजना केल्यामुळें मंदी अगदीं सौम्य असेल. दुसरी गोष्ट म्हणजे जगांतील बहुतेक राष्ट्रें आतां आपलें राहाणीचें मान सुधारण्याच्या उद्योगांत लागलीं आहेत. त्यामुळें संपत्तीच्या उत्पादनांत बरीच वाढ

व्हावी लागेल. तेव्हां मंदी लौकर येण्याची शक्यता कमी. आणखी एक गोष्ट म्हणजे, 'आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना' व 'आंतरराष्ट्रीय चलननिधि' ह्या जागतिक संस्थांच्या धोरणानुसार, व्यापार व उत्पादन यांची वाढ व पैशाची परिस्थिति स्थिर राखणें ह्या गोष्टींवर भर दिला गेल्यामुळें मंदीची परिस्थिति निर्माण होण्याचा संभव कमी. विचाराची आणखी एक बाजू म्हणजे योजनाबद्ध अर्थव्यवहारावर यापुढें प्रत्येक राष्ट्राकडून भर दिला जाईल, व त्यामुळेंहि मंदी येण्याचा संभव कमी. रशियाचें उदाहरण डोळ्यासमोर आहेच. एकट्या हिंदच्या जागतिक पार्श्वभूमीच्या दृष्टीनें विचार केल्यास असें दिसतें कीं, आपल्या रहाणीचा दर्जा सुधारावयाचा असल्यास संपत्तीचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणांत, सध्यां आहे त्याच्या निदान तीन पट तरी, झालें पाहिजे. रहाणीचा दर्जा न सुधारतां मंदी दिसूं लागल्यास तो अर्थव्यवस्थेचा दोष समजला पाहिजे व त्यावर उपाय योजना करतां येईल. अमेरिकेसारख्या देशांची लोकसंख्या वाढतच आहे ही गोष्टहि मंदीची शक्यता कमी करते. पूर्वीच्या जपानसारखा, अगदी अल्प दरानें विक्री माल पुरविणारा देश आज तरी अस्तित्वांत नाहीं. ही गोष्टहि मंदीची परिस्थिति निर्माण होण्याची शक्यता कमी करते. पूर्वी स्वस्त जपानी कापडामुळें कापड धंद्यांतील मंदी ज्यास्तच तीव्रतेनें जाणवत होती. एकच उलट दिशेनें कार्य करणारी गोष्ट कदाचित शक्य आहे, ती ही कीं नवीन शास्त्रीय शोधांमुळें संपत्तीचें उत्पादन मोठ्या प्रमाणांत व कमी खर्चांत करणें शक्य झाल्यास त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होईल. परंतु अशाहि परिस्थितीवर अर्थशास्त्रज्ञ उपाययोजना सुचवूं शकतील. मात्र, मंदीची परिस्थिति शक्य तों निर्माण होऊं नये असें व्हावयास पाहिजे असल्यास जगांतील सर्व राष्ट्रांत आंतरराष्ट्रीय व्यापार, उत्पादन इ० आर्थिक प्रश्नांचे बाबतींत एकवाक्यतेचें धोरण राहिलें पाहिजे.

शास्त्रीय ज्ञानाची प्रगति होतांना मानवी दुःखें कमी करण्यासाठी शास्त्रांचा उपयोग झाला पाहिजे. ह्याच विचारसरणीनुसार अर्थशास्त्राची प्रगति होतांना, अर्थव्यवहारामध्यें दोष उत्पन्न करणाऱ्या परिस्थितीवर उपाययोजना करतां आली पाहिजे. मंदी येण्याची शक्यता कमी, व ती आली तरी तिच्यावर प्रतिबंधक इलाज अर्थशास्त्रज्ञांकडून सुचविले जातील, अशी परिस्थिति आज दिसते.

---

**तागाच्या बदली गहू**—हिंदुस्थानकडून ताग घेऊन त्याच्या बदली ३,८५,००० टन गहू पुरविण्याचे अर्जेंटायनाच्या सरकारनें कबूल केलें आहे. १९४९ च्या मार्च महिन्यापर्यंत कराराप्रमाणें सर्व गहू हिंदुस्थानांत पोंचता केला जाईल असा अंदाज आहे.

**जिनांच्या बहिणीच्या नांवाचें कॉलेज**—लाहोर येथें फातिमा जिना मेडिकल कॉलेज, ह्या नांवाचें एक स्त्रियांचें वैद्यकीय कॉलेज काढण्याची योजना पाकिस्तान सरकारनें मंजूर केली आहे.

**पहिला वर्ग रद्द करणार**—साउथ इंडिआ रेल्वेनें पहिल्या वर्गाचे डबे बऱ्याच विभागांत बंद करण्याचें ठरविलें आहे. त्याऐवजीं बहुतेक सर्व विभागांतून इंटरचा वर्ग ठेवण्यांत येणार आहे.

**पुणें विद्यापीठाचें तुटीचें अंदाजपत्रक**—पुणें विद्यापीठाच्या कामाला ह्या वर्षअखेर प्रारंभ होणार आहे. परंतु पहिल्याच वर्षी विद्यापीठाला तूट येणार आहे, असें समजतें. विद्यापीठाच्या सल्लागार-समितीनें जें तात्पुरतें अंदाजपत्रक केलें आहे, त्याप्रमाणें पहिल्या वर्षी खर्च १४ लाख रु. येणार असून, उत्पन्न ८ लाखांनीं कमी पडणार आहे. विद्यापीठ मुंबई सरकारकडे अधिक मदत मागणार आहे अशी बातमी आहे.


# ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कंपनी लि.

( हिंदुस्थानांत स्थापन झालेली हिंदी कंपनी )

( हेड ऑफिसः—मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई )

**मोटार, फायर, मरीन वगैरे क्षेत्रांत सतत पंचवीस वर्षांपेक्षां जास्त**

**यशस्वी रीतीनें काम करून जनतेच्या विश्वासास पात्र झालेली आतां**

## आयुष्याचा विमा

**स्वीकारूं लागली आहे.**

महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतांत एजंट व ऑर्गनायझर होऊं इच्छिणाऱ्यांनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा अगर समक्ष भेटावें.

मोतीमाणिक मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें

ब्रँच मॅनेजर, ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि. पुणें.

" ही दिवाळी आमचे ग्राहकांस सुखाची जावो "

## महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रांत

# शेतीचीं आऊतें,
# नांगर व सुटे भाग,
# तेलाचे घाणे,
# दळण चक्क्या,
# सर्व तऱ्हेचें ओतकाम.

# फडके इंड. वर्क्स लि.

## कराड ( जि. सातारा )

# कंपनी कायद्याखालील डायरेक्टरांची भूमिका

## अधिकार, जबाबदाऱ्या व मर्यादा.

(लेखक:—श्री. स. वा. दातार, बी. एससी., एलएल्. बी.)

कंपनी आणि डायरेक्टर हे शब्द आतां मराठी व्यावसायिकांच्या तोंडीं नित्य खेळूं लागले आहेत. रोज नव्या नव्या कंपन्या निघत आहेत व नवे नवे लोक डायरेक्टर होऊं लागले आहेत. त्यांच्यासाठी डायरेक्टरांच्या कायदेशीर भूमिकेची सामान्य रूपरेखा चित्रित करून दाखविण्याचा येथें स्थलमर्यादेनुसार प्रयत्न केला आहे.

### भूमिका

नोंदविलेल्या कंपनीला कायद्यानें स्वतंत्र व्यक्तित्व दिलेलें असतें हें खरें, परंतु वस्तुतः ती अशरीरिणीच असते. तेव्हां कंपनीकरितां म्हणून तिचा कारभार जे लोक पहातात त्यांना डायरेक्टर म्हणतात. मराठींत त्यांना संचालक असा शब्द अनेक ठिकाणीं वापरलेला आढळतो. तो कांहीं वाईट नाहीं. परंतु डायरेक्टरांच्या आज्ञेनें व संमतीनें कंपनीचा कारभार चालत असल्याकारणानें त्यांना अनुज्ञापक अशी संज्ञा दिल्यास ती अधिक यथार्थ होईल व डायरेक्टर आणि संचालक या शब्दांच्या अन्य अर्थांपासून कंपनी डायरेक्टर्स वेगळे दाखविता येतील.

डायरेक्टर्स हे कंपनीचे कर्ते भागीदार, प्रतिनिधी व विश्वस्त असतात. परंतु या संज्ञांनीं त्यांच्या भूमिकेचें यथातथ्य वर्णन होतें असें नसून त्यांच्या भूमिकेंतील निरनिराळ्या अंगांचें दिग्दर्शन होतें एवढेंच! व्यवहारांत डायरेक्टरांना जें काम करावें लागतें तें प्रसंगोपात कर्ते भागीदार, प्रतिनिधी व विश्वस्त या तीनहि प्रकारच्या भूमिकांच्या कामासारखें असतें.

### नेमणूक

डायरेक्टरांची नेमणूक सामान्यतः वार्षिक सर्व साधारण सभेंत (जनरल मीटिंगमध्यें) करण्यांत येते. परंतु पहिले डायरेक्टर कंपनी रजिस्टर करतांना नियमपत्रिकेंत (आर्टिकल्स् ऑफ असोसिएशन्मध्यें) नमूद करण्यांत येतात. अशा प्रकारें प्रथम डायरेक्टरांचीं नांवें नियमपत्रिकेंत नमूद केलेलीं नसतील तर कंपनी नोंदवितांना तिच्या उद्देशपत्रिकेवर (मेमोरॅण्डम् ऑफ असोसिएशनवर) सह्या करणाऱ्या प्रवर्तकांना कंपनीचे पहिले डायरेक्टर सभा करून अथवा लेख करून बहुमतानें नेमता येतात. अशा प्रकारें प्रवर्तकांनीं जोंपर्यंत पहिले डायरेक्टर नेमले नसतील तोंपर्यंत उद्देशपत्रिकेवर सह्या करणाऱ्या लोकांनाच डायरेक्टर समजण्यांत येतें. सामान्यतः पहिल्या डायरेक्टरांनीं कंपनीचे विशिष्ट रकमेचे भाग (शेअर्स) घेतलेच पाहिजेत असें बंधन नसतें, इतकेंच नव्हे तर कंपनीचा एकहि भाग न घेतांहि प्रथम डायरेक्टर होण्यास प्रत्यवाय नसतो. प्रथम वार्षिक सभेपर्यंतच पहिले डायरेक्टर्स काम करूं शकतात व नंतर त्या सभेंत सर्व डायरेक्टरांची रीतसर निवड करण्यांत येते. सामान्यतः सर्व कंपन्यांत डायरेक्टर होण्यासाठी विशिष्ट रकमेचे भाग (क्वालिफिकेशन शेअर्स) धारण करावे लागतात अथवा त्या रकमेचे भाग दोन महिन्यांच्या मुदतींत घेण्याचा करार मान्य करावा लागतो. याशिवाय, जो मनुष्य आपलें नांव डायरेक्टर म्हणून जाहीर करण्यांत आलें असतां त्याचा जाहीर रीत्या इनकार करीत नाहीं त्याजवरहि डायरेक्टर पदाच्या जबाबदाऱ्या येऊन पडतात. सबब कंपनीकडून डायरेक्टरांचीं नांवें जाहीर केलीं जाण्यापूर्वी पब्लिक लिमिटेड म्हणजेच प्रगट अथवा जाहीर किंवा सार्वजनिक कंपन्यांना डायरेक्टर होण्यास तयार असलेल्या लोकांची लेखी संमति रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे दाखल करावी लागते. जाहीर कंपन्यांना कमीतकमी तीन तरी डायरेक्टर्स असावेच लागतात. खाजगी (प्रायव्हेट) लिमिटेड कंपन्यांना डायरेक्टर्स असलेच पाहिजेत असें बंधन नाहीं. कंपनीला जास्तींत जास्त किती डायरेक्टर्स असावेत तें नियमपत्रिकेंत नमूद केलेलें असतें अथवा सर्वसाधारण सभेमध्यें ठरविण्यांत येतें. त्या कमाल संख्येचे आंत वेळोवेळीं किती डायरेक्टर्स घ्यावेत तें ठरविण्याचा अधिकार डायरेक्टर बोर्डास म्हणजे संचालक अथवा अनुज्ञापक मंडळास असतो. या डायरेक्टरांपैकी एखाद्याची जागा आकस्मिक कारणांनीं मोकळी पडल्यास उरलेल्या डायरेक्टरांना एखाद्या नवीन भागीदारास डायरेक्टर करून घेतां येते. हाहि डायरेक्टर पदावर नेमणूक होण्याचा एक मार्ग आहे.

### अधिकार

कंपनीच्या कारभाराचीं सर्व सूत्रें डायरेक्टरांच्या हातांत असतात. डायरेक्टरांची संमति एकदम अथवा वेळोवेळीं घेतल्यावांचून कंपनीच्या कारभारांतील एक पानहि कोणी हलवूं शकत नाहीं. कंपनीच्या दैनंदिन कामकाजासाठी अधिकारी नेमण्याचा अधिकार डायरेक्टरांनाच असतो. त्याचप्रमाणें कंपनीतर्फे होणारे सर्व करारमदार हे डायरेक्टरांनींच करावयाचे असतात. सभासदांना कंपनीचे भाग मंजूर करून देणें हें डायरेक्टरांचेंच काम असतें. हीं सर्व कामें डायरेक्टरांना व्यक्तिशः मात्र करतां येत नाहींत. डायरेक्टरांना आपल्या मंडळाची सभा भरवून व रीतसर ठराव करून संयुक्तपणानें हीं कामें करतां येतात. भाग मंजुरीसारख्या नित्याच्या व ठराविक कामासाठी मंडळांतील कांहीं सभासदांची पोट समिती नेमून तिजकडे तीं कामें सोंपविण्याचाहि डायरेक्टरांना अधिकार असतो. अशा या कामाबद्दल डायरेक्टरांना फी घेता येते. परंतु ही फी घेण्याबाबत स्पष्ट अधिकार नियमावलींत नमूद केलेले असावे लागतात. सामान्यतः ही फी डायरेक्टर हजर राहिलेल्या मंडळाच्या प्रत्येक सभेवर ठरवून दिलेल्या दरानें आकारली जाते. एकदम वार्षिक फी ठरविणें सुद्धां कायदेशीर आहे. परंतु डायरेक्टर बोर्डाच्या आणि पोटसमितीच्या सभांवर फी ठरविणें अनेक दृष्टीनें सोयीचें असतें. मंडळाच्या सभेसाठी डायरेक्टरांना प्रवास करून यावें लागलें तर तो प्रवासखर्चहि डायरेक्टरांना मिळूं शकतो. पण त्यासंबंधींहि स्पष्ट नियम नियमपत्रिकेंत दाखल केलेले असावे लागतात. तसे नियम नसतील तर सभेच्या फी मध्येंच प्रवासखर्च व भत्ता अंतर्भूत आहे, असें समजण्यांत येतें. अशाप्रकारें नियमपत्रिकेंत तरतूद नसेल तर डायरेक्टरांना मंडळाच्या सभांबद्दल एक छदामहि घेता येणार नाहीं. याशिवाय डायरेक्टरांना कंपनीचे मॅनेजिंग एजंट, मॅनेजिंग डायरेक्टर, मॅनेजर अथवा कायद्याचे किंवा अन्य तांत्रिक विषयांचे सल्लागार म्हणून काम करतां येते व त्या कामाबद्दल स्वतंत्र पगार अथवा मेहेनताना घेता येतो.

### जबाबदाऱ्या

कंपनीचा कारभार कायद्याच्या मर्यादेंत चालविण्याची अंतिम जबाबदारी शेवटीं डायरेक्टरांवरच असते. या कामीं हाताखालील

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

( स्थापना : सन १९३५ )

### प्रगति दर्शक बोलके आंकडे

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... ... | रु. | ५०,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... ... | रु. | ३२,००,००० |
| वसूल भांडवल ... ... ... | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... ... | रु. | ४,१०,००० |

अेकूण खेळतें भांडवल ... रु. दोन कोटींचें वर.

चालूं खात्यावर द. सा. द. शेंकडा अर्धा टक्का व्याज.

सेव्हिंग्ज खात्यावर द. सा. द. शेंकडा १॥ टक्का व्याज.

तीन वर्षांच्या मुदतीनें मुदती ठेवींचा स्वीकार.

सोलापूर येथें सेफ–डिपॉझिट व्हॉल्टची सोय.

आमच्या भागीदारांना व खातेदारांना ही दिपावली सुखाची जावो.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

[ Paramount Ltd. ]



## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना : १९३५ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | १,०४,४७० |
| रिझर्व्ह फंड | रु. | २५,००१ |
| इतर फंडस् | रु. | २७,४०७ |
| ठेवी | रु. | ११,२५,७६४ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १२,९८,२०० |

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

१ श्री. गणेश कोंडो गोडबोले, B. A., LL. B.
२ श्री. म. ह. गोडबोले, B. A., LL. B.
३ श्री. ल. द. भिडे
४ श्री. अ. वि. इनामदार
५ श्री. वा. वि. वाटवे, B. A., LL. B.
६ श्री. ग. का. दांडेकर
७ श्री. गो. ग. मराठे, B.A.
८ श्री. ज. वि. करमरकर, सराफ
९ श्री. ग. गो. बिनीवाले

बँकिंगचीं सर्व कामें केलीं जातात.

ल. य. लागू, B. A., LL. B.
मॅनेजर.



## दि युनायटेड कमार्शिअल बँक लिमिटेड, कलकत्ता

चेअरमनः—श्री. जी. डी. बिर्ला

जनरल मॅनेजरः—श्री. बी. टी. ठाकूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ८ कोटी रु. |
| विक्रीस काढलेलें भांडवल : | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल : | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड : | ४० लक्ष रु. |
| खेळतें भांडवल : | ४७ कोटी रु. |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

व्ही. व्ही. गुप्ते
मॅनेजर, पुणें शहर शाखा

पुणें कँटोन्मेंट शाखा : महात्मा गांधी रोड



## दि ऑल इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

कोट, मुंबई.

★ ★ ★

चेअरमन
रामदेव आनंदीलाल पोद्दार.

जनरल मॅनेजर
एस. बी. कार्डमास्तर.

पहिल्याच वर्षीं लाईफचें, एक कोट चार लक्षांच्या पॉलिसीज देऊन जगांतील रेकॉर्ड मोडलें.

आयुष्य खात्याकरितां ऑर्गनायझर–पगारी–तावडतोब नेमणें आहेत.

★

आजच लिहा अगर भेटा—

बी. व्ही. भट, ब्रॅन्च मॅनेजर,
पोस्ट बॉक्स नं. १७० पुणें नं. २.

अधिकाऱ्यांवर विसंबून राहण्याचा त्यांना हक्क असतो हें खरें; पण त्यालाहि मर्यादा असतात. त्या मर्यादांपलीकडे डायरेक्टरांनीं स्वतःची जबाबदारी स्वतःच ओळखावी लागते.

नेमणूक झाल्यानंतर दोन महिन्यांच्या आंत डायरेक्टरांना अधिकारपात्रतेचे भाग (क्वालिफिकेशन् शेअर्स) खरेदी करावे लागतात. हे दोन महिने संपावयाच्या आंत त्यांनीं राजिनामा दिला तर हरकत नसते, परंतु जर दोन महिने भरल्यावर ते डायरेक्टर राहिले व आवश्यक ते भाग भांडवल त्यांनीं घेतलें नाहीं तर त्यांना शासन तर होतेंच आणि शिवाय तेवढे भाग घेण्याची जबाबदारीहि त्यांच्यावर पडते. नंतर राजिनामा देऊनहि ती त्यांना टाळता येत नाहीं. पात्रतेचे भाग डायरेक्टरांनीं आपल्या स्वतःच्या व अन्य कोणाच्या संयुक्त नांवावर घेण्यास कायद्याचा प्रत्यवाय नसतो परंतु कांहीं कंपन्या हे भाग फक्त एकट्याच्याच नांवावर घेतले पाहिजेत असा दंडक घालतात. वास्तविक तो अनावश्यक असतो. परंतु तसा दंडक नियमपत्रिकेंत असेल तर अधिकारपात्रतेचे भाग डायरेक्टरांना आपल्या एकट्याच्याच नांवावर घेणें भाग असते.

कंपनीकडून कोणताहि करारमदार करून घेण्यास डायरेक्टरांना नियमपात्रिकेंत मोकळीक ठेवलेली असावी लागते. अशी मोकळीक ठेवलेली नसेल तर व्यक्तिशः डायरेक्टरांना, अथवा ते ज्या पेढीचे भागीदार असतील त्या पेढीला, अथवा ते ज्या खाजगी कंपनीचे डायरेक्टर असतील त्या कंपनीला वरील मुख्य कंपनीशीं कोणतेहि करारमदार करतां येत नाहींत; आणि करार करण्याची जरूर ती मोकळीक नियमपत्रिकेंत दिलेली असली तरी नियोजित करारमदारापासून डायरेक्टरास व्यक्तिशः अथवा त्यांच्या पेढीस अथवा त्यांच्या खाजगी कंपनीस जो हितलाभ व्हावयाचा असेल तो प्रगट करून सांगण्याची व त्या करारमदाराच्या व्यवहाराबाबत डायरेक्टर बोर्डांत चर्चा चालू असतां अथवा त्याच्या संमतीसाठीं मतदान घेणें चालू असतां हितसंबंधी डायरेक्टरांनीं मतें न देतां तटस्थ राहण्याची महत्त्वाची जबाबदारी डायरेक्टरांवर असते.

त्यानंतर अनुज्ञापक मंडळाच्या सभांचे व सर्वसाधारण सभांचे अहवाल यथायोग्यपणें ठेवणें, कंपनीच्या हिशेबाचीं पुस्तकें पद्धतशीरपणें व चोख ठेवणें, रजिस्ट्रार ऑफ कंपनीजकडे कायद्याप्रमाणें वेळोवेळीं पाठवण्याचीं पत्रकें नियमितपणें पाठविणें, कंपनीच्या धंद्याव्यवहाराचे वार्षिक हिशेब पुरे करून नफातोटापत्रक व ताळेबंद तयार करणें, वार्षिक सभा बोलाविणें, वगैरे कामें करण्याची व्यवस्था उत्तम लावणें हीही डायरेक्टरांचीच जबाबदारी असते. डायरेक्टरांनीं कंपनीचे मॅनेजिंग एजंट अथवा मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर अथवा सेक्रेटरी यांची नेमणूक करतांना या सर्व कामकाजाची जबाबदारी व व्यवस्था त्याच्याकडे दिलेली असते. तशी देण्याचा डायरेक्टरांना पूर्ण अधिकार असला तरी या कामीं वरील अधिकाऱ्यांकडून हयगय झाल्यास डायरेक्टरांना रजिस्ट्रारकडून खुलासा विचारण्यांत येतो व त्यानंतर डायरेक्टरांनीं जरूर ती व्यवस्था केली नाहीं तर त्यांना शासन होण्याची पाळी येऊं शकते. वार्षिक नफातोटा पत्रक व ताळेबंद आपल्या अहवालासह कंपनीच्या सर्व सभासद भागीदारांकडे वार्षिक सर्वसाधारणसभेचे आधीं चवदा दिवस तरी पाठविणें व डिव्हिडंड देण्याची शिफारस करणें या जबाबदाऱ्याहि डायरेक्टरांच्याच असतात. कंपनीचे हिशेब तपासून पाहण्यासाठीं ऑडिटरची नेमणूक करणें, हा अधिकार मात्र भागदारांचाच असतो.

चालू कंपन्यांच्या कारभाराबाबतच्याच तेवढ्या प्रमुख जबाबदाऱ्यांचा उल्लेख वर केला आहे. कंपनीचा कारभार आवरण्याचे (लिक्विडेशन) संबंधीतील जबाबदाऱ्यांचा विचार येथें केलेला नाहीं.

## मर्यादा

कंपनी कायद्यानें डायरेक्टरांवर घातलेली पहिली मोठी मर्यादा म्हणजे कंपनीच्या कारभारांत कोणत्याहि प्रकारची अर्थप्राप्ति करून घेतां येईल अशी जागा न स्वीकारणें आणि कोणत्याहि परिस्थितींत कंपनीकडून कर्जाऊ रक्कम न घेणें ही होय. याबाबतींत कंपनीला कोणाहि डायरेक्टरास जामीनहि राहता येत नाहीं.

कंपनीनें स्वीकारलेली कोणतीहि कार्ययोजना रद्द करण्याचा अथवा विकून टाकण्याचाहि अधिकार डायरेक्टरांना केव्हांहि नसतो. त्याचप्रमाणें एकाद्या डायरेक्टराकडून येणें असलेल्या रकमेची त्यास सूट देणें ही गोष्टहि डायरेक्टरांच्या अधिकारांत बसत नाहीं.

डायरेक्टर बोर्डाच्या लागोपाठ तीन सभांना अथवा सतत तीन महिन्यांतील डायरेक्टरांच्या सभांना, या दोहोंपैकी जो अवधी मोठा असेल त्या अवधीनंतर कोणाहि डायरेक्टरास आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय अनुपस्थित रहाता येत नाहीं.

डायरेक्टरांना आपले अधिकार कोणालाहि बहाल (असाइन) करता येत नाहींत. जरी तशा स्वरूपाची मुभा नियमपत्रिकेंत अथवा अन्य करारान्वयें कोणाला दिलेली असली तरी तशाप्रकारें अधिकार बहाल करावयास स्पेशल ठराव करून अनुमती घ्यावी लागते. विशिष्ट परिस्थितींत फक्त तीन महिन्यापुरते आपल्या ऐवजीं अन्य कोणास डायरेक्टरांना नेमता येते परंतु त्यालाहि मंडळाची संमति असावी लागते.

जाहीर कंपन्यांचे अनुज्ञापक मंडळांत कोणाहि डायरेक्टरांना कायमचें ठाण पुनःपुनः निवडणूक न झाल्यास केव्हांहि मांडता येत नाहीं. ठराविक मंडळींची अमर्याद मिरासदारी होऊं नये म्हणून जाहीर कंपन्यांच्या अनुज्ञापक मंडळांतील एकतृतीयांश डायरेक्टरांना प्रतिवर्षीं आपलें स्थान मुकाट्यानें सोडावेंच लागते. परंतु त्याच वर्षीं पुनः निवडून यावयास मात्र ते पात्र असतात. अशा प्रकारची फिरती (रोटेशन) ची मर्यादा खाजगी कंपन्यांच्या डायरेक्टरांवर बंधनकारक नसते.

प्रचलित कंपनी कायद्यावरून डायरेक्टरांवर ज्या जबाबदाऱ्या व बंधनें आलेलीं असतात त्यांचे पासून मुक्तता मिळविण्याचा कोणताहि करार डायरेक्टरांना कंपनीशीं करता येत नाहीं व तसा त्यांनीं केला तरी तो कायदेशीर ठरत नाहीं; परंतु कायदेशीर मर्यादेमध्यें व प्रामाणिक हेतूनें कंपनीचा कारभार पहात असता डायरेक्टरांवर जो बोजा प्रसंगविशेषीं येईल तो निवारण्याची हमी मात्र कंपनीला केव्हांहि घेता येते व कायद्यानें ती कंपनीला घ्यावीच लागते. डायरेक्टरांची नेमणूक होतांना अशाप्रसंगीं कांहीं दोष राहून गेला असला तरीसुद्धां जोंपर्यंत डायरेक्टरांचें कार्य कायद्याच्या मर्यादेंत असेल तोंपर्यंत त्याबद्दलची सर्व जबाबदारी कंपनीकडेच जाते.

कोर्टानें नादार अथवा वेडे ठरविलेल्या लोकांना, अल्पवयीन अज्ञानांना व ज्यांना सहा महिन्यांपेक्षा अधिक शिक्षा झाली आहे अशा लोकांना कंपनीचे डायरेक्टर होता येत नाहीं.

## कर्ते भागीदार, प्रतिनिधी व विश्वस्त

अशाप्रकारें डायरेक्टरांचे अधिकार, जबाबदाऱ्या, व मर्यादा यांचें स्वरूप अवलोकन केल्यावर डायरेक्टरांच्या भूमिकेसंबंधीं अधिक

ही दिवाळी व नूतन व्यापारी वर्ष आपणांस सुखाचें व समृद्धीचें जावो.

आपणांवर अवलंबून असणाऱ्यांचे आर्थिक स्वास्थ्याची तरतूद करणें हें प्रत्येक सूज्ञ नागरिकाचें कर्तव्य असून तें बजाविणें हींच आपले भावी सुखाची व मानसिक स्वास्थ्याची पूर्व तयारी होय.

## दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें

**या कंपनीची पॉलिसी घेऊन काळजींतून मुक्त व्हा.**

कंपनीच्या सोलापूर वसाहतीचे बांधकामास लवकरच सुरुवात होणार असून काम लवकर संपविण्यासाठी **मुदतीच्या ठेवी घेणें आहे.**

मुदत व व्याजाचे दर याची माहिती कंपनीचे मुख्य कचेरीकडे मिळूं शकेल.

हैद्राबाद संस्थानांत मोठ्या शहरीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

लिहा अगर भेटा:

**टी. डी. देशपांडे,** बी. ए., एलएल. बी. सेक्रेटरी.

**व्ही. एन्. म्हैसूर,** एम. ए., एलएल. बी. मॅनेजर.

हेड ऑफिस
८६६ सदाशिव पेठ, पुणें २.



करवीर इलाख्यांतील आद्य सहकारी संस्था.

## दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर

**स्थापना १९१३ इसवी**

| | |
|---|---|
| एकूण खेळतें भांडवल | रु. ५ लाखावर |
| अधिकृत भांडवल | रु. २ लाख |
| रिझर्व फंड व इतर फंडस् | रु. १,३४,४६७ |

प्रेसिडेंटः—मे. शंकरराव बळवंतराव प्रभावळे
व्हा. प्रेसिडेंटः—मे. आण्णासाहेब आप्पा शिराळे

**डायरेक्टर्स.**

मे. आनंदराव शंकरराव जगताप. मे. जयपाल नेमाण्णा आळतेकर.
मे. विठ्ठलराव बळवंतराव पोवार. मे. आण्णाप्पा बाबूराव पाडळकर.
मे. ज्ञानोबा जोती सासने. मे. बाबूराव केरबा जाधव.
मे. गणेश विठ्ठल आपटे

**सुपरव्हायझिंग कौन्सिलर्स**

**चेअरमन** मे. के. एल. मोरे. **कौन्सिलर्स** मे. आर. आय्. गायकवाड
मे. ए. एम्. मौलवी. मे. डी आर. रावाडे.
मे. एस्. जे. देशपांडे.

मुंबई, पुणें बँकांवरील चेक दिले जातात. बाहेर गांवचे चेक्स, हुंड्या, रेल्वे रिसिट्स् वसूल करून दिल्या जातात.

चालू-सेव्हिंग खातेवर ठेवी स्वीकारिल्या जातात.

आकर्षक दरानें मुदतबंद ठेवी स्वीकारिल्या जातात.

ठेवींच्या व्याजाचे दरासंबंधीं विशेष माहितीसाठीं लिहा अगर प्रत्यक्ष भेटा.

जी. व्ही. शेवडे, अकौंटंट. **के. जी. राणे** मॅनेजर दि कोल्हापूर अर्बन को-ऑ. बँक लि.

**शंकरराव बळवंतराव प्रभावळे** प्रेसिडेंट



## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि., पुणें.

( शिड्यूल्ड बँक )

**हेड ऑफिसः—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें २.**

—मुंबई शाखा—

**इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १**

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१४,०६५ |
| खेळतें भांडवल | रु. ७०,००,००० |

**श्री. ग. रा. साठे,** अध्यक्ष. **श्री. दा. ग. बापट,** उपाध्यक्ष.

—बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.—

**गो. धों. जोगळेकर** बी. ए. (ऑ.), बी. कॉम्., एलएल्. बी., मॅनेजर

**चिं. त्रिं. चितळे** मॅ. डायरेक्टर



नगर जिल्ह्याची सर्वांत जुनी सहकारी बँक, म्हणजेच

## दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

**स्थापना सन १९१०**

**हेड ऑफिसः—अहमदनगर शहर**

शाखा—१ संगमनेर (जि. नगर) २ भिंगार (ता. नगर)
३ बेलापूर रोड—श्रीरामपूर (जि. नगर)
४ कोपरगांव (जि. नगर)

**भांडवल**

| | | |
|---|---|---|
| (१) | अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| (२) | भरलेलें भांडवल ... | रु. ३,१५,४१० |
| (३) | रिझर्व्ह फंड ... | रु. २,२२,६९८ |
| (४) | इतर फंड ... | रु. १,६३,१५२ |
| (५) | चालू ठेवी ... | रु. ४४,०६,६९२ |
| (६) | मुदत ठेवी ... | रु. ११,०५,७७१ |
| (७) | सेव्हिंग्ज ठेवी ... | रु. ८,४९,५४७ |
| (८) | खेळतें भांडवल ... | रु. ७०,८९,०२४ |


या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंडी, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरेचा सर्व व्यवहार केला जातो.

दागदागिने, मौल्यवान वस्तू व कागदपत्र सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची योजना आहे, तरी गरजूंनीं फायदा घ्यावा. जास्त माहितीकरतां हेड ऑफिस अगर शाखा कचेऱ्यांकडे लिहा.

' कापड वाटपासंबंधीं जिल्ह्याची होलसेल एजन्सी या बँकेकडे देण्यांत आलेली आहे.

तारीख १३ ऑक्टोबर, ४८ **मो. कुं. फिरोदिया,** चेअरमन

स्पष्टीकरण लक्षांत घ्यावयास सोपें जाईल. डायरेक्टर हे कंपनीचे कर्ते भागीदार असतात. म्हणजे, कर्त्या भागीदाराप्रमाणें पुढाकार घेऊन ते कंपनीचा कारभार पाहतात. परंतु भागीदारांप्रमाणें ते स्वतःच्या कृत्यांनीं कंपनीस बांधील करूं शकत नाहींत. कंपनीतर्फे कोणाहि डायरेक्टरास व्यक्तिशः कोणताहि कारभार पाहता येत नाहीं. डायरेक्टर बोर्डाच्या ठरावानें अधिकार दिल्यावर त्या ठरावाच्या मर्यादेंतच डायरेक्टरांना कारभार पाहता येतो. या मर्यादेपलीकडील जबाबदारी कंपनी घेऊं शकत नाहीं. अशा प्रकारें डायरेक्टरांची भूमिका भागीदारांपेक्षां निराळी असते. डायरेक्टर हे कंपनीचे प्रतिनिधी (एजंट) असतात ही गोष्टहि खरी; परंतु या प्रतिनिधित्वालाहि मर्यादा असतात. वैयक्तिक जबाबदारीवर वागून त्यांनाहि कंपनीस बांधील करता येत नाहीं. कांहीं विशिष्ट मर्यादेपलीकडे प्रतिनिधित्वाचें कमिशन ते घेऊं शकत नाहींत आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते प्रतिनिधी असतात त्याचवेळीं ते स्वतःच आपले प्रमुख अथवा मालकहि असतात. कारण कंपनीच्या भाग भांडवलांतील कित्येक भागांची मालकी त्यांनीं संपादिलेली असते. अशाप्रकारें प्रमुख व प्रतिनिधी (प्रिन्सिपल ॲन्ड एजंट) या दोन्ही भूमिका डायरेक्टरांमध्यें एकाचवेळीं समाविष्ट होत असल्याकारणानें त्यांना कंपनीचे केवळ प्रतिनिधी म्हणता येत नाहीं. त्यानंतर विश्वस्ताच्या भूमिकेचा विचार करावयाचा. डायरेक्टरांवरील कंपनीबाबतच्या जबाबदाऱ्यांचें स्वरूप बहुतांशीं विश्वस्तांवरील जबाबदाऱ्यांसारखें असतें, ही गोष्ट निःसंशय खरी. मात्र या ठिकाणीं एक बारकावा जरूर लक्षांत ठेवण्यासारखा आहे. डायरेक्टर हे विश्वस्त असतात हें खरें, पण ते कोणाचे? तर सर्वसाधारण भागदार सभासदवर्गाचे; त्यापैकीं कोणाहि एका भागदाराचे व्यक्तिशः कांहीं ते विश्वस्त असत नाहींत. म्हणून स्वतःला फायदेशिर होईल अशा रीतीनें कोणाहि भागदाराशीं कंपनीच्या भागांच्या खरेदीविक्रीचा व्यवहार करण्यास त्यांना पूर्ण मुभा असते. अशाप्रसंगीं आपल्या मनांतील वा माहितींतलि कंपनीच्या भूत—वर्तमान वा भविष्यकालांतील प्रगति—परागतीच्या कल्पना त्यांनीं त्या भागीदारास उघड करून सांगाव्या असें कोणतेंच बंधन डायरेक्टरांवर नसतें. कंपनीची मालमत्ता ही कंपनी स्वतः धारण करते, डायरेक्टरांना कंपनीच्या भांडवलाचा वापर करून नफा उत्पन्न करावयाचा असतो. त्यासाठी त्यांना धोकाहि पत्करावा लागतो. त्यामुळें अंदाजांतील प्रामाणिक प्रमाद त्यांना क्षम्य असतात. अशी कांहीं विश्वस्तांची भूमिका नसते. विश्वस्तनिधि त्यांनीं धारण केलेला असतो व संरक्षण हाच त्यांचा एकमेव ध्येयबिंदु असतो. कंपनीची मालमत्ता सुरक्षित ठेवण्यासाठीच केवळ ती डायरेक्टरांच्या हवाली केलेली नसते. म्हणून, कारभारांतील ढिलाईबाबत विश्वस्तांइतक्या कांटेकोर कडकपणानें डायरेक्टरांना जबाबदार धरलें जात नाहीं. कंपनीकडून वैयक्तिक अर्थलाभ बेकायदेशीर रीत्या न मिळविणें, एवढीच विश्वस्तभूमिकेच्या स्वरूपाची जबाबदारी डायरेक्टरांवर असते. त्यानंतर डायरेक्टर हे विश्वस्त असतात त्याचवेळीं विश्वस्त निधीचे हितग्राहक (बेनिफिशरी) हि असतात. कंपनीच्या धंद्यापासून इतर भागदारांबरोबर त्यांनाहि हितलाभ व अर्थप्राप्ति व्हावयाची असते. अशा प्रकारें विश्वस्त असूनहि डायरेक्टरांची भूमिका विश्वस्तांपेक्षां निराळी असते. सारांश, डायरेक्टरांच्या मार्फतीनें व अनुज्ञेनें आणि देखरेखीखालीं कंपनीचा कारभार चालत असतो. ते कंपनीचे कर्ते भागीदार, प्रतिनिधी व विश्वस्त असतात. परंतु या संज्ञा डायरेक्टरांच्या भूमिकेची केवळ महत्त्वाचीं उपांगें दर्शवितात. तिचें सर्वांशांनीं बरोबर वर्णन करूं शकत नाहींत. त्या सर्वांना धरून पण त्या सर्वांपलीकडील अशी महत्त्वाची व स्वयंमन्य अशी डायरेक्टरांची भूमिका असते.




**गजोपाध्ये फार्मसी**

तुळशीबाग रस्ता, २३८ बुधवार पेठ, पुणें २.

सर्व तऱ्हेच्या खात्रीच्या वनस्पती मिळण्याचें ठिकाण.

**संतोष-दुग्धालय, पुणें**

**कुटुंबांतील संतोष**

**पॅश्चराईज १०० टक्के कोरें दूध**

**वापरल्यानेंच होईल.**

**स्थानिक व घरपोंच.**

**पाडव्याचे सुमुहूर्तावर सुरू करा.**

चौकशी—म. गो. कुलकर्णी,

फडतरे चौक, सदाशिव पेठ,

पुणें नं. २.

## शेअर बाजाराचें सीमोल्लंघन

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.

गेल्या दोन वर्षांत मुंबई शेअर बाजार पडून होता, त्याला राजकीय, आर्थिक व सामाजिक अशीं अनेक कारणें होतीं. गेल्या सप्टेंबरपासून मात्र परिस्थिति निवळत चाललेली दिसते. हिंदुस्थान सरकारच्या पोलिसी योजनेमुळें हैद्राबादचा प्रश्न समाधानकारक सुटला आहे. काश्मीरचाहि निकाल लवकरच आपल्या इच्छेप्रमाणें लागेल; तेथेंहि हैद्राबादप्रमाणेंच आपलें सरकार निश्चयपूर्वक योजना करीत आहे. लोकांना आपले उद्योग पूर्ववत् चालवितां येतील अशी शांतता देशांत नांदेल, असा विश्वास निर्माण झाला आहे. हैद्राबाद-वरील उपाययोजनेचे वेळीं सर्व जमातींनीं जी आदर्श वागणूक ठेवली, ती उद्बोधक आहे. आपल्या गव्हर्नर जनरलांनीं सबंद देशाचें त्याबद्दल अभिनंदन केलें, तें योग्यच होतें.

चलनवाढ, मालाचा तुटवडा, काळा बाजार, मजुरांचा असंतोष, कर, इत्यादींत सरकारच्या अनिश्चित आर्थिक धोरणाची भर पडून, शेअर बाजार इतका काळ स्थिरच होता. गुंतविणारावर किंमतींत रुपयांत आठ आणे घसारा अगोदरच सोसण्याची पाळी आली होती आणि त्याचेजवळ आतां रकमा असल्या तरी आकर्षक दरांत मिळणाऱ्या पहिल्या दर्जाच्या शेअर्सकडे तो पहाण्या-सहि सहाजीकच तयार नव्हता. हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक धोरणाच्या ताज्या घोषणेनें ह्या सर्व शंका व भीति दूर होण्यास मदत होईल. सरकारच्या ह्या महत्त्वाच्या घोषणेचा खरा अर्थ अद्याप सामान्य लोकांना नीटसा समजलेला दिसत नाहीं. डिव्हिडंडवर मर्यादा आली असली, तरी त्यामुळें नफा वाटणीवर विशेष आघात होण्याची भीति नाहीं. सुप्रसिद्ध मोठ्या कंपन्यांना पूर्वीप्रमाणेंच नफा जाहीर करण्यास पूर्ण मोकळीक आहे. बिर्ला, ए. डी. श्रॉफ, के. आर. पी. श्रॉफ, इत्यादींनीं सरकारी घोषणेचें स्वागतच केलेलें आहे, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. गुंतविणारास यामुळें धीर येईल आणि लवकरच त्यास अनुकूल संधि दिसूं लागेल. बँका, पब्लिक युटिलिटी व ठराविक व्याजाचे शेअर्स मजबुती दाखवीत आहेत, ही गोष्ट बाजार चढीकडे वळणार ह्याचें निदर्शक आहे. बाजार चढला तरी त्यांत मध्यें थोडा चढ–उतार होणार नाहीं असा त्याचा अर्थ नाहीं. परंतु, त्याची एकंदर प्रवृत्ति चढीकडे रहावी, अशींच लक्षणें आहेत.

### गुंतविण्यास लायक असे कांहीं शेअर्स

( कंसांतील आकडा व्यवहारास आवश्यक असलेला गट दर्शवितो. )

| शेअर | वसूल | बाजारभाव, सुमारें | सुटणारें व्याज, ( अ=अपेक्षित. ) |
|---|---|---|---|
| **टेक्स्टाइल्स** | | | |
| (१) कोहिनूर | १०० | २९८ | ४½ अ. |
| (५) न्यू ग्रेट | १०० | १७० | ५½ |
| (५) पोद्दार | १०० | १७० | ५¼ |
| (५) गोकाक | १०० | २९५ | ५½ |
| (५०) मदुरा | १५ | ४२ | ६½ |
| (५) बकिंगहॅम | १०० | १७५ | ४½ |
| (५) वसंत | १०० | ९९ | ५ |
| (१) विष्णू | १०० | २८० | ४½ |
| **वीज** | | | |
| (५) पुणें | १०० | १५८ | ६ |
| (५) टाटा हैड्रो | १०० | १६६ | ४ |
| **स्टील** | | | |
| (५) टाटा स्टील ऑर्डि. | ७५ | २९० | ५½ |
| (१) टाटा स्टील डिफर्ड | ३० | १५०० | ५½ अ. |
| **चहा** | | | |
| (१००) निलगिरी | १० | १० | १० |
| (१००) निलगिरी नीरगुंडी | २ | ५–८ | १० |
| (१००) नेलिअमपथी | २ | १–८ | १० |
| (५०) किंवा (१००) पेरिआकरमलाई | ७½ | २४–८ | ९ |
| **इतर** | | | |
| (५) एअर इंडिया टाटा | १०० | १४० | ४¼ |
| (१००) इंडिया स्टीमशिप | १० | ११ | |
| (२००) अग्रपाराज्यूट | १० | २५ | ७ |
| | | | पहिलें अपेक्षित डिव्हिडंड |
| (५) युनायटेड क. बँक. | ५० | ६५ | २½, ४½ अ. |


**युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

( वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची सब्सिडिअरी कंपनी )

हेड ऑफिस—सातारा शहर

(स्थापना १९३६)

शाखा—मुंबई ( सेंट्रल ऑफिस ) फोर्ट

" — " ( गिरगांव " )

" —पुणें-लक्ष्मी रोड

" —बार्शी

" —नासिक, मेन रोड

—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

विशेष माहितीसाठीं शाखाधिकाऱ्यांना अगर हेड ऑफिस कडे लिहा अगर भेटा.

वा.ग. चिरमुले, चेअरमन ••• सी. ह. जोशी, बी.ए., बी.कॉम., सेक्रेटरी

**सातारा स्वदेशी कमर्शिअल कंपनी लिमिटेड, सातारा**

हेड ऑफिसः—सातारा शहर

स्थापना सन १९०७

शाखाः—कराड, कराड रेल्वे स्टेशन, मसूर

—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

विशेष माहितीसाठीं शाखाधिकाऱ्यांना अगर हेड ऑफिस येथें लिहा अगर भेटा

वा. ग. चिरमुले, चेअरमन | द. के. जोगळेकर, मॅनेजर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

# सहकारी संस्था आणि कापड वांटप

## भांडवलाची व्यवस्था कशी करणार ?

लेखकः—श्री. य. कृ. खोले.

केंद्रीय सरकारनें जीवनोपयोगी वस्तूंवरील नियंत्रण धोरणाचा फेरविचार करून चलनवृध्दीस आळा घालून जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमती योग्य पातळीवर आणण्यासाठी किंमतीवर पुनः नियंत्रण घालण्याचें व वांटप पद्धतीचा अवलंब करण्याचें नवें धोरण जाहीर केलें आहे. हें धोरण यशस्वी होण्याचे दृष्टीनें वांटप पद्धतीचें काम जास्तींत जास्त प्रमाणांत सहकारी संस्थांमार्फत व्हावें, असें ठरविण्यांत आलें आहे.

जीवनोपयोगी वस्तूंमध्यें अन्नधान्याबरोबर कापडाचाहि समावेश झाला असून त्याच्या वांटपाचें कामहि सहकारी संस्थामार्फत मोठ्या प्रमाणावर व्हावयाचें आहे. घाऊक व किरकोळ वांटपाचें पुष्कळसें काम यापुढें आतां सहकारी संस्थांनाच करावें लागणार असून या व्यवसायांतील व्यापाऱ्यांचें महत्त्व कमी होणार आहे.

### पैशाची व्यवस्था

सहकारी संस्थांना ह्या नव्या कामासाठी बरेंच मोठें भांडवल उभें करावें लागणार, असें दिसत आहे. धान्यवांटपाचे कामीं लागणारा पैसा हा त्या मानानें कमी लागत असे, कारण लोकांना धान्य आठ दिवसांपुरतें अगर पंधरा दिवसांपुरतें खरेदी करावें लागे व धान्यखरेदी सरकारी पैशानें असल्यानें सरकारनें कांहीं ठिकाणीं सहकारी संस्थांना पैसे भरण्याची एक महिन्याची सवलत दिली होती. तशी सवलत कापडवांटप व्यवहारांत मिळण्याची शक्यता नाहीं. कापडवांटप पद्धतींत, वर उल्लेख केल्याप्रमाणें, कांहीं संस्थांनीं सर्व जिल्ह्यासाठीं घाऊक विक्रेते व कांहीं संस्थांनीं किरकोळ विक्रेते म्हणून काम पहावयाचें आहे. घाऊक व किरकोळ विक्रेत्यांना निदान एक महिन्याचा साठा विकत घ्यावा लागेल व त्यासाठी लागणाऱ्या पैशाची आगाऊ व्यवस्था करावी लागेल.

घाऊक व्यवहार करणाऱ्या संस्थांना लागणारी रक्कम व्यक्तिगत जिल्ह्यासाठी सुमारें ३०-४० लाखांपर्यंत जाईल, असें वाटतें. ज्या ठिकाणीं हा व्यवहार खरेदी-विक्री संघाकडे असेल, त्यांना आपल्या भांडवलांतून तो करणें अगदींच अशक्य असल्यानें त्यांना पैसा पुरविणाऱ्या संस्थांकडेच धाव घ्यावी लागणार आहे. किरकोळ व्यवहार करणाऱ्या पतपेढ्यांना अगर ग्राहक संस्थांनासुद्धा बाहेरील भांडवलाची जरूरी पडणार असल्यानें, त्याही पैसा पुरविणाऱ्या वरील संस्थांकडे भांडवलाची मागणी करतील असें वाटतें.

मध्यवर्ती पैसा पुरविणाऱ्या संस्थांची हा पैसा पुरविण्याच्या दृष्टीनें आर्थिक परिस्थिति खंबीर आहे ह्यांत संशय नाहीं. कारण, प्रांतिक व जिल्हा सहकारी संस्थांच्या खेळत्या भांडवलापैकीं मोठी रक्कम सरकारी कर्जरोख्यांत असून ते कर्जरोखे विकून अगर त्यांचे तारणावर त्यांना रोकड रक्कम उभी करणें शक्य आहे. परंतु सहकारी संस्थांमार्फत होणारें नियमित वांटपाचें काम हें तूर्ततरी तात्पुरतें असेंच आहे; मामुली परिस्थिति पुनः आल्यावर हें काम केवढ्या प्रमाणावर सहकारी संस्थांमार्फत चालू होईल, हा प्रश्न महत्त्वाचा असल्यानें त्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचाही प्रश्न विचाराचाच आहे. भांडवल लागणाऱ्या सहकारी संस्थेनें मध्यवर्ती जिल्हासंस्थेकडे भांडवलाची मागणी करावी; मध्यवर्ती बँकेनें प्रांतिक बँकेकडे व प्रांतिक बँकेनें रिझर्व्ह बँकेकडे मागणी करावी, अशी व्यवस्था असण्याची सर्वसाधारण अपेक्षा आहे, आणि रक्कम शिल्लक असलेल्या रोकडीमधून द्यावी, अशी सर्वसाधारण कल्पना आहे. परंतु, असें जर शक्य झालें नाहीं, तर आपल्या जवळील कर्जरोखे योग्य किंमतींत् मोडून पैसा उभा करणें योग्य ठरेल किंवा कसें हा सहकारी संस्थांच्या दृष्टीनें महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण, नियंत्रित वांटप पद्धतीचा जर शेवट अचानक झाला, तर मोकळें होणारें भांडवल पुन्हां गुंतविण्याचा प्रश्न सहकारी संस्थांपुढे उभा राहील.

### विचारविनिमय व सल्ला ह्यांची आवश्यकता

सरकारनें या दृष्टीनें विचार करून नियंत्रित वांटप पद्धती बरोबरच सहकारी संस्थांना अपुऱ्या पडणाऱ्या भांडवलाची योग्य तरतूद करणें आवश्यक आहे. अर्थात्, हें भांडवल योग्य तारणावरच द्यावें, असेंच कोणीही म्हणेल. आजच्या परिस्थितींत सहकारी संस्थांनीं आपल्या जवळील कर्जरोखे मोडून पैसा उभा करण्याची व्यवस्था करण्यापेक्षा, सरकारनें रिझर्व्ह बँकेमार्फत रोकड पैसा पुरविण्याची व्यवस्था केल्यास पुढें मागें उत्पन्न होणाऱ्या अडचणींची भीति वाटणार नाहीं, असें वाटतें. त्याचप्रमाणें, प्राथमिक सहकारी संस्थांनींहि आतांपासूनच शक्य तेवढ्या ठेवी मध्यवर्ती अगर प्रांतिक संस्थांकडे ठेवण्याची पराकाष्ठा करावी. पैसा पुरविणाऱ्या संस्थांनीं एकत्र येऊन भांडवल उभें करण्याचे बाबत विचार करून एकसूत्री धोरण ठरविणें अगत्याचें आहे, असें वाटतें. प्रांतिक सरकारनें व त्याच्या मुख्यतः सहकारी खात्यानें ह्याबाबत सहकारी संस्थांना योग्य तो सल्ला द्यावा, अशी त्यांची स्वाभाविक अपेक्षा आहे.

हिंद कमर्शिअल सिंडिकेट लिमिटेड
ऑफिस—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर
अधिकृत शेअर भांडवल एक लाख रुपये
व्यापारी व दैनंदिन उपयोगी पदार्थ तयार करणारी संस्था.
सर्व प्रकारच्या एजन्सीज घेणें आहेत.
शेअर्स, ठेवी व एजन्सीबाबत पत्रव्यवहार करावा.
बा. ग. देवगांवकर
चेअरमन.

पेटंट इस्तरीचे कारखानदार
फॅमिली, शिंपी आणि धोबी लोकांकरितां
गरगट्टी आणि सन्स मेटल वर्क्स
शहापूर—बेळगांव S. M. C.

## हिंदच्या परदेशी व्यापारांत सुधारणा

जून, १९४८ अखेर संपलेल्या तिमाहींत हिंदनें समुद्रमार्गानें केलेल्या व्यापारांत निर्यातीपेक्षा आयात १ कोटी, ९६ लाख रुपयांनीं अधिक केली. गेल्या वर्षी म्हणजे हिंदुस्थानची फाळणी होण्यापूर्वी वरील तौलनिक आकडा ७ कोटी, ७८ लाख रुपयांचा होता. कालगणना अर्थात् वरील प्रमाणेंच धरलेली आहे. व्यापाराबाबत ही जी सुधारणा दिसून येते तिचें श्रेय निर्यातीच्या वृद्धीला द्यावें लागेल. जून, १९४७ अखेरच्या तीन महिन्यांत हिंदुस्थाननें ९७ कोटी रुपयांच्या मालाची निर्यात केली होती. ३० जून, १९४८ ला संपलेल्या तिमाहींत १०३ कोटी रुपयांच्या मालाची निर्यात झाली. माल आयात करून पुन्हा निर्यात करण्याच्या व्यवहारांतहि वरील दोन वर्षांच्या कालखंडांत २ कोटी रुपयांचा फरक आहे. पुढील तक्त्यांत आयात-निर्यातीचा तपशील दिला आहे.

( आंकडे लाख रुपयांचे )

| | ३० जून १९४८ ला संपलेले ३ महिने | जून १९४७ ला संपलेले ३ महिने | जून १९४८ | जून १९४७ |
|---|---|---|---|---|
| आयात | १०८,७९ | १०४,७२ | ३५,७५ | ३५,०४ |
| निर्यात | १०३,४९ | ९५,५८ | ३५,९५ | ३४,८० |
| पुनर्निर्यात | ३,३४ | १,३६ | ८२ | ३८ |
| वाढावा किंवा तूट | १,९६ | −७,७८ | +१,०२ | + १४ |

× × ×

### हिंदुस्थानांतून निर्यात झालेला प्रमुख माल

( आंकडे लाख रुपयांचे )

| | ३० जून १९४८ अखेरचे ३० महिने | ३ जून १९४७ अखेरचे ३ महिने | जून १९४८ | जून १९४७ |
|---|---|---|---|---|
| तागाच्या वस्त | ३५,४५ | २८,९८ | १५,१० | १३,८८ |
| कच्चा ताग | ९,४५ | ७,०३ | २,४७ | २,६७ |
| चहा | ९,६८ | १०,८५ | २,८६ | ३,७४ |
| कापूस | ८,०९ | १२,१७ | ३,१४ | ३,६२ |
| कपास कापड | ७,२६ | ५,६६ | ३,०५ | १,८६ |
| तेलें | ४,८९ | १,१२ | ९२ | ८५ |
| कातड्याचें सामान | ३,४१ | ४,४५ | १,१३ | १,३९ |
| गळिताची धान्यें | २,८३ | ९८ | १६ | ३१ |
| तंबाखू | १,६८ | ७३ | ६५ | ३० |
| मसाल्याचे पदार्थ | १,२० | १,७४ | ३० | ३८ |

* * *

### हिंदुस्थानांत आयात झालेला माल

( आंकडे लाख रुपयांचे )

| | ३० जून १९४८ अखेरचे ३ महिने | ३० जून १९४७ अखेरचे ३ महिने | जून १९४८ | जून १९४७ |
|---|---|---|---|---|
| सर्व प्रकारची यंत्रसामुग्री | १९,६५ | १२,१७ | ६,१५ | ३,८२ |
| धान्यें, डाळी, आटा | १०,६६ | ५,०५ | ३,३७ | २,६७ |
| कापूस | १२,३२ | ९,६२ | ५,६६ | २,९५ |
| खनिज तेलें | ९,६८ | ९,३५ | ३,४२ | ४,२१ |
| वाहनें | ७,८१ | ५,९९ | २,६५ | १,९६ |
| धातू | ६,५९ | ६,०९ | २,३६ | २,१२ |
| औषधें व रसायनें | ४,०७ | ४,४९ | १,६५ | १,४७ |
| रंग | ३,३५ | ३,६५ | १,२७ | ९६ |
| विजेचीं उपकरणें | २,१३ | २,१७ | ७७ | ८१ |
| लोकरीच्या वस्तु | ९७ | १,०९ | १८ | २७ |


पुणें जिल्हा सहकारी
खरेदी विक्री संघ लि०
पुणें.
सर्व शेतकऱ्यांना नूतन वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.

कुलाबा जिल्ह्यांतील अनुक्रमानें नि गुणानें पहिला
पनवेल तालुका सहकारी खरेदी विक्री संघ, लि. पनवेल.
स्थापना ता. १९-३-४४
शेअर्स भांडवल : (अधिकृत) रु. ५०,०००
,, : (वसूल) ,, ३५,५८५
एकूण खेळतें भांडवल : ,, १,५२,२००
मुख्यतः शेतकऱ्यांच्या हितासाठीं स्थापन झालेली सहकारी संस्था.
एन्. पी. शहा.
मॅनेजर.

तार: *Farmer shop* टेलि. ३३३६१
दि बॉंबे प्राव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी, लि.
इस्माइल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, फोर्ट, मुंबई १
अध्यक्षः दिवाणबहादूर एच. एल. काजी, एम. ए., बी. एस्सी, आय. ई. एस. (रि.), जे. पी.
विक्री
सहकारी सोसायट्या व व्यक्तिशः उत्पादक ह्यांचें धान्य, डाळी, गळिताचीं धान्यें, फळें, भाज्या, इत्यादि मालाची विक्री ही संस्था करते.
शेतीविषयक पुरवठा
सल्फेट ऑफ अमोनिया, बोनमील, पेंडीची व इतर सर्व तऱ्हेचीं खतें, लोखंड-पोलादाचीं अवजारें, इत्यादींचा पुरवठा केला जातो.
इतर माल
चहा, कॉफी, धुण्याचा व अंगाचा साबण, जीवनोपयोगी जिनसा, इत्यादीहि पुरविल्या जातात.
चौकशी व ऑर्डरसाठीं लिहा—
वाय. टी. देसाई, बी. एजी., एम. एस्सी. (अर्थ) (लंडन) एफ. आर. इकॉ. एस. (लंडन) सेक्रेटरी
व्ही. के. कलघटगी बी. ए., जी. डी. सी. आणि ए. मॅनेजर

## टाटा घराण्याचा साठ वर्षांचा इतिहास

हिंदुस्थानच्या औद्योगिक विकासांत टाटा ह्या कुटुंबानें महत्त्वाचा वांटा उचललेला आहे. टाटा कारखान्यांचे आद्य संस्थापक मि. जमशेटजी नसरवानजी टाटा हे होत. त्यांचा जन्म १८३९ सालीं झाला. १८५८ सालीं एका सॉलीसिटरच्या कचेरींत 'आर्टिकल्ड' क्लार्क म्हणून ते काम करीत होते. पण त्यांनीं हा अभ्यासक्रम पुरा न करतांच आपल्या वडिलांच्या व्यापारधंद्यांत लक्ष घालण्यास प्रारंभ केला. व्यापारधंद्यांत त्यांनीं चांगला अनुभव मिळविला. १८६६ सालीं अमेरिकन यादवी सुरू झाली आणि मुंबईंत व्यापाराला तेजी आली. त्यावेळीं जे. एन्. टाटा व त्यांचे वडील ह्यांनीं एशिआटिक बँकिंग कॉर्पोरेशन संस्थेंत प्रवेश केला, आणि टाटा कंपनीची एक एजन्सी उघडण्यासाठीं ते लंडनला गेले. त इंग्लंडमध्यें असतांनाच मंदी आली. कॉर्पोरेशनचें दिवाळें निघालें. पण ह्याही परिस्थितींत टाटा आपल्या देणेदारांशीं प्रामाणिक राहिले. त्याचा परिणाम होऊन त्यांनाच कॉर्पोरेशनचे लिक्विडेटर नेमण्यांत आलें. टाटा घराण्याला कांहीं दिवस हलाखीचे गेले तरी तीन वर्षांत त्यांची परिस्थिति सुधारली. त्यामुळें जे. एन. टाटांना इंग्लंडमध्यें आणखी चार वर्षें काढता आलीं. इंग्लंडमध्यें असतांनाच हिंदुस्थानांत कापडाच्या गिरण्या काढण्याची कल्पना त्यांच्या डोक्यांत आली.

### कापडाची गिरणी

मुंबईला आल्यावर त्यांनीं एक बंद पडलेली तेलाची गिरणी आणखी तीन भागीदारांच्या सहकार्यानें विकत घेतली आणि तिचें सुताच्या व कापडाच्या गिरणींत रूपांतर केलें. ह्या गिरणीचें नांव अलेक्झांड्रा ठेवण्यांत आलें. दोन वर्षांनंतर ही गिरणी त्यांनीं चांगला फायदा घेऊन विकून टाकली आणि कापडाच्या धंद्याचा अधिक अभ्यास करण्यासाठी ते पुन्हां लँकेशायरला गेले. तेथील अभ्यासावरून त्यांचें असें मत झालें कीं हिंदुस्थानांत कापडाचा धंदा फार चांगल्या तऱ्हेनें करता येण्यासारखा आहे. तथापि, मुंबईंत त्यावेळीं सुद्धा १५ गिरण्या असल्यामुळें त्यांनीं मध्यप्रांतांत कापूस पिकणाऱ्या भागांतच नवीन गिरण्या काढण्याचें ठरविलें. १८७४ मध्यें सेंट्रल इंडिया स्पिनिंग अँड वीव्हिंग कंपनी स्थापन करण्यांत आली. तिचें भांडवल अवघें १,१५,००० पौंड होतें. गिरणी १ जानेवारी, १८७७ मध्यें सुरू करण्यांत आली. गिरणीचें नांव एंप्रेस मिल्स असें ठेवण्यांत आलें. ह्या गिरणींत प्रथमच हवा ठराविक उष्णतामानाचीं राखणारें यंत्र बसविण्यांत आलें व इतरें आधुनिक यंत्रें उपयोगांत आणलीं गेलीं. त्याचप्रमाणें कामगारांसाठी बोनस आणि प्रॉव्हिडंट फंडाचीही व्यवस्था करण्यांत आली. गिरण्यांची भरभराट होत गेली त्याचबरोबर टाटांचाहि उत्कर्ष होत गेला. तथापि, केवळ पैसा हें टाटांचें ध्येय नव्हतें. प्रत्येक धंद्यानें नफा वाटावा अशी त्यांची अपेक्षा होती; पण त्याचबरोबर देशाच्या उत्कर्षाचाही ते विचार करीत.

### टाटांचे तीन सिद्धांत

टाटा हे प्रवासाचे मोठे भोक्ते होते. त्यांनीं पाश्चात्य देशांत पुष्कळ प्रवास केला. ह्या प्रवासावरून हिंदुस्थानच्या उद्योगधंद्याविषयीं त्यांनीं तीन सिद्धांत मनाशीं ठरविले: (१) जो देश स्वतः लोखंड व पोलाद तयार करूं शकत नाहीं तो औद्योगिक दृष्ट्या मोठा होऊं शकणार नाहीं. (२) शास्त्रीय आणि तांत्रिक शिक्षणाची मदत घेतल्याखेरीज आर्थिक वृद्धीचें सातत्य टिकणार नाहीं आणि (३) मुंबईची भरभराट बंगाल व बिहार कोळशावरच्या अवलंबून न ठेवतां तीसाठी स्वस्त विजेच्या शक्तीचा पुरवठा केला पाहिजे. टाटांच्या भव्य कल्पनाशक्तीमुळेंच हिंदुस्थानच्या तीन मोठाल्या संस्था उभ्या राहिल्या : (१) जमशेटपूर येथील पोलाद व लोखंडाचा कारखाना (२) मुंबईला वीजपुरवठा करणारीं विजेचीं केंद्रें आणि (३) बंगलोरमधील इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स. उद्योगधंद्यांना पाण्यापासून उत्पन्न होऊं शकणाऱ्या शक्तीचें महत्त्व किती आहे हें त्यांनीं १८७५ सालींच ओळखलें होतें. तथापि लोणावळ्याच्या धरणाच्या पायाचा दगड घालण्यास १९११ साल उजाडलें आणि प्रत्यक्ष विजेचा पुरवठा तर टाटांच्या मरणानंतर ७ वर्षांनीं म्हणजे १९१५ सालीं होऊं लागला.

### कार्याचा व्याप

टाटा कंपनीची स्थापना १८८७ सालीं खाजगी व्यापारी कंपनी म्हणून झाली. १९०७ सालीं टाटा आयर्न अँड स्टील कंपनी स्थापन झाली आणि १९१४ मध्यें पोलाद तयार होऊं लागलें. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धांत ह्या कारखान्यांचा बराच विस्तार झाला. बिहारमधील जंगलांतल्या साकची ह्या खेडेगांवाचेंच रूपांतर आजच्या जमशेटपुरांत झालेलें आहे. जमशेटपूरमधील लोकसंख्या १॥ लाखावर आहे. वीज उत्पन्न करणाऱ्या टाटांच्या तीन कंपन्या असून त्यांच्या स्थापना पुढील अनुक्रमानें झाल्या. टाटा हैड्रो इलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी १९१५; आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी १९१६; टाटा पॉवर कंपनी १९२७. आज हिंदुस्थानांत जितकी वीज उत्पन्न करण्यांत येते तिच्यापैकी एक तृतीयांश पुरवठा वरील तीन कंपन्यांचीं केंद्रें मिळून निर्माण करतात. टाटांनीं सिमेंटचा धंदाही हिंदुस्थानांत सुरू केला. १९१२ सालीं काठेवाडांतील पोरबंदरला इंडिअन सिमेंट कंपनी काढण्यांत आली. १९२५ सालीं हैद्राबादला दुसरी कंपनी स्थापन करण्यांत आली. १९३६ सालीं हिंदुस्थानांतील सर्व सिमेंट कंपन्यांची मिळून असोसिएटेड सिमेंट कंपनी नावांची संयुक्त कंपनी स्थापन करण्यांत आली. टाटा घराण्यानें ह्याशिवाय तेलाच्या गिरण्या व रसायनाचे कारखाने काढल्याचें प्रसिद्धच आहे. ब्रिटनमधील इंपिरिअल केमिकल इंडस्ट्रीजशीं सहकार्य करून रंगाचा उद्योगधंदा काढण्याची टाटा घराण्याची खटपट हल्लीं चालू आहे.



डोंगरे यांचें बालामृत







नवें वर्ष आमच्या ग्राहकांस सुखाचें जावो.




**गोवारीकर लकी फोटो**

( रजिस्टर्ड )

कोल्हापूर पुणें २.




नूतन वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो.




नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो.




**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## सोन्याची किंमत उतरेल काय ?

सोन्याच्या किंमतीनें मुंबईंत नुकताच उच्चांक गांठला होता. हजर सोन्याची किंमत एका तोळयाला १२२ रुपये इतकी वर गेली होती. ही किंमत एकदम चढली, ह्यांत तसें आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. मुंबईतील सोन्या-चांदीचा बाजार गेल्या दहा वर्षांत एकसारखा तेजीचाच असलेला आढळून येतो. सोन्याच्या किंमतींत कसकशी वाढ होत गेली, त्याची कल्पना पुढील तक्त्यावरून येईल.

दर तोळयाची किंमत

| साल | जास्तींत जास्त | कमींत कमी | सरासरी |
|---|---|---|---|
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |
| १९२६-२७ | २१-११-६ | २१-४-६ | २१-७-८ |
| १९३१-३२ | ३१-२-० | २१-३-६ | २४-४-३ |
| १९४०-४१ | ४८-८-० | ४०-२-६ | ४२-६-० |
| १९४१-४२ | ५७-१२-० | ४१-९-६ | ४४-७-११ |
| १९४२-४३ | ७२-०-० | ४४-१२-० | ५७-१०-१० |
| १९४३-४४ | ९७-४-० | ६५-४-० | ७६-११-६ |
| १९४४-४५ | ७६-१२-० | ६१-२-० | ७१-७-४ |
| १९४५-४६ | ९७-११-० | ६३-६-० | ८०-३-० |
| १९४६-४७ | १११-०-० | ८४-४-० | १०१-१-२ |
| १९४७-४८ | ११७-१२-० | ९५-१४-० | १०८-०-४ |

हिंदुस्थानांतील चलनाच्या तारणासाठी सरकारजवळ सुमारें ७८ लाख, २० हजार औंस सोनें असावें. सध्यांच्या किंमती धरल्या तर त्याची किंमत जवळजवळ २३५ कोटी रुपये होते. तथापि, हिंदुस्थानांत किती सोनें गडप होऊं शकतें, तें ह्या शतकांतील पहिल्या ३१ वर्षांतील सोन्याच्या आयातीच्या तक्त्यावरून दिसून येते.

सरासरी आयात

| काळ | औंस | रुपयांत किंमत (आकडे कोटी रु. चे) |
|---|---|---|
| १९००-१९०५ | ९७६, २०६ | ६·२३ |
| १९०५-१९१० | १८, ४४, ७७९ | ११·७४ |
| १९१०-१९१५ | ४१, ११, ३८८ | २४·३४ |
| १९१५-१९२० | २१, ४५, ८३४ | १३·४१ |
| १९२०-१९२५ | ४५, १९, ८०७ | २८·७० |
| १९२५-१९३० | ३८, ०२, ३७५ | २१·५५ |
| १९३०-१९३१ | २२, ४२, ६५३ | १२·७५ |

### अमेरिकेचें धोरण निर्णायक

सोन्याच्या हव्यासाला युद्धकाळांत आणखीच भरती आली. त्याचें कारण शेतकऱ्यांच्या हातीं पैसा खेळूं लागला, आणि बेकायदा मिळविला गेलेला पैसा सोन्यांत रूपांतर पावूं लागला. सोन्याची आयात युद्धकाळांत बरीच मंदावली. १९४७ सालापासून तर तीवर निर्बंधच घालण्यांत आला. नाहींतर ह्याहीपेक्षा अधिक मोठ्या प्रमाणावर सोन्याची आयात झाली असती. सोन्याची किंमत वाढूं नये म्हणून प्रयत्न करावयाचे असतील, तर बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सोनें आयात करावें लागेल, हे उघड आहे. हें सोनें कोठून आणतां येईल ? हिंदुस्थानांतील सोन्याचें उत्पादन फारसें विचारांत घेण्याचें कारण नाहीं. तें १,७१,६९६ औंसांच्या आसपास आहे व त्याची किंमत ४ कोटी, ९२ लाख रुपये होईल. चलनाला तारण म्हणून लागणारें सोनें आपल्या जरूरीइतकेंच जेमतेम आहे. अर्थात्, सोनें आयात करण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. जगांतील सोन्याचा सर्वांत अधिक सांठा अमेरिकेजवळ आहे. त्याच्या खालोखाल रशियाजवळ आहे. तथापि आज जगाच्या निर्यात व्यापारांत अमेरिका अग्रेसर असल्यामुळें अमेरिकेंतील सोन्यासंबंधीच आपणांस विचार करावा लागेल. १९४६ सालीं अमेरिकेनें १५ अब्ज डॉलर्सचा माल निर्यात केला. पुढील वर्षी हा आकडा २० अब्जापर्यंत जाईल असा अंदाज आहे. ह्या मालासाठी अमेरिकेला इतर देशाकडून सोनें घ्यावें लागणार हें उघड आहे. १९४५ ते १९४७ च्या दरम्यान अमेरिकेकडे ३·१ अब्ज डॉलर्सचें सोनें व्यापारी देण्यासाठीं निर्यात करण्यांत आलें. ह्यावरून सोन्याच्या किंमतीबाबत अमेरिकेचें धोरणच कसें निर्णायक ठरण्यासारखें आहे, हें दिसून येतें.

हिंदुस्थानच्या व अमेरिकेच्या व्यापारांत आपली निर्यात, जर आयातीपेक्षा अधिक झाली तर अमेरिकेंत सोनें घेण्यासाठी हिंदुस्थानला डॉलर्स मिळूं शकतील. परंतु अशी स्थिति परवापरवापर्यंत नव्हती. उलट आपलीच आयात निर्यातीपेक्षां अधिक होती. तथापि पुढेंमागें आपणाला डॉलर्स मिळण्याइतकी अधिक निर्यात आपण केली, असें धरून सुद्धां एक महत्त्वाचा प्रश्न शिल्लक उरतोच. हे डॉलर्स कशावर खर्चावयाचे हाच तो प्रश्न. अतिशय जरूर असलेला भांडवली स्वरूपाचा माल डॉलर्सच्या मोबदला घ्यावा, की सोनें घ्यावें असा प्रश्न उभा राहील. किंवा, ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू आणि सोन्याची आयात ह्याच्यांतहि विरोध उत्पन्न होईल.

सोन्याच्या आयातीवरील सध्याची बंदी चालू ठेवावी काय हाहि एक प्रश्नच आहे. कधीं कधीं असें सुचविण्यांत येतें कीं बंदी काढून, येईल तितकें सोनें हिंदुस्थानांत येऊं द्यावें. पण सोन्याच्या आयातीवरील बंदीला सुद्धां थोडासा इतिहास आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानांत सोन्याची किंमत इतर देशांच्या मानानें खूपच अधिक आहे. त्याचा फायदा घेण्यासाठी युरोपांतील कांहीं देशांनीं १९४७ च्या प्रारंभीं बरेंच सोनें व चांदी हिंदुस्थानांत निर्यात केली. बंदी काढली गेली तर पुन्हा तसेंच होईल किंवा काय ह्याचाहि विचार झाला पाहिजे. एकंदरीनें, सोन्याची किंमत नजीकच्या भविष्य काळांत अमुक एका पातळीवर स्थिर होईल असा संभव दिसत नाहीं. सध्यां इतकेंच करतां येण्यासारखें आहे. सोन्याच्या वायदे-बाजारावर नियंत्रण घालून किंमतींत खंड पाडतां येईल आणि परवान्यानें होणाऱ्या सोन्याच्या आयातीवरील जकात रद्द करतां येईल. सोन्याच्या किंमतींत एकदम जी चढ होते त्याचें कारण देशाच्या चलनाच्या बाबतींत लोक अस्वस्थ आहेत. ही अस्वस्थता घालवण्यासाठी वस्तूंच्या किंमती स्थिर करणें, चलनविस्तारावर आळा घालणें व विश्वासाचें वातावरण निर्माण करणें, हेच उपाय केले पाहिजेत.

सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी ठेवण्यासाठी
—कोल्हापुरांतील प्रतिष्ठित व्यापारी व सन्मान्य नागरिक यांनीं चालविलेली—
दि युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि.
शिवाजी चौक, कोल्हापूर.
येथें चौकशी करा अगर भेटा. —जी. जी. श्रीखंडे, मॅ. डायरेक्टर

कार्यतत्पर अशा संचालक मंडळाच्या देखरेखीखालील

## धि सुप्रीम बँक ऑफ इंडिया लि.

## बेळगांव

स्थापना १९३९

शाखा : कोल्हापूर व आरोंदा

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | २,५०,०७० रु. |
| रिझर्व व इतर फंड | ३९,००० रु. |

खेळतें भांडवल २२ लाखांचे वर

सुप्रीम बँकेकडेच आपले सर्व बँकिंगचे व्यवहार सोपवा.
दक्षिण हिंदुस्थानांतील प्रमुख शहरीं एजन्सीज.

श्रीधर का. सामंत
मॅनेजिंग डायरेक्टर

जीवनांतील आनंद
व
दिवाळींतील मौज
खरोखर लुटावयाची असेल, तर सर्व प्रकारच्या काळजींतून मुक्तता होणें आवश्यक आहे.

आपल्या मोटारींच्या विम्याबाबत
धि

## मोटार ओनर्स म्युच्युअल कंपनी लि.

ही कंपनी आपली सर्व काळजी दूर करील.

" प्रीमिअमचे अत्यंत माफक दर, हप्त्यानें प्रीमिअम भरण्याची सोय, इतर अनेक सवलती, पॉलिसी घेतांच कंपनीचे भागीदार होता येणें, चोख व काटकसरीची व्यवस्था. यामुळें विश्वासानें या कंपनींत मोटारीचा विमा उतरून निश्चिंत राहतां येतें."

फुल कव्हर विमेही स्वीकारले जातात.

भेटा अगर लिहा:—

मुख्य कचेरी:— फोर्ट रोड, बेळगांव.

पुणें शाखा:-
१०४ सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंगजवळ
लक्ष्मी रोड–पुणें. २.
( फोन नं. २१८० ).

कोल्हापूर शाखा:-
पोवार बिल्डिंग,
शिवाजी रोड,
बिंदु चौकाजवळ–कोल्हापूर.

आमचे विमेदारांस, ग्राहकांस व प्रतिनिधींस
ही दिवाळी आनंदाची जावो !!!

## डुप्लीकेटर्स

### घरगुती छपाईचें उत्कृष्ट यंत्र

फक्त एकाच वर्षाच्या प्रिंटिंगच्या खर्चांत विकत मिळणारे, साधे व सुटसुटीत, हरकामी, लहान मोठे व्यापारी, कारखानदार, शिक्षण व इतर संस्था, क्लब्ज वगैरेंना नेहमी लागणारें प्रिंटिंगचें काम या यंत्रावर सुबक रीतीनें मिळतें. कॅशमेमोज्, बिल फॉर्मस्, सर्क्युलर्स, दर पत्रकें, हॅन्डबिल्स, परीक्षेचे पेपर्स, वगैरे सर्व प्रकारचीं प्रिंटिंगचीं कामें या यंत्रावर होतात. इतर माहिती व किंमतीबद्दल आजच लिहा:—

कारखानदार शेवडेज कॅमेरा वर्क्स लि., टिळकवाडी, बेळगांव.

विश्वासानें व किफायतशीरपणानें भांडवल गुंतविण्याचें आदर्श ठिकाण

## पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्ट्स लिमिटेड

हेड ऑफिस व फॅक्टरी : पोस्ट–कुरोली
( व्हाया–कुर्डुवाडी )

कंपनीचें खपलेलें शेअर-भांडवल रु. ४,५६,६००
कंपनीकडील मुदतीच्या ठेवी रु. २,७५,४००

वाढत्या धंद्यासाठी खालील दरानें
ठेवी घेणें आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ★ मुदत वर्षें | १, | २, | ३. |
| ★ व्याजाचा दर, द. द. शेकडा | ४½, | ५, | ६. |

अधिक माहितीसाठी आजच वरील पत्त्यावर लिहा.

मॅनेजिंग एजन्ट्स:–जे. व्ही. ताम्हनकर आणि कंपनी

## रशिआंतील सहकारी चळवळ

अमेरिका, पश्चिम युरोप आणि हिंदुस्थान ह्या देशांतील सहकारी चळवळ भांडवलदारी समाजाच्या विशिष्ट परिस्थितींतूनच उगम पावली. तथापि ह्या चळवळीचीं तत्त्वें आणि अनुभव ह्यांचा उपयोग भांडवलशाही समाजाच्या जागीं समाजवादी समाज उभारतांनाही बराच होण्यासारखा आहे. हें संक्रमण होत असतांना सहकारी चळवळीला काय अडचणी येतील त्याची समजूत मात्र नीट करून घेतली पाहिजे. १९१७ सालीं रशिआंत क्रांति झाल्यानंतर तेथील सहकारी चळवळीला काय अनुभव आला, त्याचा अभ्यास केला तर संक्रमणकालांत उत्पन्न होणाऱ्या प्रश्नांचें स्वरूप स्पष्ट होण्यासारखें आहे.

जगांतील सहकारी चळवळीचा विचार करतांना तिचीं प्रमुख कार्यें पुढीलप्रमाणें सांगतां येतील. (१) ग्राहक आणि छोट्या प्रमाणावर उत्पादन करणारे वर्ग ह्या दोघांचें मक्तेदार कंपन्यांपासून रक्षण करणें (२) संस्थेंतील सभासदांना थोडी थोडी शिल्लक टाकण्याची सोय करून, ती रक्कम सर्वांच्या फायद्यासाठी वापरणें (३) शहरांतील व खेड्यांतील अवघडांत अवघड अशीं कामें सहकार्यानें करवून घेणें (४) मागासलेल्या देशांतील लोकांची एकजूट करून त्यांना आपली परिस्थिति सुधारण्यास मदत करणें (४) आर्थिक लोकशाहीचें शिक्षण देण्याचें सहकारी चळवळ हें एक उत्तम साधन आहे. तथापि सोव्हिएट रशिआंतील सहकारी चळवळ व भांडवलशाही देशांतील सहकारी चळवळ ह्यांत फरक आहे. वर सांगितलेल्या कार्यांपैकी पहिलीं दोन कार्यें करण्याची जरूरच सोव्हिएटमधील सहकारी चळवळीला पडत नाहीं. इतर कार्यांच्या बाबतींत मात्र इतर देशांची सहकारी चळवळ व रशिआंतील सहकारी चळवळ ह्यांत भेद नाहीं.

### सहकारी चळवळीवर राजकीय परिणाम

१९२१ सालीं रशिआंतील यादवी संपली. त्यावेळीं तेथील शेतीचें उत्पादन घरच्या गरजा भागविण्याइतकेंसुद्धां नव्हतें. उद्योगधंदेहि दीर्घकालीन युद्धामुळें मोडकळलेले होते. तेव्हां पहिला तांतडीचा प्रश्न दोन्ही प्रकारचें उत्पादन वाढविण्याचा होता. त्यांतच भांडवलशाही राष्ट्रें आपल्यावर पुन्हां आक्रमण करतील अशी भीति रशिअन सरकारला वाटत होती. उत्पादनवाढीच्या कार्यक्रमांत सहकारी चळवळ मोठें कार्य करील अशी अपेक्षा होती. १९१८ ते १९२८ ह्या दहा वर्षांत खाजगी व्यापाऱ्यांची जागा भरून काढण्याचें काम सहकारी संस्थाच करूं शकत होत्या. वस्तूंची वाटणी करणें, शेती करणें आणि उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल निर्माण करणें हींही कामें, त्यांना करावीं लागलीं. ऑक्टोबरची क्रांति झाली त्यावेळीं रशियांत ५५,००० स्थानिक सहकारी संस्था होत्या. सहकारी संस्था आणि कामगारांचे संघ ह्यांना आपआपल्या प्रांतांत, पण ठरलेल्या आर्थिक व राजकीय धोरणांतल्या चौकटींत निर्णय घेण्याचें स्वातंत्र्य बोल्शेव्हिक पक्षानें दिलें. तथापि ह्या धोरणाचा अनेक कारणांमुळें नीटसा उपयोग झाला नाहीं. अशा परिस्थितींत आपल्या राजकीय ध्येयाला चिकटून रहावयाचें तर सहकारी चळवळीचा संपूर्ण ताबा घेण्याशिवाय कम्युनिस्ट पक्षाला गत्यंतरच नव्हतें. एकदां चळवळीवर सरकारचें पूर्ण नियंत्रण बसल्यावर मात्र तिला पुन्हा स्वातंत्र्य देण्यांत आलें. गेल्या दहा वर्षांत तर सहकारी चळवळीला अधिक क्षेत्रें खुलीं करण्यांत आलीं असून तीवर अधिक जबाबदारीही टाकण्यांत आली आहे.

### भौगोलिक परिस्थिति

सोव्हिएट रशिआचें क्षेत्रफळ ८२,२६,००० चौरस मैल आहे. चीन किंवा अमेरिकेपेक्षां हें क्षेत्रफळ दुपटीहूनहि अधिक आहे. आर्थिक दृष्ट्या एकादा देश जितका स्वावलंबी होणें शक्य आहे तितका रशिआ आहे. ह्या भौगोलिक परिस्थितीचा तेथील सहकारी चळवळीवर परिणाम झालेला दिसून येतो. प्रत्येक क्षेत्रांतील सहकारी संस्थांची संख्या व त्यांतील सभासदांची संख्या अवाढव्य असते. त्यामुळें ह्या संस्था गुंतागुंतीच्या व चालविण्याला अवघड असतात. रशिआंत ग्राहकांच्या २८,९०० सहकारी संस्था आहेत. युद्धापूर्वी ब्रिटनमध्यें १,०२९ संस्था होत्या, जर्मनींत १,५०० होत्या, फ्रान्समध्यें १,१७६ होत्या. स्वीडनमध्यें ८०१ होत्या आणि स्वित्झरलंडमध्यें १,३०० होत्या. केवळ संस्थांच्या संख्येवरूनसुद्धां रोजच्या व्यवहारांतील प्रश्न किती गुंतागुंतीचे होत असतील ह्याची कल्पना येण्यासारखी आहे. सोव्हिएट रशिआंतील उत्पादकांच्या सहकारी संस्था जितक्या यशस्वी झाल्या आहेत तशा ग्राहकांच्या सहकारी संस्था मात्र झालेल्या नाहींत. ह्याचें कारण ग्राहकांच्या सहकारी संस्थांना लक्षावधि सभासदांच्या गरजा भागवावयाच्या असतात आणि हे सभासद युरोपिअन रशिआ व आशिआंतील रशिआ ह्या भागांत दूरवर पसरलेले असतात हें आहे. १९१२ सालीं सहकारी संस्थांची दहा लाखांवर वाटप-केंद्रें होतीं. १९२७ सालीं तीं ६,४०,००० झालीं. १९३८ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत तीं ३,५४,७०० झालीं. खेड्यांतील सहकारी संस्था वांटपाचें काम करतातच. पण त्याशिवाय अन्नपदार्थ व कच्चा माल, स्वतःसाठी अगर कारखान्यासाठी जमविण्याचें कार्यही त्या करतात. रशिआंतील सहकारी संस्थांचें आजचें स्वरूप बरेंच स्थायी वाटतें. त्या चळवळीचे सभासद खूप वाढले आहेत, आणि व्यवहाराचा अनुभवही तिला चांगला आला आहे. सहकारी क्षेत्रांतील शिक्षणाची व्यवस्थाही बरीच विकास पावलेली दिसून येते.

("कोऑपरेशन इन् सोव्हिएट यूनिअन" एन. बरो)

गोवारीकर लकी फोटो
(रजिस्टर्ड)
कोल्हापूर पुणें २.

तुमचे कपडे स्वच्छ हवेत ना ?
★ मग ★
वॉशेक्स सोप व साबण चुरा
— वापरा —
तयार करणार—
दि औंध सोप ॲन्ड केमिकल इंडस्ट्रिज लिमिटेड
पो. ओगलेवाडी (सातारा)

## लोकमान्य इंडस्ट्रीज लि.

**कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २.**

*आमच्या कंपनीचे सर्व भागीदारांस व हितचिंतकांस हें नूतन संवत्सर संपूर्ण आनंदाचें व भरभराटीचें जावो.*

**अध्यक्षः श्रीमंत रावबहादूर गणेश गोपाळ शेंबेकर**

१. कंपनीची प्रिंटिंग व लिथोग्रॅफिक ईंक्स तयार करण्याची मशिनरी लवकरच येणार असून सदर मालाचे उत्पादनास जानेवारी, १९४९ चे सुमारास आरंभ होईल.

२. हिंद सरकारच्या जाहीर केलेल्या औद्योगिक योजनेप्रमाणें सरकारनें देऊं केलेल्या सवलती व आरंभीच्या इन्कमटॅक्स मधील सुटीमुळें आमच्या भागीदारांस भांडवलावर योग्य असा फायदा जरूर मिळूं शकेल.

३. कंपनीचें ६ टक्के रिडीमेबल प्रेफरन्स शेअर्स पांच वर्षानंतर परतफेडीचे ठेविले आहेत. तेव्हां, कंपनीच्या ह्या किफायतशीर शेअर विक्रीचा फायदा घेऊन औद्योगिक प्रगतीस हातभार लावल्याचें श्रेय मिळवावें.

मॅनेजिंग एजंट्सः मे. डब्ल्यू एन्. कलंत्रे आणि कंपनी

☞ *शेअर्सकरितां माहितीपत्रक व फॉर्म मागवून अर्ज करावेत.*



## दि अवधूत महाराष्ट्र शुगरकेन इंडस्ट्रीज लिमिटेड, पंढरपूर, ७६.

**संचालक-मंडळ**

(१) मे. रघुनाथ गोविंद जोशी, बी. ए., एलएल. बी, वकील, पंढरपूर.
(२) मे. कृष्णाजी नामदेव भालेराव, स्टेशनरोड, पंढरपूर.
(३) मे. शामराव विठ्ठल शेळगीकर, उत्तर कसबा, सोलापूर.
(४) डॉ. विठ्ठल विष्णु जोशी, बार्शी.
(५) डॉ. डेव्हिड ॲब्रॅहॅम बिडारी, दवाखाना, पंढरपूर
(६) मे. पंढरीनाथ जनार्दन कुलकर्णी, गिरवी, माळशिरस.
(७) मे. एकनाथ विष्णुपंत अयाचित, पुसेसावळी
(८) मे. हनुमंत वासुदेव कुलकर्णी, म्हासुर्णे,
(९) मे. विश्वनाथ हैबतराव इनामदार.

**मॅनेजिंग डायरेक्टर—नेवरेकर आणि कंपनी**

**कंपनीचें वैशिष्ट्य**

कंपनीनें ५०० एकर जमीनींत अन्नधान्य पिकविलें आहे व एंजिनें खरेदी केलीं आहेत. उसाचे लागणीस सुरवात केली आहे. कंपनी खालील दरानें ठेवी स्वीकारते.

**मुदत वर्षें ३ . ५ टक्के**
**,, ,, ४-५--६ टक्के**

**ठेव ५०० रुपयांचे आंत घेणें नाहीं.**

**शेअर्सची विक्री सुरू आहे—**

नेवरेकर आणि कंपनी
पंढरपूर, नं. ७६



## दी पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

**पंढरपूर ( जि. सोलापूर )**
**( स्थापना—१९११ )**

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ७५,००० रु. |
| खपलेलें शेअर भांडवल | ४३,२३० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ५७,८३५ रु. |
| खेळतें भांडवल | ७,९७,४४८ रु. |

ह्या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेच्या सभासदांना, स्थावर व जामीनावर, मालावर व सोने चांदीवर योग्य व्याजाचे दरानें कर्जें दिलीं जातात. तसेंच व्यापार-उद्योगधंद्यासाठी योग्य जामीनावर कॅशक्रेडीट दिले जातें. चेक-हुंड्याची खरेदी विक्री, सरकारी कर्जरोखे यांची खरेदी विक्री व व्याज वसुली, रशीदी वसुली, वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.**

बँक जिल्ह्यांतील इतर सहकारी बँकांच्या मानानें सर्वांत जुनी असून गेलीं सतत ५ वर्षें 'अ' वर्गांत दाखल आहे. मुंबई सरकारनें कार्यक्षम म्हणून निवड केलेल्या चौदा सहकारी अर्बन बँकांमध्यें ही बँक दाखल आहे. बँकेस मुंबई प्रांताचे अर्थमंत्री श्री. वैकुंठभाई मेहता यांनीं भेट देऊन तिचे कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केलें आहे.

वा. कृ. उत्पात — चेअरमन
एन्. सी. घाणेकर — मॅनेजर



## —ठेवी घेणें आहेत—

**श्रीगणेश ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लिमिटेड**
**( चळें ) पंढरपूर**

—:वैशिष्टयें:—

( १ ) महाराष्ट्रांतील अनुभविक व वजनदार संचालक-मंडळ.
( २ ) साखर व गूळ या धंद्यांतील निष्णात व वाकबगार मॅनेजिंग एजंटस्.
( ३ ) अत्युत्कृष्ट व एकतळी जमीन, भीमा नदीचें भरपूर पाणी व कमी उंचीच्या लिफ्टमुळें कॅनाल इरिगेशनचे दरांत पाणी मिळणेची शक्यता.
( ४ ) रेल्वे स्टेशन फक्त ७ मैलांवर असलेमुळें कमी खर्चांत वहातुकीची सोय.

कंपनी साखर तयार करण्याची मशिनरी मिळविण्याच्या खटपटींत असून इतर कार्यास झपाट्यानें सुरवात झाली आहे व त्याचकरिता कंपनीनें ठेवी घेणेचें ठरविलें आहे.

| मुदत | १ वर्ष, | २ वर्षें, | ३ वर्षें. |
|---|---|---|---|
| व्याजाचा दर | ५ टक्के, | ५½ टक्के, | ६ टक्के. |

चेअरमनः—श्री. ग. बा. ऊर्फ बाबूराव जोशी, बी. ए., एलएल. बी., एम्. एल्. ए. ( मुंबई ), पंढरपूर.

शेअर विक्रीचे काम जोरांत सुरू आहे. अधिक माहितीसाठीं खालील पत्त्यावर चौकशी करावी.

अधिकृत विक्रेतेः—
श्री. आर. जे. सावंत
६२ न्यू एक्सचेंज बिल्डिंग,
अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

मॅनेजिंग एजंटस्
आर. एस. नेऊरगांवकर ॲंड को.
स्टेशन रोड, पंढरपूर.

## हिंदुस्थान सरकारची गेल्या तीन वर्षांतील कर्ज-उभारणी

हिंदुस्थान सरकारनें गेल्या तीस वर्षांत सार्वजनिक कर्जें उभारण्याचे जे व्यवहार केले त्यांचे साधारणपणें चार कालखंड पडतात कर्जावरील व्याजाचें उत्पन्न व कर्जांची यशस्विता ह्या बाबतींत प्रत्येक भागाचीं कांहीं वैशिष्ट्यें लक्षांत येतात. १९१९ ते १९२५ हा कालखंड घेतला तर पुढलिप्रमाणें परिस्थिति दिसून येते. १९४५-५५ ह्या मुदतीच्या ५ टक्के कर्जाची विक्रीची किंमत दर शेंभरामागें आक्टोबर १९१९ मध्यें ९५ रुपये होती. १९२५ च्या जुलैमध्यें ती १०० रुपये झाली. विक्रीच्या किंमतींत ही जी वाढ झाली त्यामुळें जून १९२६ मध्यें, १९६०-७० ह्या मुदतीचें ४ टक्के दराचें कर्ज दर शेंभरामागें ८८ रुपये ह्या विक्रीच्या किंमतीला उभारणें शक्य झालें. त्यानंतर हिंदुस्थान सरकारची कर्जें नीटशीं उभारलीं जाईनात. १९५५-६० ह्या मुदतीचें ४॥ टक्के दराचें कर्ज दर शेंभराला ९४ रुपये ह्या विक्रीच्या किंमतीला उभारण्यांत आलं. ही घसरगुंडी अशीच चालू राहून १९३५ सालचें कर्ज ६॥ टक्के दरानें १०० रुपयाला १०० रुपये किंमतीनेंच उभारावें लागलें. १९३३ च्या एप्रिल मध्यें १९४७-५० मुदतीच्या ३॥ टक्के दराच्या कर्जाची घोषणा शेंभरामागें ९६ रुपयांच्या विक्रीच्या किंमतीला करण्यांत आली. जून १९३४ मध्यें ह्याचा मुदतीच्या व दराच्या कर्जाची घोषणा ९८॥ रुपये विक्रीच्या किंमतीनें करतां येणें शक्य झालें.

पूर्वी कर्ज घेण्याच्या मुदती महिनोमहिने खुल्या ठेवण्यांत येत असत. परंतु व्याजाचे दर कमी केल्याबरोबर कर्जें घेण्याची मुदत अगदी थोडी ठेवण्यांत येऊं लागली.

### सरकारच्या कर्जासंबंधींचा तक्ता.

| कर्जउभारणीचें वर्ष | | कर्ज | विक्रीची किंमत रुपये | रक्कम (कोट रुपये) |
|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर | १९१९ | ५%,१९४५-५५ | ९५ | |
| जुलै | १९२० | ५%,१९४५-५५ | ९५ | |
| " | १९२३ | " " " | ९६ | ५६.७४ |
| जुलै | १९२४ | " " " | ९९ | |
| " | १९२५ | " " " | १०० | |
| जून | १९२६ | ४%,१९६०-७० | ८८ | ६३.३० |
| फेब्रुआरी | १९३३ | ४% १९६०-७० | १०० | |
| ऑगस्ट | १९२८ | ४½%१९५५-६० | ९४ | ९.०६ |
| जून | १९२९ | ५%१९३९-४४ | ९६-८ | २७.७८ |
| जून | १९३२ | ५%,१९३८-४० | ९८ | १९.१२ |
| जून | १९२९ | ५%,१९३५ | ९८ | ...... |
| ऑगस्ट | १९३० | ६%,१९३३-३६ | १०० | २९.४६ |
| सप्टेंबर | १९३१ | ६½%,१९३५ | १०० | ...... |
| एप्रिल | १९३३ | ३½%१९४७-५० | ९६ | ५५.९४ |
| जून | १९३४ | " " " | ९८.८ | |
| सप्टेंबर | १९३४ | ३%१९४१ | ९९ | १०.६७ |
| " | १९३५ | ३%१९५१-५४ | ९६-८ | १५.१३ |
| जून | १९३६ | २¾%१९४८-५२ | १०० | १२.०१ |
| जून | १९३८ | ३%१९६३-६५ | ९८ | २६.३१ |
| ऑक्टोबर | १९४२ | ३%१९६३-६८ | १०० | ७५.१० |
| जुलै | १९४३ | ३%१९५३-५५ | " | ६९.३७ |
| एप्रिल | १९४४ | ३%१९५७ | " | ११४.०७ |
| मार्च | १९४५ | ३%१९५९-६१ | " | ११५.०६ |
| जुलै | १९४५ | २½%१९५० | " | ३५.०९ |
| जानेवारी | १९४६ | २¾%१९६० | " | ४६.६३ |
| | " | | | |
| ऑगस्ट | १९४६ | २½%१९६१ | " | ५७.०० |
| सप्टेंबर | १९४६ | २¾%१९७६ | ९९ | १४.७६ |
| सप्टेंबर | १९४६ | ३%१९८६ | १००* | २३८.८८ |
| नोव्हेंबर | १९४६ | २¾%१९५४ | १०० | ३५.०६ |

*३½% बद्दली.

## लागवड वाढली, तरी उत्पादन घटलें

हिंद सरकारच्या शेतकी खात्यातर्फे १९३७ ते १९४६ ह्या कालांतील अन्नधान्याची लागवड केलेलें क्षेत्र आणि प्रमुख अन्नधान्यांचें झालेलें उत्पादन, ह्यासंबंधींचे अंदाजी आंकडे प्रसिद्ध करण्यांत आले आहेत. लागवडीच्या एकूण क्षेत्रांत ह्या काळांत वाढ झाली आहे. तथापि, एकूण उत्पादन घटलें आहे, निदान लागवडीच्या वाढीच्या प्रमाणांत अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ झालेली नाहीं, असें त्या आकड्यांवरून दिसून येतें. तांदुळाचेंच उदाहरण घेतलें तर भाताच्या लागवडीच्या क्षेत्रांत जवळ जवळ ३० लक्ष एकरांची वाढ झालेली दिसते. पण, उत्पादन मात्र ७ लाख टनांनीं घसरलेलें दिसून येतें. बार्लीच्या क्षेत्रफळाच्या वाढीबरोबर उत्पादन घटलेलें नसलें तरी वाढलेंही नाहीं. ज्वारी बाजरी ह्या पिकांच्या बाबतींतहि तांदुळासारखीच परिस्थिति आहे. गव्हाच्या दर एकरी पिकानें उत्पादन तर फारच घटलें आहे. खालील तक्त्यांत अधिकृत आंकडेवारी संक्षेपानें दिली आहे.

प्रमुख पिकें (हैद्राबाद संस्थान धरून)

क्षेत्र व पिकांचे अंदाजी आंकडे.

| | युद्धापूर्वीच्या तीन वर्षांची सरासरी (१९३६-३७ ते १९३८-३९) | | (१९४५-४६) | |
|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हजार एकर) | उत्पादन (हजार टन) | क्षेत्र (हजार एकर) | उत्पादन (हजार टन) |
| तांदूळ | ५५,१२० | १९,१६२ | ५८,११२ | १८,४६३ |
| गहूं | २५,४६० | ७,०२७ | २४,४९६ | ५,९१२ |
| ज्वारी | ३३,७८९ | ६,५७७ | ३८,७५३ | ५,५६७ |
| बाजरी | १४,९२४ | २,२८५ | २२,९९७ | २,६८१ |
| रागी | ५,४०४ | १,७२८ | ४,८३४ | १,१७० |
| मका | ५,५२० | १,६२१ | ८,७८५ | २,०५२ |
| बार्ली | ५,७९३ | १,९३४ | ६,२४७ | १,९५८ |
| डाळी | १३,३१४ | ३,१४४ | १५,१७७ | ३,१३८ |
| एकूण | १,५९,३२४ | ४३,४७० | १,७८,४५१ | ४०,९५१ |

१९४३-४४ ह्या वर्षीं हिंदुस्थानांतील प्रमुख अन्नधान्यांचें उत्पादन ४,५४,४४,००० टन झालें, १९४४-४५ सालीं उत्पादन ४,५५,२२,००० टन झालें. १९४५-४६ सालीं तें पुन्हा ४,०९,५१,००० टनापर्यंत खालीं घसरलें.

आमच्या माहकांस नवीन वर्ष सुखाचें जावो.

आमचेकडे गव्हाचा "उत्तम रवा"

तयार होतो. त्वरित मागणी करा.

उत्तम प्रॉडक्टस्,

१० गुरुवार, कराड.

दि सदर्न निटिंग वर्क्स लि.
--- पुणें २---
ह्यांनीं तयार केलेली
★होजिअरी★
सर्व प्रकारचा सुती, लोकरी आणि जाळीचा, निरनिराळ्या डिझाइन्समधील माल
इंटरलॉक अंडरवेअर्स व शर्टस्
एस. व्ही. सुपनेकर कुलकर्णी अँड सन्स लि.
मॅनेजिंग एजंटस्.

दि कमार्शियल बँक लि.
—कोल्हापूर—
स्थापना १९३६
हेड ऑफिस—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर
शाखा—(१) पापाची तिकटी, कोल्हापूर
(२) इचलकरंजी
(३) हुपरी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ३,६०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,२७,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ४१,००,००० |

बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.
—भेटा अगर लिहा—
बी. डी. मगदूम, अकौंटंट
गणपतराव लक्ष्मणराव साळोखे, मॅनेजिंग डायरेक्टर

कृष्णा शुगर मिल्स् लि.
उत्तम कन्फेक्शनरी तयार होते.
शुद्ध दुधाची ग्लूकोज मिश्र टॉफी व सर्व तऱ्हेचे बॉइल्ड गुडस्
★ टॉफी हें पूर्णान्न आहे ★
--:डायरेक्टर्सः--
(१) श्री. भिमराव बी. पोतदार, बेळगांव—चेअरमन
(२) श्री. एस्. जी. मराठे ऑफ् रानडे ब्रदर्स, पुणें
(३) श्री. एन्. एस्. गोडबोले, पुणें
(४) दि. ब. एस. डी. मानवी, गदग
(५) श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर
(६) श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर
(७) सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर
(८) रा. ब. व्ही. व्ही. यारगोप, बुधगांव
(९) सरदार वि. दा. पानसे, कृष्णा-कित्तूर
(१०) सरदार के. आर. विंचूरकर, कृष्णा-कित्तूर
कृष्णा-कित्तूर
विंचूरकर आणि कं., मॅनेजिंग एजन्टस्.

## कारखानदारांच्या उत्तेजनासाठी सवलती

हिंदुस्थान सरकारनें ४ ऑक्टोबर रोजीं आपलें आर्थिक धोरण जाहीर केलें, त्या वेळीं कारखानदारांचें उत्पादन वाढविण्यास पोषक अशा सवलती मागाहून प्रसिद्ध होतील, असें आश्वासन देण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें ह्या सवलतींचा तपशील आतां उपलब्ध झाला आहे.

### घसारा

इनकम टॅक्सच्या दृष्टीनें यंत्रसामुग्रीवर घसारा किती काढावा, ह्या बाबतचे नियम सैल करण्यांत येत आहेत. १ एप्रिल, १९४८ नंतर उभारलेल्या इमारती व यंत्रसामुग्री ह्यांवर १९४८–४९ ते १९५३–५४ अखेर सध्याच्या दुप्पट दरानें घसारा काढता येईल. त्यानंतर सध्याचा दर चालू होईल. मात्र, घसाऱ्याची एकूण रक्कम मालमत्तेच्या मूळ किंमतीपेक्षा अधिक होतां कामा नये. तीन पाळ्या चालविणाऱ्या कारखान्यांना जादा घसारा काढतां येईल.

नवीं यंत्रें बसविण्यास उत्तेजन म्हणून आणखी एक सवलत दिली जाईल, तिचें स्वरूप असें. पांच वर्षांच्या मुदतीनंतर यंत्रसामुग्रीची बाजारी किंमत तिला मूळ पडलेल्या किंमतीच्या खाली गेली, तर घसाऱ्यानें उतरलेली यंत्रसामुग्रीची किंमत व बाजारी किंमत ह्यांतील तफावतीइतका आणखी घसारा काढतां येईल. उदाहरणार्थ, नव्या यंत्रसामुग्रीची किंमत १० लक्ष रुपये आहे; तिची पांच वर्षांनीं बाजारी किंमत ७ लक्ष रुपयांवर आली आहे आणि ताळेबंदांतील तिची किंमत ( मूळ किंमत उणे घसारा ) ८ लक्ष रु. आहे. अशा परिस्थितींत ८ उणे ७ = १ लक्ष रुपये जादा घसारा काढण्यास हरकत नाहीं.

### इनकम टॅक्स

एप्रिल, १९५१ पूर्वी उत्पादन सुरू करणाऱ्या कांहीं विशिष्ट प्रकारच्या कारखान्यांस आणखीहि सवलत मिळणार आहे. त्यांत गुंतलेल्या एकूण भांडवलावरील वार्षिक ६% नफ्यावर पांच वर्षें पर्यंत इनकमटॅक्स आकारला जाणार नाहीं. १ एप्रिल, १९५१ पूर्वी एखाद्या कारखान्यास उत्पादनास प्रारंभ करता आला नाहीं, तर त्याला मुदत वाढवून देण्याचा विचार सरकार योग्य वेळीं करील.

### आयातीवरील जकात

कच्चा माल व यंत्रसामुग्री ह्यांच्या आयातीवर जकात घेण्यांत येते, त्याहि बाबतींत सरकार कांहीं सूट देऊं इच्छितें. अशाच प्रकारचा माल बनविणाऱ्या हिंदी कारखानदारास नुकसान पोचणार नाहीं, एवढी मात्र काळजी घेतली जाईल. यंत्रसामुग्रीवरील सध्याची १०% जकात ५% करण्यांत येईल; ज्या बाबींवर संरक्षक जकात बसविण्याचा विचार आहे किंवा ज्या बाबींची चौकशी टारिफ बोर्डाकडे सोपविण्यांत येणार आहे, अशांवरील आयात जकात अर्थातच उतरविली जाणार नाहीं. इलेक्ट्रिक मोटर्स, बेल्टिंग, स्टील बेल्ट लेसिंग, ग्राइंडिंग व्हील्स व सेगमेंटस, स्पिनिंग रिंज, वायर हील्स, पिकर्स, बॉबिन्स, इत्यादींवरील १०% आयात जकात कायम राहील. औद्योगिक कच्च्या मालावरील आयात जकातीबाबतहि खुलासा करण्यांत आला आहे.

### डिव्हिडंड

पब्लिक कंपन्यांचीं डिव्हिडंडस् मर्यादित करण्याच्या योजनेचा तपशील ठरविण्यांत येत आहे आणि त्याचा अंतर्भाव करणारा व कंपनी कायदा दुरुस्त करणारा ऑर्डिनन्स लवकरच प्रसिद्ध होईल. ह्या डिव्हिडंडच्या तारखेपासून दोन वर्षेंपर्यंत ही योजना अंमलांत राहील. इनकमटॅक्सच्या सवलतींचा अंतर्भाव करणारें बिल मध्यवर्ती विधिमंडळाच्या बजेटाच्या अधिवेशनांत मांडण्यांत येईल.

## हिंदुस्थानांतील व हिंदी संस्थानांतील जॉ. स्टॉक बँका

( १९४६ अखेरचे आकडे )

| प्रांत | शेड्यूल्ड बँका: बँकांची संख्या | शेड्यूल्ड बँका: वसूल भांडवल | शेड्यूल्ड बँका: गंगाजळी | शेड्यूल्ड बँका: कचेऱ्यांची संख्या | बिगर शेड्यूल्ड बँका: बँकांची संख्या | बिगर शेड्यूल्ड बँका: वसूल भांडवल | बिगर शेड्यूल्ड बँका: गंगाजळी | बिगर शेड्यूल्ड बँका: कचेऱ्यांची संख्या | एकूण जॉ. स्टॉक बँका: बँकांची संख्या | एकूण जॉ. स्टॉक बँका: वसूल भांडवल | एकूण जॉ. स्टॉक बँका: गंगाजळी | एकूण जॉ. स्टॉक बँका: कचेऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. ००० | रु. ००० | | | रु. ००० | रु. ००० | | | रु. ००० | रु. ००० | |
| आसाम | १ | ८,१० | १,०५ | ७६ | २४ | २७,१४ | ७,२४ | १७० | २५ | ३५,२४ | ८,२९ | २४६ |
| बंगाल | २१ | १४,१७,२७ | ८,९५,४० | ३६० | १८३ | २,५९,९८ | ३५,३५ | ९२६ | २०४ | १६,७७,२५ | ९,३०,७५ | १,२८६ |
| बिहार | २ | ५२,७८ | २२,४७ | १९१ | ११ | ६,२८ | ६,२३ | १४८ | १३ | ५९,०६ | २८,७० | ३३९ |
| मुंबई | १३ | ७,००,९२ | ६,४४,९९ | ३४२ | ३० | ८१,५९ | ४,६६ | १६९ | ४३ | ७,८२,५१ | ६,४९,६५ | ५११ |
| मध्यप्रांत–वऱ्हाड | २ | ३४,८७ | २,८२ | १४६ | ३ | ११,०२ | ८ | ३१ | ५ | ४५,८९ | २,९० | १७७ |
| मद्रास | १४ | २,३५,०५ | १,१७,०६ | ५१२ | १९२ | १,९०,०६ | ५७,४३ | ६०४ | २०६ | ४,२५,११ | १,७४,४९ | १,११६ |
| सरहद्द प्रांत | ... | ... | ... | २९ | ३ | ५,९९ | ३,५४ | ४३ | ३ | ५,९९ | ३,५४ | ७२ |
| ओरिसा | ... | ... | ... | १८ | २ | ४६ | ९२ | २२ | २ | ४६ | ९२ | ४० |
| पंजाब | ११ | २,४१,१५ | १,६३,९६ | ६३५ | ३८ | १,०१,०३ | ४१,६४ | २१६ | ४९ | ३,४२,१८ | २,०५,६० | ८५१ |
| सिंध | १ | २५,०० | ... | ६० | २ | ४,८६ | ३६ | ८ | ३ | २९,८६ | ३६ | ६८ |
| सं. प्रांत | ५ | १,५१,३८ | २१,०१ | ४७९ | २१ | १७,७० | ७,९६ | १४३ | २६ | १,६९,०८ | २८,९७ | ६२२ |
| अजमीर-मेरवाडा | ... | ... | ... | ९ | १ | २१ | ९ | ५ | १ | २१ | ९ | १४ |
| बलुचिस्तान | ... | ... | ... | ७ | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | ७ |
| कुर्ग | ... | ... | ... | २ | ... | ... | ... | ३ | ... | ... | ... | ५ |
| दिल्ली | २ | २,१३,७९ | ३०,०० | ६८ | २ | ७,५१ | ८१ | ११ | ४ | २,२१,३० | ३०,८१ | ७९ |
| हिंदी संस्थानें | ९ | ४,३५,०३ | १,८२,५२ | ४५८ | १९४ | ३,९३,८६ | १,३४,०१ | ७४० | २०३ | २,२८,८९ | ३,१६,५३ | १,१९८ |
| फ्रेंच इंडिया | ... | ... | ... | ... | ... | ... | ... | २ | ... | ... | ... | २ |
| एकूण | ८१ | ३५,९५,३४ | २०,८१,२८ | ३,३९२ | ७०६ | ११,०७,६९ | ३,००,३२ | ३,२४१ | ७८७ | ४६,२३,०३ | २३,८१,६० | ६,६३३ |

## हिंदी कोको–चोकोलेटचा धंदा

दुसऱ्या जागतिक युद्धास प्रारंभ झाल्यावर एक–दोन वर्षांतच श्री. ग. रा. साठे ह्यांनीं कोको पावडर व चोकोलेट ह्यांचा कारखाना हिंदुस्थानांत प्रथमच, पुणें येथें सुरू केला. कोकोच्या बियांवरील आयात जकात रद्द करावी, कारण ह्या बिया कोको व चोकोलेटच्या धंद्याचा कच्चा माल होय, ही साधी मागणीसुद्धा सरकारनें त्या वेळीं मान्य केली नाहीं. पुढें टारिफ बोर्डानें ह्या धंद्यास संरक्षण देण्याचें महत्त्व मान्य केलें व धंद्याच्या मदतीसाठी कित्येक सूचना केल्या; परंतु बियांवरील जकात रद्द करण्यापलीकडे सरकारनें तेव्हां कांहींहि केलें नाहीं. १८ महिन्यांपूर्वी तेव्हांच्या व्यापारमंत्र्यांनीं आश्वासन दिलें, कीं यंत्रसामुग्रीच्या आयातीवरील जकात रद्द केली जाईल. हें आश्वासन सरकारच्या अधिकृत घोषणेंतहि आतां आढळतें.

कोकोच्या धंद्यांत ज्यांचा कच्चा माल पुरविणारे किंवा उत्पादक ह्या नात्यानें महत्त्व आहे अशा युरोपांतील, उत्तर–दक्षिण अमेरिकेंतील व आफ्रिकेंतील कित्येक देशांना श्री. साठे ह्यांनीं नुकतीच भेट देऊन तेथील परिस्थितीची पहाणी केली. हिंदुस्थान सरकारनें, तेथील देशांत कोकोच्या धंद्यास जशी अनुकूल परिस्थिति आहे, तशीच येथें निर्माण केली नाहीं, तर ह्या धंद्यास पुढें बिकट दिवस येतील, असें त्यांना आढळून आलें. कोकोच्या बियांचा बाजारभाव दर हंड्रेडवेटास २१० शिलिंग असतांना, ब्रिटिश सरकार ग्रेट ब्रिटनमधील कारखानदारांना १३५ शिलिंगाच्या दरानें बिया पुरवीत असे. ग्रेट ब्रिटनमधील साखरेची किंमतहि हिंदी किंमतीच्या निम्म्यानें आहे. अशा अनुकूल परिस्थितीमुळें व अत्यंत मोठ्या प्रमाणावरील किफायतशीर उत्पादनामुळें, तेथील कोकोच्या कारखानदारांचें चांगलें चालू शकतें. कोकोच्या धंद्याच्या ह्या उदाहरणावरून, हिंदी धंद्यांच्या संरक्षणास कोणत्या प्रकारचें धोरण व पद्धति ह्यांची आवश्यकता आहे, हें स्पष्ट होईल. टारिफ बोर्डाकडील पहाणींचीं कामें बरींच वाढलीं आहेत, हें खरें. तरी पण, बोर्डाच्या शिफारसीवरील सरकारी अभिप्राय जाहीर होण्यास विलंब लागूं नये. सरकारचें औद्योगिक धोरण कारखानदारांना सहानुभूतीचें आहे; त्यामुळें ह्या अडचणी दूर करण्याचा सरकार प्रयत्न करीलच.

### साखर कारखान्यांच्या उपपदार्थांवर नियंत्रण

मुंबई प्रांतांतील दारूबंदीच्या धोरणामुळें नाशिक येथील सरकारी डिस्टिलरींत डीनेचर्ड स्पिरिटचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू करणें सरकारास भाग पडलें. त्यामुळें सरकार व साखर कारखाने ह्यांचेमध्यें स्पर्धा सुरू झाली आहे. कारखान्यांतील मोलॅसेसपैकीं ६०% ची मागणी सरकार करीत आहे आणि बाकीच्याच्या उपयोगावरहि नियंत्रण आहे. स्पिरिटच्या वापरासाठी परवाने आवश्यक केल्यापासून त्याचा खप घटला आहे, आणि साखर कारखान्यांची स्पिरिटची विक्री फारच कमी झाली आहे. साखर कारखाने आपलें गाऱ्हाणें सरकारपुढें लवकरच मांडणार आहेत.

### कोयना योजनेचें स्वरूप

कोयना हैड्रो–इलेक्ट्रिक योजनेप्रमाणें, हेळवाकच्या उत्तरेस कोयना नदीवर ३०० फूट उंचीचें धरण बांधून त्यांत २५ लक्ष एकर–फूट पाणी साठविण्यांत येईल व त्याचा वीज निर्मितीकडे आणि शेतीस पाणी पुरविण्याकडे उपयोग केला जाईल. योजनेप्रमाणें, २,५०,००० किलोवॅट विजेची मागणी सतत पुरविण्याची त्यांतील वीजगृहाची शक्ति राहील.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.

दि न्यू हिंदुस्थान मेटल वर्क्स
शहापूर--बेळगांव.
आमचे कारखान्यांत अिस्त्री, समई, नीलंजन अित्यादी सर्व प्रकारचा माल निरनिराळ्या साईजमध्यें गिऱ्हाइकांच्या पसंतीप्रमाणें सुबक रीतीनें बनविला जातो.
ठोक व किरकोळ ऑर्डरप्रमाणें माल सर्व ठिकाणीं त्वरित पाठविला जातो.

दी आदर्श कृषि संस्था लि.
नवगृही, धुळें.
संस्थेनें गेल्या वर्षीं ६ टक्के डिव्हिडंड दिला
== शेअर विक्री सुरू आहे ==
मुदतीच्या ठेवी स्वीकारणें आहेत.
१८ महिने— ५ टक्के २४ महिने— ५½ टक्के.
ठेवींवर शेअर होल्डर्सना ½ टक्का अधिक व्याज

एक हजार रुपये
दरवर्षी दिवाळी पाडव्याला रुपये एकशें चाळीस प्रमाणें फक्त पांच वर्षें हप्ते देऊन, म्हणजे एकंदर रुपये सातशें फक्त भरून एक हजार रुपये रकमेचा विमा (नफ्यासह) घेतां येईल.
: यशस्वी मूल्यमापनांचा :
: अहवाल मागवा :
आमचे विमेदार व भागीदार यांना नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.
अध्यक्ष:–श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडीत
मॅनेजर:–व्ही. एच्. देशमुख, बी. ए.
दि ट्रस्ट ऑफ इंडिया ॲ. कंपनी लि., पुणें २.
शाखा:—मुंबई, मद्रास, नागपूर, सोलापूर, पंढरपूर, इ.

## आफ्रिकेंतील भुइमुग लागवडीची योजना

आज जगांतील लोकसंख्या २३० कोटींच्या आसपास आहे. येत्या शंभर वर्षांत ती हल्लींपेक्षा दुप्पट होईल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. लोकसंख्येची वाढ अशीच होत गेली तर ह्या वाढी-बरोबरच अन्नधान्याची निपजहि वाढविली पाहिजे, हें उघड आहे. हिंदुस्थानची लोकसंख्या गेल्या ३० वर्षांत ३० कोटींवरून ४२ कोटींवर गेली. त्याप्रमाणांत अन्नधान्याची पैदास न वाढल्यामुळें एकेकाळीं धान्य निर्यात करणाऱ्या हिंदुस्थानाला आज धान्यासाठी परदेशांच्या तोंडाकडे पहावें लागत आहे. अफ्रिकेंतील लोकसंख्या वाढली तर त्या वाढीला तोंड देण्यासाठीं शास्त्रीय तऱ्हेनें भुइमुगा-ची लागवड करण्याची एक योजना आखण्यांत आली आहे.

अन्नधान्याप्रमाणेंच जगांतील गळिताच्या धान्याचें उत्पादनहि फार घटलेलें आहे. त्याचा परिणाम गळिताच्या धान्यापासून निघणाऱ्या तेलांच्या पुरवठ्यावरहि झाला असून ब्रिटन व युरोपां-तील देश ह्यांना तेलाचा पुरवठा दुर्मिळ झाला आहे. त्यामुळें, फार मोठ्या प्रमाणावर भुइमुगाची लागवड करून त्यापासून तेल उत्पन्न करणें हें अत्यावश्यक झालेलें आहे. पूर्व आफ्रिकेंत अशा तऱ्हेचे प्रयत्न यशस्वी रीतीनें करण्यांत आले तरीसुद्धा जगांतील सध्याच्या मागणीच्या मानानें पुरवठा कमीच पडेल. ह्या लागवडीमुळें फारतर ब्रिटनची गरज तेवढी भागूं शकेल.

### भुइमुगाच्या उत्पादनाचा इतिहास

युनायटेड अफ्रिका कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर मि. सॅम्युएल ह्यांनीं १९४६ च्या प्रारंभीं टांगानिका व त्याच्या आसपासच्या प्रदेशाची पाहणी करून, हा भाग भुइमुगाच्या लागवडीला योग्य आहे, असें मत व्यक्त केलें. भुइमुगाच्या लागवडीच्या योजनेसाठीं सरकारी मदत मिळणें दिरंगाईचें दिसूं लागलें आणि अखेर तें काम युनायटेड आफ्रिका कंपनीच्याच अंगावर टाकण्यांत आलें. ह्या योजनेंत टांगानिकामधील ५,००० चौरस मैल प्रदेश, उत्तर ऱ्होडेशिआ आणि केनिआ इतक्या भागांचा समावेश कर-ण्यांत आला. योजना पूर्ण झाल्यावर ३ लाख टन भुइमुग दरवर्षी निर्माण होऊं शकेल असा अंदाज आहे. योजनेच्या प्रारंभींच कुशल कामगारांचा तुटवडा भासणार होता. त्यासाठी डॉ. जे. वेल्स नांवाच्या शिक्षणाधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली. आणि त्यांच्याकडे ६० हजार अडाणी आफ्रिकन लोकांना शिक्षण देण्याचें काम सोपविण्यांत आलें. मजुरांचें आरोग्य राखण्यासाठी एका तज्ज्ञ आरोग्याधिकाऱ्याचीही योजना करण्यांत आली. लाग-वड यशस्वी करण्यासाठीं इतर अनुषंगिक मदतीचीही फार जरूर होती. योजनेच्या प्रारंभीं सुमारें २५ ते ३० हजार मजूर लाग-णार होते. त्यांची जरूरी हळुहळु वाढत जाऊन ५० ते ६० हजारापर्यंत मजूर पुढें लागतील असा अंदाज आहे. उत्पादनाचा उच्चांक ३ वर्षांत गाठण्याची मूळची कल्पना आहे.

---

### ५० हजार गुमास्ते बेकार?

हिंदुस्थान सरकारच्या कापडविषयक धोरणामुळें मुंबईमधील ५०,००० गुमास्ते बेकार होतील, असें बॉंबे शॉप आसिस्टंट्स फेडरेशननें जाहीर केलें आहे.

---

### ३० तारखेस पगार मिळणार

३१ ऑक्टोबरला रविवार आहे आणि १ नोव्हेंबरला दिवाळीची सुट्टी आहे. ह्यासाठी, ३० ऑक्टोबरलाच नोकरांना पगार व पेन्शनें देण्याची व्यवस्था मुंबई सरकारनें केली आहे.


## पुणें शहर म्युनिसिपल सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड.

**७३, बुधवार पेठ, पुणें शहर.**

(स्थापना १९१४)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ४०,००० |
| वसूल भांडवल | रु. | ३१,३९० |
| रिझर्व्ह फंड | रु. | २०,२४४ |
| ठेवी | रु. | १,३१,५३१ |

चालूं, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीका-रल्या जातात. याशिवाय बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

माहितीसाठी व दरांसाठी भेटा अगर लिहा.

वसंत रामकृष्ण कोतवाल
चेअरमन

## बांठीया बँक लिमिटेड

**पनवेल (कुलाबा)**

स्थापना १९४३

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | ३,११,२५० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | २४,२५० |
| खेळतें भांडवल (३०-६-४८) सुमारें | रु. | ५१,००,००० |

शाखा

मुंबई:-६५-६७ झव्हेरी बझार. बेलापूररोड:-पोस्टासमोर
पुणें:-१२६८ भवानी पेठ. कल्याण:-शीवाजी चौक
अहमदनगर:-बझार पेठ. भिवंडी:- बझार पेठ

चेअरमन:-श्री. रतनचंद भिकमदास बांठीया
मॅनेजिंग डिरेक्टर:-श्री. विरदीचंद भूरचंद बांठीया.
डायरेक्टर्स:-श्री. केशरचंद आनंदराम बांठीया.
श्री. गंगाधर विष्णू पुराणिक.
श्री. खिवराज आनंदराम बांठीया.
श्री. रावजी भिमजी रंगपरीया. (ऑ. मॅजिस्ट्रेट)
श्री. केशव गोविंद लिमये. बी. ए., एलएल. बी.
श्री. जे. एस. कासट. बी.कॉम.
श्री. चुनिलाल जसरूप मुनोथ.
श्री. सोराबजी रुस्तोमजी घासवाला.
जनरल मॅनेजर:-श्री. गणेश भैरव साठे.

*बँकिंगची सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

आर. पी. जोशी B. A., Cert. A. I. I. B.
मॅनेजर.

## क्यूसेक, एकर-फूट, किलोवॅट

धरणें व विजेच्या योजना ह्यांची माहिती देतांना, क्यूसेक, एकर-फूट, किलोवॅट, इत्यादि शब्दांचा उपयोग केला जातो. परंतु, त्यांचा बोध फारच थोड्यांस होतो. म्हणून, त्यांची माहिती येथें दिली आहे.

एक घनफूट पाणी एका सेकंदांत वाहलें, म्हणजे एक क्यूसेक पाण्याची गति होते. अशा रीतीनें, एक क्यूसेक पाण्यानें चोवीस तासांत पांच एकर जमीन पांच इंच खोल भिजविली जाईल. इतकें पाणी पिकांस मिळालें, तर तें उत्कृष्ट समजलें जातें. शहरी वस्तीस एक क्यूसेक पाण्यानें चोवीस तासांत १८,००० नागरिकांची दर माणशी ३० गॅलन पाण्याची गरज भागूं शकेल.

एक एकर क्षेत्रास एक फूटभर खोल पाणी दिलें, तर एक एकर-फूट पाणी होतें. दोन एकर-फूट पाणी पुरविण्यास एक क्यूसेक पाणी चोवीस तास सोडावें लागेल. १० लक्ष एकर-फूट पाणी १३५ कोटी, ६० लक्ष घनफूट पाण्याइतकें होतें व तेवढ्यानें १० चौरस मैल क्षेत्र १५६ फूट खोल बुडतें. एवढ्या पाण्याच्या संचयानें १८५ क्यूसेकच्या काळव्यास वर्षांतील मोसमभर (२७० दिवस) पाणी पुरवितां येतें.

एक क्यूसेक पाणी १५० फुटांवरून खालीं पडलें, तर तें १० किलोवॅट शक्ति निर्माण करूं शकतें. १० किलोवॅट शक्तीनें १२ अश्वशक्तीची मोटार ४० मैल वेगानें चालवितां येईल. १० किलोवॅट म्हणजे अंदाजें १०० माणसांची शक्ति असें म्हणतां येईल. एका किलोवॅट म्हणजे एका यूनिट विजेनें २५ विजेचे दिवे लागतात, किंवा २० फूट खोलीवरून पाणी खेचून दरवर्षी ५० एकर जमीन भिजवता येते. १,००० किलोवॅट शक्ति ५० मैल वेगानें उतारूंची आगगाडी नेऊं शकते. पडत्या पाण्याच्या शक्तीनें वीज निर्माण केली, तर प्रत्येक यूनिटमागें ऑपली दरवर्षी ५ टन कोळशाची बचत होईल.

**पूर्व पंजाबांत साखरेचे कारखाने**—पूर्व-पंजाब सरकारनें करनाळ, गुरुदासपूर आणि लुधिआना ह्या ठिकाणीं साखरेचे कारखाने उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या कारखान्यांच्या भांडवलापैकी ४० टक्के भाग शेतकऱ्यांसाठी राखून ठेवण्यांत यावयाचे आहेत.

**चित्रपटांची लांबी कमी करूं नका**—साउथ इंडिआ फिल्म चेंबर ऑफ कॉमर्सनें एक ठराव करून चित्रपटांची लांबी भलत्याच प्रमाणांत कमी करण्यांत येऊं नये, अशी विनंति हिंदुस्थान सरकारला केली आहे. कलात्मक निर्मितीवर कायदेशीर बंधनें घालणें अनिष्ट असल्याचें नमूद करून दक्षिण हिंदुस्थानांतील भाषांतून निघणाऱ्या बोलपटांची लांबी कमींत कमी १३,५०० फूट तरी असावी असेंही मत ठरावांत व्यक्त करण्यांत आलें आहे.

**पूर्व पाकिस्तानला बटाट्यांची निर्यात**—आसाममधून पूर्व पाकिस्तानांत बटाट्यांची निर्यात करण्यास हिंदुस्थान सरकारनें सरसहा परवानगी दिली आहे. तथापि आसाममध्यें बटाट्यांची किंमत फार वाढूं लागल्यास निर्यातीवर निर्बंध घालण्याचा अधिकार आसाम सरकारकडे राखून ठेवण्यांत आला आहे.

**हिंदुस्थानसाठी स्वीडिश यंत्रसामुग्री**—हिंदुस्थान आणि स्वीडन एकमेकांच्या दरबारीं लवकरच वकिलाती उघडणार आहेत. ह्या राजकीय संबंधाचा परिणाम म्हणून स्वीडनकडून हिंदुस्थानला जरूर असलेली कांहीं यंत्रसामुग्री मिळूं शकण्याचा संभव आहे. ब्रिटन व अमेरिकेकडून हिंदुस्थानला लागणारी औद्योगिक यंत्रसामुग्री मिळणें कठीण असल्यानें युरोपांतील इतर देशांकडून शक्य ती यंत्रसामुग्री मिळविण्याच्या खटपटींत हिंदुस्थान सरकार आहे, असें म्हणतात.

**काँग्रेसच्या अध्यक्षासाठी बिल्ला**—काँग्रेसच्या अध्यक्षासाठी ४ इंच व्यासाचा एक बिल्ला तयार करण्यांत येत आहे. बिल्ला सोन्याचांदीचा मिश्र असा आहे. बिल्ल्यावर अशोक स्तंभावरील तीन सिंह आणि राष्ट्रपति हे शब्द खोदण्यांत येतील.


# पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लि०

स्थापना : १९३० लिमिटेड : १९४२

## महाराष्ट्रांतील यशस्वी पुठ्ठ्यांची गिरणी व स्टेशनरी कारखाना

**मुंबई गिरणी :**
१२६, डिलाइल रोड.

**पुणें कारखाना :**
२७६, शुक्रवार, सरदार पानसे वाडा.

## ठेवी घेणें आहेत.

व्याजाचे दर:—१ वर्ष: ४ टक्के; २ वर्षें: ५ टक्के; ३ वर्षें : ६ टक्के.

माहितीसाठी लिहा :

२७६, शुक्रवार,
पानसे वाडा, पुणें २.

मॅनेजिंग एजंटस

# 'देवल' भांडी

निरनिराळ्या प्रदर्शनांतून ब्रॉन्झ व गोल्ड मेडल मिळालेली 'देवल' भांडी स्वच्छता, टापटीप, आरोग्य व काटकसर यासाठीं घरोघर वापरलीं जातात.

**देणगी अगर भेट देण्यासाठीं हींच भांडीं आपण पसंत करा.**

पुणें येथें भांडीं मिळण्याचें ठिकाणः—

**'देवल' भांड्यांचें दुकान**

सोन्या म्हसोबाजवळ, लक्ष्मीरोड, पुणें २.

# श्री बलभीम को-ऑ. बँक लि. कोल्हापूर

( स्थापना १९१५ ) संस्था सतत अ वर्गांत आहे.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | १,००,००० |
| खपलेलें ,, ,, | ३०,००० |
| वसूल झालेलें ,, ,, | २८,८२० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ७९,१८२ |
| खेळतें भांडवल | ३,४७,०५८ |

बँकेमध्यें चालू, सेव्हिंग आणि मुदतबंदी ठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातात व बँकिंगचीं कामें केलीं जातात. तरी याचा सर्वांनीं फायदा घ्यावा.

व. द. सरनाईक — मॅनेजर

के. आय्. घाटगे — प्रेसिडेंट

# रेखा फर्निशर्स


फर्निचर-तज्ज्ञ श्री. रामभाऊ कात्रे ह्यांच्या देखरेखीखालीं तयार झालेलें

**ऑफिसचें व घरगुती फर्निचर**

सुबक, मनपसंत व योग्य किंमतींत मिळेल.


चौकशी:—

३२४, सदाशिव, भारत इतिहास मंदिरासमोर, पुणें २.



## पर्सनल प्रेस सर्व्हिस व पॅरेमाउंट पब्लिसिटी सिंडिकेट लि., पुणें

### ११ वा वार्षिक वाढदिवस समारंभ



★ ★ ★

वरील समारंभ ता.२३ ऑक्टोबर रोजीं मुंबई सरकारचे स्थानिक स्वराज्य मंत्रि ना. गो. ध. वर्तक ह्यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. त्यावेळीं घेतलेलें चालक व वक्ते ह्यांचें छायाचित्र.


श्री. ना. तु. ठाकूर (संचालक), श्री. अ. बा. मावळंकर (डायरेक्टर), श्री. धों. कृ. साठे (चेअरमन), श्री. गो. ध. वर्तक, श्री. भा. म. गुप्ते व प्रा. रा. वि. ओतुरकर

★ ★ ★




# दि सांगली बँक लिं०

सांगली बँक बिल्डिंग



**मुंबई शाखा**
रिझर्व्ह बँकेसमोर, बझार गेट स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

सांगली बँक बिल्डिंग



**मुख्य कचेरी, सांगली.**
(१९२६ सालीं बांधलेली इमारत)

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,११,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | ३०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३५,००,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन


श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B., मॅनेजर

# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई

[स्थापना १९१८]



टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. | ४,११,६१० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. | १,५१,४०० |
| ठेवी ... | रु. | ८६,७१,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. | ९४,३३,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा—

सब-ऑफिस : —दादर— (बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर)

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्., चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्., सेक्रेटरी

# दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,१५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर

# श्री महावीर को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

(स्थापना १९३७ इ.)

हेड ऑफिस—कोल्हापूर

शाखा—जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,००,००० |
| रोख भरलेलें भांडवल | रु. | ५१,३०० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४७,७०० |
| खेळतें भांडवल | रु. | ५,०४,९९८ |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

डी. बी. शेटे, मॅनेजर — बी. बी. सुलताने, मॅनेजिंग डायरेक्टर — गं. सि. चौगुले, प्रेसिडेंट

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट. लि.

१८० सदाशिव पेठ, पुणें २.

**– संचालक मंडळ –**

१. डॉ. वि. दा. फाटक, ( चेअरमन ), एल. आर. सी. पी., एम. आर. सी. एस., लोणंद.

२. श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित, पुणें २.

३. दि. ब. नि. चिं. लिमये, सी. बी. ई., ॲडव्होकेट, सोलापूर.

४. डॉ. र. ग. ठकार, एल. एम. अँड एस., पुणें २.

५. श्री. अण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख, जमीनदार व व्यापारी, पुणें २.

६. श्री. म. रा. तांबे, बी. ए., एल. सी. ई. रिटायर्ड चीफ अकौंटन्ट, बॉम्बे कॉर्पोरेशन, दादर.

७. श्री. रा. बा. भट, पुणें ४.

८. रा. ब. भा. ल. मोडक, एम. सी. ई., एम. इन्स्ट. सी. ई., आय. एम. ई. ( नि. ) पुणें ४.

९. डॉ. रा. द. भडकमकर, एम. ए., एम. डी., पुणें.

१०. श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी., ( अधिकारपरत्वें )


दर एकरीं कमींत कमी सहा टन साखर निघावी, तसेंच शुभ्र व दाणेदार साखर तयार करतां यावी, याकरितां सिंडिकेटनें नवीन एक हजार टनाची सेमी इलेक्ट्रिक मशिनरी खरेदी केली आहे. स्पिरिट करण्यालाही लवकरच सुरवात होईल.

**कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.**

आमचे भागीदार व ठेवीदार यांना यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो.

**सी. जी. आगाशे आणि कंपनी,**
मॅनेजिंग एजंटस्.






कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट मुंबई.

## 'कॉमनवेल्थ'चें वाढतें वैभव

★ १५ ऑगस्ट १९४८ — आगीचे विमा कामास प्रारंभ.

★★ १२ ऑक्टोबर १९४८ — मुंबई येथील स्वतःचे इमारतींत कामास सुरवात.

जीवित व आगीचे विमा-कामासाठीं ठिकठिकाणीं प्रतिनिधि नेमणें आहेत. माहितीकरितां लिहा :—

मॅनेजिंग डायरेक्टर,
कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लि., पुणें २


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें